श्रीमत्

[ प. प. प्रज्ञानानंद सरस्वती स्वामीकृत ]

# स्फुट काव्य संग्रह

व

( नर्कुटकवृत्तांतील )

# -अभिनव रामायण-

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९२८८



REFBK-0008737
REFBK-0008737

किंमत १ रुपया

श्रीमत्

[ प. प. प्रज्ञानानंद सरस्वती स्वामीकृत ]

# स्फुट काव्य संग्रह

व

( नर्कुटकवृत्तांतील

# -अभिनव रामायण-



★

अनुक्रम
REFBK-0008737
REFBK-0008737
वा. क्र. 8036

प्रकाशक—
ना. भा. जोशी,
एम्. ए. एल्एल्. बी.
कन्या शाळा—सातारा.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मुद्रक—
अ. कृ. कुलकर्णी
आनंद प्रिंटिंग प्रेस सातारा लि.

॥ श्री ॥

# – प्रकाशकाचें नम्र निवेदन –

अनुक्रमांक 9.646..
विभाग ..
क्रमांक 92..
नों. दि. ..
वाचनालय

। श्री गुरुभ्योनमः ।

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।
द्वंद्वातीतं गगन सदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ॥
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीः साक्षिभूतम् ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥१॥

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य प्रज्ञानानंद सरस्वती स्वामी महाराज' (चास-कमान) यांचा हा तृतीय काव्यग्रंथ महाराष्ट्रीय जनता जनार्दनाच्या सेवेस सादर होत असल्याचें पाहून समाधान होतें.

श्री स्वामींचा पहिला काव्यग्रंथ, "श्रीरामचरितमानस (मराठी) शके १८७१ च्या विजया दशमीस प्रसिद्ध झाला. त्याच वर्षीच्या गीता-जयंतीस श्रींची संगीत गीता ( श्री. भ. गीता, समश्लोकी, गाता येईल अशा सोप्या वृत्तांत ) प्रगट झाली. याच गतीनें श्रींचे काव्यग्रंथ एका मागून एक प्रसिद्ध व्हावेत अशी उत्कट इच्छा होती. पण सुमारें चार वर्षे तो योग आला नाहीं.

संगीत गीतेचीं अनेक भावंडें अनेक वर्षांपूर्वीच जन्मास येऊन श्रींच्या सन्निध्यांत आनंदानें बागडत आहेत. व आपल्या बहीणभावाप्रमाणें आपणही अखिल महाराष्ट्रांत संचारासाठीं बाहेर पडावें म्हणून एकसारखी गडबड करीत आहेत. पण जगाच्या या संमर्दीत शिरण्यासाठीं त्यांना धनिकांच्या हस्तावलंबनाची अत्यंत गरज आहे. चासेचे दानशूर शेठ लालचंद हिंमतमल कटारे यांचा हात 'श्रीरामचरित मानसास' मिळाला. तर परंण्डयाचे

माननीय वकील श्री. गोपीनाथ नारायण माढेकर यांच्या सारख्यांनी संगीत श्रीतेस आश्रय दिला. अशा मदतीच्या अभावीं हीं काव्य-बालकें बाहेर पडूं शकत नाहींत. शिवाय ‘तुका म्हणे येथें न चले तांतडी । प्राप्त काळ घडी आल्यावीण ।’

*श्रींचा परिचय*:-श्रींचें पूर्वाश्रमींचें नांव दत्तात्रय नारायण कर्वे, जन्म, मितिवै. व॥ अमावास्या शके १८१५ (१५ मे १८९३). जन्मस्थळ-माहिम, (ता.पालघर, जि. ठाणें) इ. स. १९१८ मध्यें बी. ए. व नंतर एस्.टी.सी. कांहीं वर्षें खासगी हायस्कूलांत शिक्षकाचें काम. मध्यंतरी गोस्वामी श्रीतुलसीदासांचे अनुयायी श्री बाबा गंगादास यांच्या संगतीचा लाभ ५।७ वर्षें मिळाला. या सत्पुरुषांकडून श्रीतुलसी रामायणाच्या सखोल अभ्यासाची प्रेरणा मिळाली व त्या निमित्तानें या अद्वितीय ग्रंथाचीं शेंकडों पारायणें श्रीनीं केलीं. “श्री गोस्वामी तुमच्या मुखानें बोलतील.” असा श्री बाबा गंगादासांचा श्रींना आशीर्वाद मिळाला.!

या नंतरचा काळ अधिक प्रगतीचा ठरला. बालपणापासून अंतरीं असलेल्या धगधगीत वैराग्याचें स्वरूप प्रगट होण्याचा काळ सन्निध आला. खेड मुक्कामीं श्री. ब्र. भू. प. प. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज (आळें) यांचेकडून, पौष शु॥ १२ शके १८६४ (१८-१-१९४३) रोजीं श्रीनीं चतुर्थाश्रमाची दीक्षा घेतली. श्रींच्या अमर काव्य शक्तीचा गंगाप्रवाह शीघ्र गतीनें वहाण्यास सुरवात होऊन श्रीतुलसी रामायण (मराठी), सं. गीता, व इतर अनेक स्फुट काव्यें जन्मास आलीं. अयोध्येस प्रसिद्ध होत असलेल्या मानसपीयूष नामक श्री. तु. रामायणावरील बृहत् टीका ग्रंथांत श्रीस्वामी सध्यां टीका लिहीत आहेत.

श्रींची काव्य प्रतिभा, प्रासादिक, ओजस्वी व ओघवती आहे. संस्कृत, मराठी, हिंदी, गुजराथी व इंग्रजी या भाषांवरील असामान्य प्रभुत्व, वैद्यक ज्योतिष इ. शास्त्रांचा आवडीनें केलेला अभ्यास, विविध क्षेत्रांतील व्यावहारिक जगतांत वावरतांना आलेले कटुतर अनुभव, अनेक वर्षें केलेलीं खडतर अनुष्टानें, पुरश्चरणें व तपश्चर्या, यात्रादि निमित्तानें केलेलें भरत

खंडांतील पर्यटन, इत्यादीमुळें श्रींच्या ठिकाणीं ज्ञान, वैराग्य, योग व पराभक्ति यांचा आदर्श समन्वय झालेला आहे. त्यामुळें श्रींची वाणी व हात रघुवराच्या प्रेरणेला योग्य असे बनलें. "प्रेरी रघुवर वाग् हस्तांना। यंत्रापरि लिहितो शब्दांना" ( ले० हृदगत पान १ रामचरितमानस ) याप्रमाणें श्री स्वामीनीं आपला अनुभव लिहिला आहे. अशा दैवी पायावर अधिष्ठित असें काव्य महाराष्ट्रीय जनतेस उपलब्ध होणें हीहि एक प्रभुरामरायाची मोठी कृपाच होय !

अनुवादांत प्रगट होणारी श्रींची श्रेष्ठ काव्यशक्ति स्वतंत्र विहार करूं लागल्यानंतर आपला प्रभाव कितपत पाडूं शकते, याबद्दलचें कुतूहल वाचकांस. साहजिकच असणार, तें या स्फुटकाव्य-संग्रहाच्या प्रसिद्धीनंतर अंशतः कमी होईल, व त्याच्या जागीं, उरलेलें श्रींचें विस्तृत काव्य आपणांस पठणासाठीं कधीं मिळेल ही उत्कंठा निर्माण होईल यांत शंका नाही. कारण हीं काव्यें नुसत्या काव्य-रसगुणानेंच ओथंबलेली नसून त्यांत कांहीं असामान्य दैवी तेजही प्रगट झालेले आहे, याची सत्यता यापूर्वींच अनेक भाग्यवन्त श्रोत्यांना पटली आहे.

श्रींचीं स्फुट काव्यें विविध प्रकारचीं व भरगच्च असल्यानें, प्रसिद्धि करणासाठीं त्यांतील प्रथम कोणतीं घ्यावींत हा बिकट प्रश्नच होता. तथापि या लहानशा पुस्तकाचें क्षेत्र मर्यादित असल्यानें कांही तारतम्याचा उपयोग करून यांतील काव्यांना अग्र स्थान दिलें व बाकीच्या काव्य-बालकांना 'तुम्हाला लवकरच बाहेरचें जग दाखवू " असें सांगून त्यांची तूर्त समजूत केली.

या काव्य-संग्रहांत सर्वसाधारणपणें सर्वदेवतांच्या उपासनेस पोषक अशीं काव्यें असलेला पहिला भाग आहे. व दुसऱ्या भागांत श्रीमत् भागवतांतील अत्यंत कर्णमधुर अशा नर्कुटक वृत्तांत ग्रथित केलेलीं, श्री रामायणांतील किष्किंधा व सुन्दर हीं दोन कांडें आहेत.

नुसत्या पांडित्यपूर्ण काव्यशक्तीच्या जोरावर स्तोत्रें, आरत्या, या सारखीं देवतांशीं संबद्ध असणारी काव्यें करणें व कोणतीही अमूर्त उपासना साक्षात् होण्यास मदत करणारीं ओजस्वी काव्यें प्रासादिक स्वरूपांत निर्माण करणें यांत केवढेंतरी अंतर असणार ! श्रींचीं काव्यें वर विवेचन केल्या

प्रमाणें प्रभूच्या प्रेरणेनेंच प्रगट झालीं आहेत, हें सत्य शुद्ध- भाविक भक्तांस जाणवते असा रोकडा अनुभव आहे. हा काव्य-संग्रह या कसास उतरेल असा भरंवसा आहे.

किर्लोस्करवाडी जवळील कुंडल गांवानजिक वीरभद्र नांवाची टेकडी आहे. श्री ब्रह्मानंद नामक योगिराजांच्या वास्तव्यानें ती पुनीत झाली आहे. त्यांच्या तेथें पादुका आहेत. या गिरीवर कांहीं काळ वास्तव्य करून श्री स्वामींनीं एक पुरश्चरण यथासांग पार पाडलें. याच काळांत श्रींच्या हृदयांत श्री ब्रह्मानंदांची उपासना स्थिर झाली. ती यथाक्रम करण्यासाठीं श्रींनीं जी काव्यरचना केली ती थोडचा फार फरकानें सर्वांना उपयुक्त होणारी असल्यानें या पुस्तकाच्या पहिल्या भागांत दिली आहे. याशिवाय मुख्य सर्व देवतांचीं स्तोत्रें, अष्टकें, आरत्या इ. आहेतच.

अस्तु. हा काव्य संग्रह जनतेच्या समोर इतक्या लवकर आणण्यास ईश्वरपुर (इस्लामपूर द. सातारा) येथील डॉ बाळासो वैद्य यांचें झालेलें सहाय्य उल्लेखनीय आहे. १०१ रु. ची या कार्यास त्यांची देणगी प्रथम मिळतांच या काव्य संग्रहाची मुद्रण प्रत 'आनंद' प्रेसमध्यें दाखल झाली. या कामीं इतरांचेंहि आर्थिक सहाय्य झालें आहे. पण त्यांचा नामनिर्देश न करतां (त्यांच्या इच्छेप्रमाणें) डॉ. बाळासो व ही मंडळी यांच्याबद्दल येथें फक्त कृतज्ञताच व्यक्त करणें माझ्या हातीं आहे.

चालू वर्षी श्रींना ६० वर्षे पुरीं होत आहेत. त्या निमित्तानें चासेस एक सद्भक्तांचा मेळावा आहे त्यावेळीं श्रींचा हा स्फुटकाव्यसंग्रह प्रसिद्ध व्हावा हे उचित आहे, हें जाणून आनंद प्रेसच्या चालकांनी व कामगारांनी अहर्निश श्रम करून एक आठवडयांत छपाईचें काम शक्य तेवढें चोख करून दिलें हें त्यांस भूषणावह आहे. व त्याबद्दल त्या सर्वांचे आभार मानणें प्रकाशकाचें कर्तव्य आहे. अर्थात् घाईचा परिणाम म्हणून पुस्तकात जे कांहीं मुद्रणदोष राहून गेले त्याबद्दल वाचकांची क्षमा मागणे भाग आहे. तथापि ग्रंथांतील गाभा अमृतमय असल्यानें त्याच्या सेवनानंदानें तृप्त झालेले उदार वाचक या दोषाबद्दल क्षमा करतील अशी आशा आहे.

*ना. भा. जोशी*
प्रकाशक

# अनुक्रमणिका

## विभाग १ ला


| विषय | पृष्ठांक |
|---|---|
| प्रकाशकाचें निवेदन | |
| शुद्धीपत्र | |
| १ श्रीगुरुप्रात स्मरण | १ |
| २ गणेश वंदन | २ |
| ३ भूपाळी १ ली | ३ |
| ४ भूपाळी २ री | ५ |
| ५ काकडा आरती १ ली | ६ |
| ६ ,, ,, २ री | ७ |
| ७ भजन | ८ |
| ८ मुख प्रक्षालन भूपाळी | ८ |
| ९ श्रीब्रह्मानंदांची आरती | ९ |
| १० भजन व पंचपदी | १० |
| ११ भजन व शेजारती | १२ |
| १२ विडा | १३ |
| १३ श्रीब्रह्मानंदाष्टक | १३ |
| १४ श्रीगजाननाष्टकम् | १५ |
| १५ श्री भीमाशंकराष्टकम् | १६ |
| १६ श्रीराम जयकार स्तोत्रम् | १७ |
| १७ श्रीसूर्याष्टकम् | १८ |



| विषय | पृष्ठांक |
|---|---|
| १८ श्रीभवान्यष्टकम् | १९ |
| १९ सग्दुरु माहात्म्य व भेट | २० |
| २० श्रीहनुमान चालिसा | २५ |
| २१ श्रीमल्लारि स्तोत्र | २८ |
| २२ शरणागति | २९ |
| २३ बालरूप रामचंद्र (पद) | ३४ |
| २४ भाव (अभंग) | ३६ |
| २५ दोघे बंधु | ३८ |
| २६ भोचनविधि | ४१ |
| २७ श्रीकृष्णनामावलि | ४५ |
| २८ आरती सद्गुरुची | ५० |
| २९ आरती रामाची | ५१ |
| ३० आरती तुळजेची | ५२ |
| ३१ आरती दत्ताची | ५३ |
| ३२ वेदांतपर भूपाळी | ५५ |
| ३३ पंचीकरण स्मृति चंद्रिका | ५८ |
| ३४ वेदान्तपर झोपाळयावरील ओव्या | ६२ |
| ३५ सद्गुरु वंदन (पद) | ६४ |


## विभाग दुसरा


| | |
|---|---|
| १ किष्किधा काण्डम् | १ |
| २ श्रीवायुनन्दनाष्टकम् | १७ |
| ३ सुन्दरकान्डम् | १९ |
| ४ आरती हनुमंताची | ६३ |

# — शुद्धिपत्रक —

| ओळ | पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५ | ३ | अंकित्त | अंकित |
| ९ | ३ | या गेक्षेम | योगक्षेम |
| ६कडवे६ | | खालील एक कडवें चुकून राहिलें तें:- | |

धर्म स्थापना होता उगवे इन्दु सौख्य शान्ति। राष्ट्रिया प्रेम पूर्ण शान्ती। धर्म राज्य तें देवो सर्वा विश्वां-विश्रांती ॥६॥

| ओळ | पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६कडवे६ | | ६ | ७ |
| १४ | ६ | काकड | कांकडा |
| १९ | ,, | घर्षणि | घर्षणि |
| ३ | ७ | गाठीं | गाठीं |
| २ | १२ | रुपा | रूपा |
| १७ | १३ | करी | करि |
| ९ | १७ | रुपा | रूपा |
| ७ | २० | उध्वं | ऊर्ध्व |
| २ | २१ | गुरुवीण | गुरूवीण |
| १४ | २४ | सबळें | सुबळें |
| ८ | २६ | तनहि | तनयहि |
| ११ | २६ | सीतीते | सीतें तें |
| १५ | २६ | सहस्त्र | सहस्र |
| १५ | २७ | राममक्त | रामभक्त |
| १६ | २७ | घरती | धरती |
| १७ | २७ | स्भरतां | स्मरतां |
| २ | २८ | हृर्दयि | हृर्दयिं |
| २ | २८ | सतिराम | सीताराम |
| ८ | २८ | मल्लरि | मल्लारि |
| ९ | २८ | महत्म्या | महात्म्याच्या |
| १२ | २८ | शण | शरण |
| १९ | २८ | सन्निध | सन्निध |
| २ | २९ | स्यिति | स्थिति |
| १५ | २९ | शिप्याने,गुरुसी- | ष्याने गुरूस |
| २० | ४० | प्रेम | प्रेमें |
| ७ | ४६ | चणा | चरणा |
| १ | ४९ | कृष्ण | कृष्ण॰ |
| ११ | ५० | रुपा | रूपा |
| ४ | ५२ | विर्भद | विमर्द |
| १७ | ५५ | पार्दि | पर्दि |
| १ | ५६ | मड | जड |
| १० | ,, | ऐक्व | ऐक्य |

## — विभाग दुसरा —

| ओळ | पान | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ८ | १ | पूर्वुनी | पुरवुनं |
| १५ | ४ | कशिषि | कपिश्रि |
| ९ | ९ | हि वानर | यूथ |
| २ | २१ | रघूवर | रघुवर |
| ६ | २४ | द्रततर | द्रुततर |
| १४ | ३१ | अशिष | आशि |
| १५ | ३२ | धनबाद | धनवा |
| १० | ५८ | कळा | कुळा |

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
शाखा



श्रीमत् परमहंसपरिव्राजकाचार्य
प्रज्ञानानंद सरस्वती महाराज ( चास–कमान )

## – श्रीगुरु प्रातःस्मरण –

प्रातः स्मरामि हृदये भवताप हन्त्रीं ।
चेतोहरां सुविमलां गुरुराजमूर्तिम् ॥
माल्यांबरा--भयवरं दधतीं सुगौरां ।
कारुण्यपूर्णहृदयां मृदुलामुदाराम् ॥१॥

प्रातर्भजामि भजनीयगुणं सुदांतं ।
पूर्ण परात्परपरं पुरुषं प्रशान्तम् ॥
चेतो धियामविषयं मनसाप्यतर्क्यं ।
सच्चिद्घनं हृदयमोहहरं कृपार्कम् ॥२॥

प्रातर्नमामि मनसा शिरसा वचोभिः ।
श्रीवासुदेवचरणौ हि पलायते भीः ॥
तन्नामकीर्तिगुणगानपरं मनस्त्वं ।
प्रज्ञा ! कुरुष्व गुरुपादरजश्च मूर्ध्नि ॥३॥

– हरिः ॐ तत्सत् –

अनुक्रमांक
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

# वन्दन



(१)

आधीं वंदूं गजानन । करी विघ्नें निवारण ॥१॥
गण इंद्रियांचा पति । तो चि नमूं गणपति ॥२॥
नमूं माया जी शारदा । होते बंधमोक्षप्रदा ॥३॥
दावी दुःखद द्वंद्वांनां । तीच तोडी आपदांना ॥४॥
दावी ऐक्य जीव शिव । प्रज्ञा म्हणे वासुदेव ॥५॥

( २ )

करुं नमन सद्‌गुरु । कार्य कारणातें परु ॥१॥
गुरु चैतन्याचा गाभा । पाववीती आत्मलाभा ॥२॥
ऐसा दाता जगीं महा । उपमेसी नाहीं पहा ॥३॥
तोडी कल्पनेचा बंध । दावी स्वरुपातें शुद्ध ॥४॥
प्रज्ञाम्हणे वासुदेव । करी विश्व वासुदेव ॥५॥

( ३ )

राम अयोध्येचा राणा । नमूं तयांच्या पायांनां ॥१॥
ज्याच्या पायीं जन्मे गंगा । करी पावन त्रिजगा ॥२॥

( ३ )

ज्याच्या चरणींचें रज । तारी अहिल्ये सहज ॥३॥
ज्याचे पाय शिवचित्तीं । सदा मारुती सेविती ॥४॥
प्रज्ञा म्हणे पाय धरा । नर-देहीं हित करा ॥५॥

( ४ )

सुनील सोज्वळ, कमल--कोमळ । तळवे तों लाल माणि प्रभ ॥१॥
ध्वज वज्रांकुश ऊर्ध्वरेखांकित । करावे अंकित्त चित्त पटीं ॥२॥
जयापाद पद्मीं मुनिमनें भृंग । करिती निःसंग गुंजारव ॥३॥
सदा आठवूं तो राम सीतापती । भक्तांचा सांगाती सर्वकाळ ॥४॥
त्याचे अंकावरी लोळूं बाळासम । पाजील तो प्रेम--दुग्ध आम्हां ॥५॥
योगक्षेम चिंता बाळाची मायेसी । तेवींच रामासी भक्त चिंता ॥६॥
भक्त तोचि झाला विभक्त जो नव्हे । प्रज्ञा वासुदेवे चिंता नेली ॥७॥

(५)

रामराया सिंहासनी । रत्नजडित कांचनी ॥१॥
भासे राम मेघनीळ । नभ छत्र ते निर्मळ ॥२॥
मेघी शोभे विद्युल्लता । राम अंकीं तेवीं सीता ॥३॥
लक्ष्मण पाठी उभा । जैसा काञ्चनाचा गाभा ॥४॥
बंधु उभे सव्य वाम । भरत शत्रुघ्न उत्तम ॥५॥
शिरीं चामरें ढाळिती । जणूं बलाहक पंक्ती ॥६॥
प्रज्ञा करी नमस्कार । तदंशेंचि वारंवार ॥७॥

(६)

छत्र–नभामाजीं राम पूर्ण शशी । ग्रह तारा जैशी किरीटांत ॥१॥

मुख–पद्म–गंधे मधुप लोभले । मस्तकीं शोभले काळे केश ॥२॥

कानांत कुंडलें भाळीं गोरोचन । राजीवलोचन आकर्ण जे ॥३॥

वक्र चापासम भिवया त्या जाण । पाहोनि मदन मनीं लाजे ॥४॥

सरळ नासिका अरुण अधर । गजमुक्ताहार कंबु–कंठीं ॥५॥

श्रीवत्स लांछन, कौस्तुभाची शोभा । माजीं पडे आभा घननीळ ॥६॥

प्रज्ञा वासुदेव चक्षु ते चकोर । झाले मुखीं स्थिर शोभालयीं ॥७॥

## भूपाळी १ ली.

उठा जागा आयु भक्षितो क्षणे क्षणे काळ ।
खातो क्षणे क्षणे काळ ।
स्नान करोनी चला डोंगरीं अरुणोदय वेळ ॥

धनसुतदारा गेह पसारा कोणि सोडवीना ।
भयातुनि कोणि सोडवीना ।
स्वामी ब्रह्मानंद दयाळू भव भय उरवीना ॥१॥

गुलाल बुक्का सुमनहार घ्या गंध फुलें तुलसी ।
नाना धूप कर्पुरासी ।
पुन्हां मिळेना नर तनु ऐशी लोळुं नका आळसी ॥२॥

सत्वर जाऊनि जागे करुं या ब्रह्मानंदासी ।
देई जो पूर्णानंदासी ।
करुणाघन विझवील आपुल्या तो भवदावासी ॥३॥
दीन होउनी जाऊं चरणिं शरण पूर्ण भावे ।
संसृती नुरवी तो नांवें ।
दंभ, मान, मद यांचे सरती विविधा मैंदावे ॥४॥
गुरु–भास्कर–नेत्राब्ज उघडुनी दे सुख मकरंदा ।
तमाचा सरे तदा धंदा ।
प्रज्ञास्वामी ब्रह्मानंदा नमिती गत भेदा ॥५॥

## भूपाळी २ री

ऊठ जाग बा ब्रह्मानंदा । सदया करि करुणा ।
लेंकरावरि बहु करि करुणा ।
अरुणोदय हा स्वराज्य आले धाव दाव चरणा ॥ ध्रु० ॥
अधर्म तम घन शीत सुराज्या पिका येउ देना ।
सुखदा पिका येउ देना ।
दुरभिमान हेमन्त मोहहा शिशिर साहवेना ॥१॥
द्वेषदंभ पाषंड दैन्य दर निशिचर नाना हे ।
माजले रजनीचर बहु हे ।
काम, घूक, वृक, लोभ, वाघ, मद, मत्सर, तस्कर हे ॥२॥

धर्म वसंतावीण न जाती, म्हणुनी तो आणा ।
दंडधर होऊनि त्या हाणा ।
सुराज्य पिकतो वसन्त नसता नकरी सुख गाना ॥ ३ ॥
धन, दारा, गृह, ऐक्य, सौख्य या राक्षस हे खाती ।
सतींना भ्रष्ट किती करती ।
म्हणुनी सखया धर्मशील जन तुझी वाट बघती ।! ४ ॥
चित्तीं श्रमले सज्जन जमले पहा किती द्वारीं ।
समर्था तुझ्या उभे द्वारीं ।
काय करावें कोठें जावें विनवीती भारीं ॥ ५ ॥
प्रज्ञा विनवी बहू न शिणवी सज्जन–वृंदांना ।
दयाळो तुझ्या लेकरांना ।
शान्ति–दया--साम्राज्य पसरवी देई या दाना॥ ६ ॥

## काकडा आरती

### १

काकड आरती प्रेमे ब्रह्मानंदासी ।
जयजय योगिराजयासी ।
पूर्ण परात्पर कृपानिधी जो कुण्डल गिरिवासी ॥ धृ. ॥
मायेचा काकडा भेदधी घृतांत भिजवीला ।
देवा घृतांत भिजवीला ।
विवेक विरती घर्षणि "सोहं" ज्योती पेटविला ॥१॥

यातजामधि पाहूं भवहर गुरुवर मुख कमला ।
पाहूं गुरुवर मुख कमला ।
चिज्जड गांठी सोडी सोडी कृपा–कटाक्षाला ॥२॥

आरति ओवाळीता चिद्घन योगीराजाला ।
भावे ब्रह्मानंदाला ।
जळुनि काकडा "सोहं" ब्रह्मानंदीं समरसला ॥३॥

प्रारब्धाची विभूति राहे लावूं देहाला ।
देवा लावुं कपाळाला ।
प्रज्ञास्वामी विश्वीं पाहे ब्रह्मानंदाला ॥ ४ ॥

(२)

काकडा आरती ब्रह्मानंद केशवासी ।
जयजय योगिराजयासी ।
सज्जन–वृन्दीं मान्य सदा त्या ब्रह्मानंदासी ॥धृ०॥

भानु कृपाकर पसरुनि शिरि जो मोह-तिमिर नाशी ।
जनांचा मोह-तिमिर नाशी ।
सच्चित्सुखमय पूर्णदयाघन कुंडल-गिरिवासी ॥१॥

दत्ताचा अवता-रचि चौथा दे पुरुषार्थासी ।
सकामा दे पुरुषार्थासी ।
स्वार्थाते विसरती सदा त्या दे परमार्थासी ॥ २ ॥

श्रद्धा भक्ति घृत हृत्पात्रीं-सख्य ज्योतीसी ।
प्रेमें सख्य ज्योतीसी ।
पेटवुनी ओवाळी प्रज्ञा ब्रह्मानंदासी ॥३॥

## भजन

कुंडलगिरि वासी माझे ब्रह्मानंद माई ।
माझे ब्रह्मानंदमाई ॥
बुरुंगवाडी मिरास माझे योगिराज आई ॥१॥
ब्रह्मानंदा सेवक वरदा । सत्वर तोडी मम भवफंदा ॥२॥
ब्रह्मानंदा योगी राजा । धावपाव बा अनाथ काजा ॥३॥

## मुख–प्रक्षालन भूपाळी

काकडा झाला आता मुखा प्रक्षाळा ।
आता मुखा प्रक्षाळा ।
सेवक मेळा लोणी साखर घेउनिया आला ॥ धृ० ॥

श्रद्धासात्विक पाट मांडिला त्यावरि बैसावे ।
प्रेमें त्यावरि बैसावे ।
दंत काष्ठमम चित्तदुराशा चावुनि निरसावे ॥१॥

काम क्रोधे तप्त वासना जळ आनानिं घांला ।
देवा टाकावे चूळा ।
करुनी मुखमार्जनास देई सुख या दीनाला ॥२॥

चित्ताची शुभ तळमळ लोणी साखर भावाची ।
घ्यावी साखर भावाची ।
ब्रह्मानंदा भक्षण करि दे प्रीती पायांची ॥३॥

साही चारी चौदा अठरा वानिति तव महिमा ।
प्रेमे वानिति तव महिमा ।
दुजेपणाने पारन लागे अगम्य गुण गारिमा ॥४॥

सिद्ध मुनीश्वर सज्जन वंदिति शरण्य तव चरणां ।
देवा शरण्य तव चरणां ।
प्रज्ञा स्वामी विनवी करिबा दीनावरि करुणा ॥५॥

## सायं-उपासना आरती

ओवाळूं ब्रह्मानंदा । वासुदेवा योगीवंद्या ।
आरती ओवाळीता । पूर्ण झाल्या चारी संध्या ॥धृ०॥

विवेकाचे नीरांजन । शमादीक दांडा जाण ।
वैराग्य आज्यें पूर्ण । हाती मुमुक्षा घेऊन ॥ ओवाळूं ॥१॥

शुद्ध चित्त मंदीरांत । ध्यानाभ्यास गाभाऱ्यांत ।
त्रिगुणांची पेटे वात । "सोहं" ज्योती तेवे शांत ॥ ओवाळूं ॥२॥

ज्ञानाच्या प्रभेमाजीं । ग्रंथी जड-चैतन्याची ।
पाहतां नव्हे साची । शक्ती येते तोडायाची ॥ ओवाळूं ॥३॥

ऐसा हा ग्रंथी-भेद । करी संशयाचा छेद ।
मोह नूरे सरे खेद । ऐसे गर्जती हे वेद ॥ ओवाळूं ॥४॥

वृत्तीचा लय जेव्हां । पूर्ण वोळे स्वानुभवा ।
कृतकृत्य जीव तेव्हां । प्रज्ञानंदा वासुदेवा ॥ ओवाळूं ॥५॥

## भजन

ब्रह्मानंदा सेवक वरदा । सत्वर तोडी मम भव फंदा ॥१॥
ब्रह्मानंदा योगी राजा । धाव पाव बा अनाथ काजा ॥२॥

## पंचपदी

### (१)

ब्रह्मानंदा योगी राया । आधी वंदू भावे पाया ॥१॥
दिव्यहास्य रम्यमूख । दर्शने दे पूर्ण सूख ॥२॥
नेत्र कृपाळू तेजाळ । गळां रुद्राक्षांची माळ ॥३॥
शुभ्र वस्त्रे परीधान । क्षुधा तृषा नाही भान ॥४॥
प्रज्ञा वासुदेव शिरीं । कृपाछत्र पूर्ण धरी ॥५॥

### (२)

ब्रह्मानंद साधू राजा । पुरवीतो भक्त काजा ॥१॥
शरण जावे त्याचे पाया । भवदैन्य नेई लया ॥२॥
भेदभाव निरसीतो । अभिमाना विध्वंसीतो ॥३॥
शुद्ध भावाचा भुकेला । पावे आर्तांच्या हांकेला ॥४॥
प्रज्ञा वासुदेव म्हणे । भावे धरावी चरणे ॥५॥

अनुक्रम
विभाग

( ३ )

मृतजीव तुम्ही किती उठवीले । मला उपेक्षीले काय दोष ॥१॥
दोषांचा सागर परी तुझा दास । पुरवावी आस ब्रह्मानंदा ॥२॥
रात दिन पाठी प्रपंचाचा धंदा । मज मतिमंदा तारी तारी ॥३॥
बुडालों बुडालों अपार संसारीं । जन्ममृत्यू फेरी आतां नको ॥४॥
प्रज्ञा वासुदेव दावी ब्रह्मानंदा । संसारा भीतीदा दूरसारी ॥५॥

( ४ )

किती वाट पाहूं तुझी मायबापा । संसाराच्या तापा शांत करी ॥१॥
काम क्रोध लोभ घोर हे मगर । दंभ अजगर गीळती बा ॥२॥
तुझे नाम देवा पतीत पावन । दासांचे जीवन तुझे नाम ॥३॥
तुझे नाम घेतां कीर्ती गुणगातां । मिळे भवश्रांता विश्रांती गा ॥४॥
प्रज्ञा वासुदेव ब्रह्मानंद दानी । संसाराची हानी पूर्ण केली ॥५॥

( ५ )

तुजवीण मज जगी कोण आहे । तळमळ राहे चित्तीं फार ॥१॥
तुझा मी चकोर ब्रह्मानंद चंद्रा । चाखवी योगींद्रा रूपा-मृता ॥२॥
तूं माझी माऊली मी तुझा तान्हूला । प्रेम पान्हा मला पाज वेगी ॥३॥
तूचि कामधेनू मी तुझे वासरूं । नको पान्हा चोरूं कृपा करी ॥४॥
प्रज्ञा वासुदेव सद्गुरू नावीक । उद्धरे सेवक ब्रह्मानंदी ॥५॥

## भजन

तारी तारी तारी आता ब्रह्मानंदा हो । ब्रह्मा नंदा हो ॥
दावी दावी दावी आतां दिव्य रुपा हो ॥१॥
मारी मारी मारी माया लावुनी पायां । माथा मारुनी पायां ॥
गेला गेला गेला मानव जन्म हा वाया ॥२॥
केले केले केले दंभ लोकांमाजीं हो । मान सन्मानार्थीं हो ॥
आलों आलों आलों चरणीं शरण तारी हो ॥३॥
क्षमा क्षमा क्षमा सर्व अपराध गर्व । माझे मूर्खाचे सर्व ॥
हेळसीले साधु सज्जना आता क्षमा हो ॥४॥ तारी० ॥

## शेजारती

आतां ब्रह्मानंदा निद्रा करा गुरुराया । निद्रा करा गुरुराया ।
कृपा करावी दीनावरती कष्टविले वाया ॥ धृ०॥
अरूप असुनी स्वरूप झाला लोकोद्धारासी । आता लोकोद्धारासी ।
स्वरूपि निद्रा सुखें करावी आतां हृद्धासी ॥१॥
हृदय-मंदिरीं शांति-पलंगीं सुमन-शेजेसी । पहुडा सुमन-शेजेसी ।
मैत्री, क्षमा, दया दासी सेविति चरणासी ॥२॥
करुणा वरुणा लया नेउनि भेदाते विलया । नेउनि भेदाते विलया ।
प्रेमभक्तिच्या नवविध जळती तेजस्वी समया ॥३॥
ब्रह्मानंद स्वामी बसले मानस-मंचकीं । माझ्या हृदय-मंचकीं ।
प्रज्ञा स्वामी, अतां विनवितों विडा घ्यावा की ॥४॥

## विडा

विडा घ्यावा गुरू राया । ब्रह्मानंदा योगी राया ॥ धृ०॥
देह बुद्धि पक्व पानें । खुडुनियां विवेकानें ।
अभिमान देठ तोडूं । आसक्ती या शिरा काढूं ॥१॥
वैराग्याचा चुना मऊ । लोणी केशर मिश्रित लावुं ।
सुपारी काम चूर्ण । शम कात शुद्ध पूर्ण ॥२॥
शुद्ध श्रद्धा वेलदोडे, । दम खोबरें गोडे, ।
तितिक्षा लवंग तीख । कंकोळ उपरम नीक ॥३॥
समाधानाचें केशर । मुमुक्षा कस्तुरी तीव्र ।
जायपत्री जायफळ । भक्ति ज्ञानही निर्मळ ॥४॥
कर्पूर भाव केला । तेरा गुणी विडा झाला ।
ब्रह्मानंदा, मुखीं घाला । प्रेमभक्ति तैं रंगला ॥५॥
अभेद भक्ति रसास्वाद । सर्वां देती ब्रह्मानंद ।
विडा देती प्रज्ञानंद । विश्वीं भरला ब्रह्मानंद ॥६॥

## —श्री ब्रह्मानंदाष्टक—

ब्रह्मशुद्ध आनंदचि रुपरहित जे । ते ब्रह्मानंदरूप धरि तया भजे ॥धृ०॥ आबाल्य ब्रह्मचारि योगिराजया । विधि हरिहर उदारिं सदर वंदिती जया ॥ कुंडलगिरि मंडित करी वंद्यपदरजे । योग–सिद्धि पसरति पदिं हेम–पद–रजे॥१॥ योग–चमत्कार किती दाविले जना ।

दत्तात्रय अवतारचि तुरिय तो गणा ॥ कोण कदा जन्म कुठुनि येथ ठाकले । कोणाला लवलेशहि अंत ना कळे ॥२॥ आहाराविण जगली ती तनू सदा । जळि समाधि बहु निशि–दिनि करि कदा कदा ॥ साधुवेष वा कुवेष नच कदा धरी । चित्त असे लीन सदा ते गदाधरीं ॥३॥ बालकांत खेळुनिया तोषवी तया । योगाचा अधिकारी नाढळे जया ॥ काळाला प्रतिकूल बघुनि बुरुंग वाडीला । घे सजीव जो समाधि अजुनि राहिला ॥४॥ धरुनि पूर्वरूप मधुनि परिचिताजनां । बहु अवसरि, करुनि दया देइ दर्शना ॥ आदेशा देउनियां बसवि पादुका । तेथ करी वास त्यास नमवुं मस्तका ॥५॥ संचारा करुनि देहिं मार्ग दाखवी । शिवराया जशि देवी दावि शांभवी ॥ धर्माच्या उद्धारा झटति जे सदा । त्यान विसंबेल मुळी सज्जना कदा ॥६॥ संत मान लववीती शाद्बिं ज्यांचिया । ते ब्रह्मानंद नमूं मुगुट योगिया॥ सद्धर्मोद्धार करो मार्ग दाखवो । रामराज्य पसरुनिया विश्व तोषवो ॥७॥ नश्वर या देहांतुनि सोडवो जना । प्रभुपदरति गंगाजळिं पोहवो मना ॥ प्रज्ञातनु राष्ट्र कार्यिं नित्य वाहवो । शांतीच्या साम्राज्या विश्विं पसरवो ॥८॥

साय–उपासना समाप्त

## श्रीगजाननाष्टकम्

गणाधिपं गुणेश्वरं । गिरीश-कन्यकासुतं ।
गिरीन्द्रजाप-नंदनं । स्मरामि तं गजाननम् ॥१॥
चतुर्भुजं, चतुर्युगे । विभिन्नवर्णभासकम् ।
विलम्बितोदरं विभुं। भजामि तं गजाननम् ॥२॥
वराभयंच पाशमंकुशं करेषु धारिणम् ।
सुतप्तकांचन-प्रभं । नमामि तं गजाननम् ॥३॥
सुबुद्धिदं सुविद्यदं । सुपूज्यमग्र्यमक्षरं ।
विधीश-विष्णु-पूजितं । नमामि तं गजाननम् ॥४॥
अविघ्नकं च विघ्नकं च । सिद्धि-बुद्धि-सेवितम् ।
मुदा सदा जगत्पतिं । नमामि तं गजाननम् ॥५॥
मदोल्लसत्सुभाल-गंड-। भृंगपुञ्जभूषितम् ।
स्वभालचन्द्र-सप्रभं । नमामि तं गजाननम् ॥६॥
निपीनदेह-दीर्घबाहु- । मीलिताधनेत्रकं ।
सुमूषकध्वजं कविं । नमामि तं गजाननम् ॥७॥
गजाननः स्तुतिप्रियः । स्तुतःसदा हितप्रदो !
ददातु मे रतिं सदा । रघूत्तमस्य पादयोः ॥८॥
(श्री)वासुदेव-पाद-पांसु- । पावितोक्तमष्टकं ।
पठेदिदं यतेंद्रियः । स भक्तिमुक्तिमान् भवत् ॥९॥

— ॐ तत्सत् —

## —श्रीभीमाशंकराष्टकम्—

दरेंन्दु—कुंद—सुन्दरं । मृगांक—बिंब—सो ज्वलं ।
सुभव्य—जूट--शोभितं । नमामि भीमशंकरम् ॥१
रघूत्तमाङ्घ्रिजाधरं । सुधाकराननं हरम् ।
भवौघ--भीति—संहरं । नमामि भीमशंकरम् ॥२॥
भुजंगभूतिभूषितं । मृगेन्द्रचर्मवेष्टितं ।
नगेंद्रजापतिं प्रियं । नमामि भीमशंकरम् ॥३॥
नृमुण्डमालधारकं । प्रचण्डतांडवप्रियं ।
अखंडसौख्य--दायकं । नमामि भीमशंकरम् ॥४॥
त्रिनेत्र—पंचमूर्धकं । त्रिलोकसौख्यवर्धकम् ।
त्रिशूलखड्गधारकं । नमामि भीमशंकरम् ॥५॥
विशुद्धरामभक्तिदं । अजं विवेकशक्तिदं ।
विरक्ति—युक्ति—मुक्तिदं । नमामि भीमशंकरम् ॥६॥
परात्परं च निर्गुणं । सदाशिवं महेश्वरं ।
सुरेश्वरादिवंदितं । नमामि भीमशंकरम् ॥७॥
जगत्करं जगद्धरं[1]। जगद्धरं[2] सुखालयं। १ जगाचें संरक्षण करणारे
निरंत्तरं निरामयं। नमामि भीमशंकरम्॥८॥ २जगाचें हरण करणारें
श्रीवासुदेवपादपद्म—पावितोक्तमष्टकम्
शिवस्य तुष्टिकं पठन् नरः सदा सुखी भवेत् ॥९॥

— हरिः ॐ तत्सत् —

# -श्रीराम जयजयकार स्तोत्रम्-



जयजय राघव भवभयभंजन । जय सीतापति असुरनिकंदन ॥१॥

कोसलपति जय दशरथनंदन । जय भरताग्रज लक्ष्मणरंजन ॥२॥

जय हनुमत्प्रिय जय रघुनंदन । जय निर्गुण अजशुद्ध निरंजन ॥३॥

जय लवणासुरमर्दक बंधो । असुर विमर्दक जय सुखसिंधो ॥४॥

भार्गवदर्प--विमर्दक जयजय । जयजय चिन्मय ब्रह्म निरामय ॥५॥

जयजय कामुक--जन अनुकारिन्। जयजय लीलानटवपुधारिन् ॥६॥

जय दंडकवनपावनकारिन् । जयजय मुनिजनहृदयविहारिन् ॥७॥

जय शंकरमनमानसहंसा । जयजय दिनकरकुलअवतंसा ॥८॥

जय मन्मथ—मद—मर्दनरुपा । जय सच्चिद्घनरूपअरूपा ॥९॥

जयभक्तापद—भंजननामा । जयपूजक—जन—पूरितकामा ॥१०॥

जयजयनिर्मलचित्त—निकेतन । जयजडचेतन—गत—अनिकेतन ॥११॥

नीरज—नीलदनीलारामा । नीलमणिप्रभनयना—रामा ॥१२॥

जयरघुपुंगव रघुपति रघुवर । जयविधिहरिहरवंदित सुखकर ॥१३॥

कोसलपुरजननिजपददायक । मोहविनाशक जयरघुनायक ॥१४॥

जय जय जय जय राम खरारे । कुरुवसतिं मम हृदयागारे ॥१५॥
नामरुपतवगुणगणगानं । कुरुतां प्रज्ञागततनुभानं ॥१६॥
प्रेम्णा य इमं जयजयकारं । कुरुते स तु गच्छेभ्दवपारं ॥१७॥

— हरिः ॐ तत्सत् —

## श्रीसूर्याष्टकम् --( भास्कराष्टकम् )



सुरक्तवारिजास्थितं । द्विपंचवाह--वाहनं ।
वराभयाम्बुजद्वयं । धरं स्मरामि भास्करम् ॥१॥
त्रिलोकजन्मदायकं । हि कालचक्रनायकं ।
चराचरात्मरूपिणं । भजामि तं प्रभाकरम् ॥२॥
स सूर्य एव सर्वलोक– । कर्मकारणं श्रुतं ।
रविर्हि यज्ञ–वृष्टि–धान्य– । कारको नमामि तम् ॥३॥
रवेर्जनी रवेःस्थिती । रवौ लयो भवत्यहो ।
अशेषवेदकारणं । नमामि तं विभाकरम् ॥४॥
रविर्मही–जलानला - । निलादिभूत–कारणं ।
रविर्हिनेत्र संस्थितो । नमामि तं दिवाकरम् ॥५॥

रविर्हि पञ्च-पञ्चकं । विधिर्हरिर्हरः श्रुतः ।
समस्तदेवतात्मको । नमामि तं अहस्करम् ॥६॥
परं च शाश्वतं पदं । गतागतिर्यतो न हि ।
सवितृमण्डलस्थितं । गुरोर्गुरुं नमामि तम् ॥७॥
रविर्मुनीन्द्रपूजितो । रविर्मुनीद्रसंस्तुतो ।
रविर्मनीषिभिः स्मृतो । नमामि तं नमामि तम् ॥८॥
रवेः कृपाप्रसादतो । ममापिचित्तदर्पणे ।
रघूत्तमः सुबिम्बितो । भवेद्धि नात्रसंशयः ॥९॥
इदं हि भास्कराष्टकं । विमोहशोकहारकम् ।
श्रीवासुदेवपादपूत- । पुष्टिकं तनोतु शम् ॥१०॥

॥ श्रीरामचंद्रार्पितमस्तु ॥

## —श्री भवान्यष्टकम्—



जय जय जय जगदीश्वरि अम्बे । देवि भवानि अजे जगदम्बे ।
जय तुळजापुर-हृदयनिवासिनि । विश्वअखिलमृगवारिविकासिनि ॥१॥
विद्याविद्यारूपविधारिणि । शिवजीवादिविविधभिदकारिणि ।
प्रकृति सगुणानिजरूपविकारिणि । भोक्ता भोगत्रिषयतनुधारिणि ॥२॥

विश्वजननपालनलयकारिणि । जयगजवदनषडाननधारिणि ।
सुरतिर्यग्मानवगतिदायिनि । स्वर्गनरकसायुज्यविधायिनि ॥३॥
जयहिमगिरिवर–राजकिशोरी । जयजय शिवमुख–चंद्र–चकोरी ।
बंधनमोक्षअसुखसुखदर्शिनि । ज्ञानाज्ञानातीत–विमर्षिणि ॥४॥
जयविधिहरिसुर वंदितमाते । भक्तहृदयगतहरिसि तमाते ।
पूर्वजपूजित जयसुखकंदे । कुण्डलिनी रुपे पदवन्दे ॥५॥
विविधअसुरमदमोहविमर्दिनि । उर्ध्वगते षट्चक्रविभेदिनि ।
चिद्घन--शंकर--अंक विहारिणि । जननमरणशुचदु:खनिवारिणि॥६॥
जय जय निजजनसंकटत्रारिणि । जयभवसागर--पारवितारिणि ।
दैवी माये वाणी रूपिणि । ब्रह्म निरामय नित्यनिरूपिणि ॥७॥
जय नवनीतसुकोमलहृदये । जय पूजक–मन–कामद सदये ।
जयसेवकजनचिरसुखदायिनि । रामचरण रति दे अनपायिनि ॥८॥
तुज विनवीती प्रज्ञा स्वामी । रामवसो स्थिर मम उरधामी ।
हो रसनारत रघुवर नामी । गुरुगुण गरिमा गावो नामी ॥९॥

— ॐ तत्सत् —

## –सद्गुरु महात्म्य व भेट–

शा० वि०—

सूर्यानेचि जसा नभीं घन दिसे लोपी तया तो जसें ।
ब्रह्मे तेवि जगांत माय विलसे ब्रह्मास झांकीतसे ॥
जेव्हां मेघ समीरणे वितळतो, तेव्हां रवी आकळे ।
माया जैं गुरुदेव–बोध–असिनें मारी तदा तें कळे ॥१॥

अ० धा०—

मेघांसि तो घालवाया वृथायास वायूविणे खास होती पहा ।
तैसा गुरुवीण, केला किती शीण, नाना तपाधीन, संताप हा ॥
योगादि अभ्यास, यागादि हव्यास, देतील भोगास सिद्धी जरी ।
नाही गुरूपाय--सेवा, तरी जाय हा मानवी, काय वाया तरी ॥२॥

स्रग्धरा—

कर्ता मी जीव भोक्ता, विविध परि अशा बांधला जो भ्रमानें
बैसोनी कीर जैसा नळिवरि फिरतो तानमाने श्रमानें ।
नाना सायास लोकीं, गुरुवरचरणां-वाचुनी बंधनासी ।
तोडाया व्यर्थ जाती, सदय गुरुकृपा बोधुनी बंधनासी ॥३॥

पृथ्वी—

जयासि अभिमान ना, तिळभरी दुराशा नही ।
क्रिये सहित नांदते सदय-शुद्ध-विज्ञान ही ।
स्वयें असुनि सिद्ध जो, विमल भक्ति मार्गा धरी ।
असा गुरु असे खरा, तरिच साधकां उद्धरी ॥४॥
दिसे गुरु वरी, परी बहुत मीपणे गुर्गुरी ।
मनी कनक कामिनी विविध—भोग—कांक्षा पुरी ।
विमुक्तपण दाखवी, त्यजुनि कर्म, भक्ती, वरी ।
न तो गुरु, गुरुं खरा नसति पुच्छ शिंगें जरी॥५॥

संसार दुःखें बहु दुःखला जो । त्रिताप तापें बहु तापला जो ।
मानीं कुणा येथ न आपुला जो । म्हणे मला पाहुनि नर्क लाजो ॥६॥

पंच० चामर—

मरुस्थलामधेहि जो, फिरूनि तप्त जाहला ।
फिरेल तोचि शोधण्या सुछाय वृक्ष चांगला ।
तया जळाविना जसे सुचे न कांहि अन्य ते ।
मिळेल अप्सरा जरी गमे मनी जघन्य ते ॥७॥
जरी तयास अर्पिले सुवर्णरत्न फारही ।
रुचे न ते तया मुळी समस्त मानि मारही ॥
जसेंहि मर्कटा दिले सुरत्न देइ फेकुनी ।
तसे समस्त भोग्य जो हि वान्त देइ टाकुनी ॥८॥
गुरूविणे न भोजनी रुची सुषुप्ति आसनीं ।
गुरू कदाहि भेटती सचिंत जो सदा मनीं ॥
गुरूस येथ शोधितो गुरूस तेथ शोधितो ।
पुसेंहि सज्जनां कधीं गुरूहि देइ भेट तो ? ॥९॥

शिख०—

म्हणे रामा कैसा सदय असुनी अंत बघसी ।
स्वकर्णीं बाळाचे रुदन जननी कां न धरिसी ? ॥
पुरे हे प्रेमाचें दुरुनि बघणे कौतुक भलें ।
गुरूपायां दावी, त्वरितचि हरी दुःख सगळें ॥१०॥

भु० प्रयात—

कशाला म्हणे कीं हवा सद्गुरू तो । बहू भोग ऐश्वर्य रंभादि देतो ।
किती कल्प आयुष्य राज्यासि घेई । वृथा कष्टुनी आयु ना व्यर्थ नेई ॥११

शिखरिणी–

कशाला हे माला विष रघुवरा अर्पण करा ।
नको हें, जायाचें वधुनि मजलाही यम–घरा ॥
गुरू दाता देतो, स्थिर–चिर–सुखा शांति विमला ।
पुन्हां ना मागावें म्हणुनि गुरुला पाववि मला ॥१२॥

भु० प्रयात–

तुझा बाळ मी भ्रांतिनें या मरूत । बहू हिंडलों श्रांत झालों तृषार्त ।
गुरू-माउली साउली त्वा करावी । सुधाज्ञान पाजील तृष्णा हरावी॥ १३॥
तुझ्यावीण माझा प्रभू नाहि दूजा । जगी माय तूं बाप तूं आणि आजा ।
इथें सर्वेही कांहिं आहेत नातीं। तुझे पायिं कि राम माझ्या मना तीं॥ १४॥
मुमुक्षूस वृत्ती अशी जैं बने ती । तदा राम ते त्या, गुरूपायिं नेती ।
गुरूपायिं आराम दुःखसि होतो । स्वरूपीं सुविश्राम निभ्रांत होतो ॥१५॥
अशी वृत्ति नाहीं जरी जाहली ते । तरी भेटली त्या गुरू माउली ते ।
तरी पूर्ण विश्वास होतो न पायीं । तनू-लोभ तो लोटितो की अपायीं ॥
वसे चित्तिं आशा धना मेळवाया । मनी वाटती गोड पुत्रादि जाया ।
असे प्रेम देहावरी जोवरी तें । रिते कष्ट होती न मुक्ती वरीते ॥१७॥
जिथें हो दुराशा, वसे एक जाया । कदा मुक्ति तेथें, धजेनाचि जाया ।
सपत्नी मुळीं मुक्तिला पाहवेना । विरक्तीविना आसही भंगवेना ॥१८॥
सदा रामनामीं धरी शुद्ध गोडी । क्षणाने क्षणें भक्ति मार्गासि जोडी ।
विवेकें मृदू प्रेम पाशासि तोडी । मनीं दुर्गुणांतें त्वरेनेंचि सोडी ॥१९॥

शिखरिणीः–

जरी निष्ठेनें तो सुविमल यशा साधक जनीं ।
घरोनी सद्भावा निशिदिन झटे राम भजनीं ।
जरी धातू–मूर्ती सुफळ बनते भाविक बळें ।
गुरू भावें तेवीं रघूवरकृपा शीघ्रचि वळें ॥२०॥

शा॰ वि॰:–

होता राम कृपाचि सद्गुरु दिसे मुक्ती जिथे कीं वसे ।
भक्ती जी नवमी अनन्य मति जी बोधें तिथें होतसे ।
जीं केलीं बहुसाधनें सुफळ तीं होतात सेवारती ।
पावोनी श्रमहार सर्व घडती लागे पदीं शान्ति ती ॥२१॥

शिखरिणीः–

दुजा जन्मीं मुक्ती, मजसि तरि लाभेल वदती ।
मुमुक्षा तेथे हो, खचितचि नसे शुद्ध वसती ।
तनू ही जातां कीं, नर तनु मिळें, केवि वदणें ।
म्हणोनी जन्माशा त्यजुनि सबळें यत्न करणें ॥२२॥
जरी पुण्यें केलीं बहुत तरि तो स्वर्गचि मिळें ।
नृजन्मां पावाया सुरगण मनींही तळमळें ।
स्तनी जो दुग्धातें उपजवि, शिशू–पालन करी ।
तया श्रीरामीं रे व्यसुनि तनुचिंता भज हरी ॥२३॥

उपजाति--

म्हणूं कसा कल्पतरू गुरूला । संकल्प मात्रा हरि तो समूला ।
चिंतामणी त्यासि कसें म्हणावें । चिंता मनीं ठेवि न जो स्वभावें ॥२४॥
म्हणूं कसा सद्गुरु कामधेनु । न काम ठेवी हृदया मधें नु ।
गुरूसी केवीं रवि हो म्हणावे । विश्वा कृपेनें समुळीं हरावें ॥२५॥
कसा म्हणूं मी गुरु चक्रवर्ती । पदीं शिरें वंदित दिव्यमूर्तीं ।
जिथें शिवेना मन चित्तवृत्ती । वदेल केवीं गुरु कीर्ति पूर्ती ॥२६॥

आर्याः-

वदवेना वदवेना सद्गुरु महिमा अणू हि वदवेना ।
तम रविरूपा पाही, भिन्नपणे ज्यासि जेंवि टरवेना ॥२७॥
सद्गुरु सद्गुरु, ऐसा, उपमा तेथे वदूं दुजी केवी ।
रण, रावण-रामाचे रावण रामा समान ते जेंवी ॥२८॥
शतकोटी खद्योता सम भास्कर बोलतां कवी लाजे ।
"तक्रा समचि सुधा" वच कविला ना, तोक-बुद्धिला साजे॥२९॥
रामानुग्रह दावी प्रज्ञाना वासुदेव-पद रज कीं ।
ना तरि दुर्जन नेते जन्माच्या घोरशा महा नरकीं ॥३०॥

## - श्रीहनुमान चालिसा -

( गोस्वामी तुळशीदासांच्या "हनुमान चालिसा "चा मराठी
समवृत्त अनुवाद )

दोहा-

चित्त दर्पणीं घालुनी, सद्गुरुचरण सुवारि ।
वर्णूं रघुवर कीर्तिनें, जी देते फल चारि ॥१॥

बुद्धिहीन मी जाणुनी, स्मरतो पवन--कुमार ।
द्या विद्याबल बुद्धि या, हरुनी क्लेश विकार ॥२॥

जय हनुमान ज्ञान गुण सागर । जय कपिवर त्रैलोक विभाकर ॥१॥
रामदूत अतुलित बल धामा । अंजनि पुत्र पवन सुत--नामा ॥२॥
महावीर विक्रम बजरंगा । कुमति हरुनि दे सन्मति संगा ॥३॥
कांचन वर्ण विराजे वेश । कानिं कुण्डले कुरळे केश ॥४॥
ध्वजा वज्रही करीं विराजे । स्कंधीं मुंज जानवें साजे ॥५॥
शंकर तनहि केसरि नंदन । तेज प्रताप महा जग वन्दन ॥६॥
विद्यावान गुणी अति चातुर । रामकार्य करण्यातें आतुर ॥७॥
प्रभु चरित्र श्रवणीं रसभारी । लक्ष्मण राम सिता मनिं धारी ॥८॥
सूक्ष्मरूप दावी सीतीतें । विकट रूप जाळी लंकेतें ॥९॥
भीम रूप धर असुरा मारी । रामचंद्र–कार्या तें सारी ॥१०॥
आणुनि गिरि, लक्ष्मण उठवीला । श्री रघुनाथें हृदयीं धरिला ॥११॥
नानापरि रघुपति वाखाणी । भरतां सम तूं प्रिय गुणखाणी ॥१२॥
सहस्रमुख यश तुमचे गाती । वदुनि असे प्रभु गळां घालिती ॥१३॥
ब्रह्मादिक सनकादि मुनीश्वर । नारदवाणी सहित अहीश्वर ॥१४॥
कुबेरयम दिक्पालहि सारे । कवि कोविद यश गाती बारे ॥१५॥
तुम्हि सुग्रीवा उपकृत केले । राम भेटवुनि राज्य अर्पिलें ॥१६॥
तुमचा मंत्र विभीषण फावे । जग जाणे लंकापद पावे ॥१७॥
सहस्र युग योजन जो तरणी । सहज मधुर फळ माना स्वमनीं ॥१८॥
प्रभु मुद्रा मुखि ठेवुनियां ही । जलधि लंघिला विस्मय नाहीं ॥१९॥

दुर्गम कार्य जगीं जें जे ही । तुमच्या कृपे सुगम तें ते ही ॥२०॥
रामाचे प्रिय तुम्ही रक्षिते । तव आज्ञे विण कांहि न हलतें ॥२१॥
लाभ सकल तव तुमच्या शरणे । तुम्हि रक्षक तरि किमर्थ डरणें ॥२२॥
मनीं स्मरावें निज तेजासी । त्रिलोक कांपे तव हांकेसी ॥२३॥
भूतपिशाच निकट ना येते । महावीर जैं नाम गर्जतें ॥२४॥
सकल रोगही पीडा पळती । हनुमंता वीरा जैं जपती ॥२६॥
वारी संकट सब हनुमानहि । तनुमन वचने धरितां ध्यानहि ॥२७॥
सर्वोत्तम नृपराम तपस्वीं । तत्कार्ये साधितां मनस्वी ॥२७॥
इतर मनोरथ पाळी कोणी । अमित जन्मफळ पावें प्राणी ॥२८॥
प्रताप यश युगिं चारी तुमचे । प्रसिद्ध जगतीं सुविमल साचें ॥२९॥
साधुसज्जना तुम्ही सुरक्षक । राम प्रिय अति, असुर विनाशक ॥३०॥
अष्ट सिद्धि नव विधींस दाता । देइ असा वर सीता माता ॥३१॥
राम रसायन तुमचे पासीं । सादर तुम्हि रघुवर दास्यासी ॥३२॥
तुमच्या भजनें राम भेटती । बहु जन्मांचे कष्ट नासती ॥३२॥
मरुनी रघुवर पुरी जन्मती । राममक्त मग तेथे बनती ॥३४॥
अन्यदेवतां चित्तिं न धरती । सेवुनि हनुमंता सुख वरिती ॥३५॥
हरितिं संकटें पीडा घोरा । स्मरतां हनुमंता बलवीरा ॥३६॥
जय जय जय हनुमंता स्वामी। करा कृपा गुरु--समान नामी ॥३७॥
हे शत वेळा सुपाठ करिती । होइ महासुख बंध हि तुटती ॥३८॥
हे " चाळीसा " म्हणाति निरंतर । होति सिद्ध साक्षी गौरीहर ॥३९॥
तुलसीदास सदा हरि–किंकर । त्याचे हृदयिं करा प्रभू निजघर ॥४०॥

दोहा—

पवन तनय संकट हरण; मंगलमूर्ती रूप ।
सतिराम स लक्ष्मण, हृदयिं वसो सुरभूप ॥४१॥
रामचरण रत वृत्तिनें राम नाम रसपान ।
द्या हनुमंता विनवितो, प्रज्ञाना हें दान ॥४२॥

" सितापति रामचन्द्र की जय । पवन सुत हनूमान की जय ।

—जयजय रघुवीर समर्थ—

## श्रीमल्लारि स्तोत्र

( मल्लारि महत्म्याच्या आधारें )

जय शंभो मार्तंड भैरवा । शान्ति सुधाकर[1] भक्त—कैरवा[2] ।
घोर दैत्य मणि मल्ल माजले । समरि अजय यश अमरि गाजले ॥१॥
त्रस्तधर्मसुत[3] सप्त जहाले । शंकर तव पदि शरण रिघाले ।
दीनोद्धरणा करुणा करिशी । दुष्टदर्पहरणा अवतरशी ॥२॥
अश्वारूढा चंपक गौरा । रजनी[4] रंजित वपु सुखवर्या ।
रिपुमाणिमल्लां रणीं मर्दिले । निजपदघातें पावन केलें ॥३॥
स्तुति परिसुनि वर तयांहि दिधले । माणि दैत्या निज पार्श्वी ठेविले ।
मल्लप्रेतावरि मल्लारी । प्रेमपुरीं[6] वससी मैलारीं[7] ॥४॥
सवे म्हाळसा शैलकुमारी[8] । घृतमारी[9] जी सुररिपुमारी ।
स्थापिशि सन्निध हरि चतुरानन[10] । षष्ठि[11] तीर्थ गण निर्मिशि पावन ॥५

मनुज भजति तुज सहज सरल जे । करिति मनोजय, प्रजय तरल जे ।
उत्पत्ति स्थिति विनाशकारी । सर्व भूतमय तूं मल्लारी ॥६॥
विश्वीं जे जें रूप भासतें । मल्लारी ! तव रूपिं भासते[१३] ।
तूं शाश्वत तूं शिव सच्चिद्घन । विधि हरि सुर वंदित करुणाघन ॥७॥
आशुतोष[१४] तंव पदां वंदितो । सद्भावें पद रज शिरिं धरितो ।
जगीं पतितपावन न च तुजसा । महापातित जगिं दुजा न मजसा ॥८॥
शीघ्र म्हाळसाकांता तारी । देइ दर्शना, भवभय वारी ।
प्रज्ञा स्वामी तुजला नमिती । गुणां वर्णिता नसे तव मिती[१५] ॥९॥

*टीप*-१) चन्द्र. २) चन्द्रविकासी कमळे. ३) तपस्वी मुनी ज्याना मणिमल्लांनी फार छळिलें. ४) हळद. ५) बाजूला जवळ. ६) बिदरचे जवळ. ७) मल्लारि क्षेत्र. ८) पार्वती. ९) पार्वतीचा अवतार. १०) ब्रह्मदेव. ११) साठ. १२) चंचळ (मन). १३) दृश्य. १४) लवकर प्रसन्न होणारे. १५) पार, मर्यादा, सीमा.

---

## —शरणागति—

### (१)

बहु सोपा आहे, मार्ग शरणागति । तयासी प्रपत्ति म्हणे कोणी ॥१॥
पत्नीनें पतीसी, भक्तीनें देवासी । शिष्यानें गुरुसी शरण जावें ॥२॥
शरण जाण्याची सांगतो लक्षणें । सावधान मनें सहा ऐका ॥३॥
करणें शरण्या जें कांहीं आवडे । तयासी नावडे वर्जावें तें ॥४॥
रक्षील तो आम्हां दृढ हा विश्वास । त्याचें अभयास संपादणें ॥५॥
भावें सर्वस्वानें आत्मसमर्पण । त्यागी अहंपण लक्षणें हीं ॥६॥
प्रज्ञा म्हणे भावें शरण जो गेला । भिन्नत्वें नुरला जीव भावें ॥७॥

(२)

शास्त्र सांगतसे काय रामा गोड। आपुली आवड तेथें नको ॥१॥
शास्त्र जैसें सांगें, त्यागा निषेधांतें। प्रतिकूल तें तें रामासीही ॥२॥
तनु 'मन' 'धन' सर्वस्व रामाचें। नाही कांहीं माझे गृह दारा ॥३॥
सुखदुःख सर्व रामाचा प्रसाद। पावतां, विषाद हर्ष नाहीं ॥४॥
मातेनें वाढिलें सर्व कांही गोड। पुरवी ती कोड, कन्या मानी ॥५॥
प्रज्ञा म्हणे स्वयें रामाचा जो दास। विषयी उदास चित्तें रागें ॥६॥

(३)

रामासी आवडे एकशुद्ध भाव। दंभाचा अभाव प्रिय देवा ॥१॥
रामासी नावडे बाह्य आडंबर। पाहिजे अंतर प्रेम शुद्ध ॥२॥
हेतुविण सदा अनन्य जी प्रीति। तेथे चारी मुक्ति तुच्छ होती ॥३॥
सर्वदा शरण्या तोष वाटे जेणें। तैसेंचि वर्तणें सर्वकाळ ॥४॥
प्रज्ञा म्हणे भावें आज्ञेचें पालन। देह लोभाविण निर्विकारें ॥५॥

(४)

त्याचे गुण नाम सर्वदा आठवी। दोष–उठाठेवी सांडूनिया ॥१॥
इतरांचे प्रेम काढोनिया वाख। वळोनिया चोख:प्रेम रज्जु ॥२॥
तिनें रामापायीं बांधी निज मन। घट्ट अवळून, मळहीन ॥३॥
प्रेमांत कामना तोचि जाणा मळ। प्रेम तें निर्मळ प्रेमास्तव ॥४॥
मेघावरि प्रेम चातकाचा धर्म। अपेक्षा अधम प्रज्ञा म्हणे ॥५॥

(५)

चित्तांत आठवी प्रेमें रामरूप । विश्वांत स्वरूप त्याचें पाहे ॥१॥
मयूराचे कंठीं, नीळिमा आकाशीं । पाहतां चित्तासी ऐसे वाटे ॥२॥
वाटे यानी माझा राम लपविला । म्हणोनि जाहला नीलवर्ण ॥३॥
सुनीळ कमळ पाहतां भासलें । अहो कीं, चोरले यानें रामा ॥४॥
प्रज्ञा म्हणे भृंग कमळीं बैसले । कुंतल भासले रामाचे ते ॥५॥

(६)

शारद पौर्णिमे दिसे चन्द्र बिंब । राममुख आभ भासे तेथें ॥१॥
जेधवां पाहिजे नवकुंद कळी । भासे दंतावली रामाची हे ॥२॥
शुक चंचु जेव्हां नयनासी दिसे । नासिकाभ भासे रामाची ती ॥३॥
जेव्हां विद्युल्लता व्यापिते अंबर । राम, पीतांबर वाटे तेथें ॥४॥
पाहतां अंगाचें रूप तें विश्वांत । प्रेमाब्धि चित्तांत उचंबळे ॥५॥
प्रज्ञा मनीं ऐसा क्षणोक्षणीं राम । आठवी, आराम चित्ता होय ॥६॥

(७)

शरण जो गेला तयाचे चित्ताला । स्पर्श नाहीं झाला चिंतेचा तो ॥१॥
त्याचा योमक्षेम भार देवावर । राहे निरंतर अनायासे ॥२॥
" कैसें या देहाचें रक्षण होईल । कोण या सेवील वृद्धपणीं ॥३॥
येता या देहासी दुखणीं बाहणीं । कोण अन्नपाणी देई मज ॥४॥
ऐसी चिंता मनीं, तेथें नाहीं निष्ठा । जाणा भाव खोटा वरपंग ॥५॥
प्रज्ञा म्हणे जन्मा-पूर्वी जो दुग्धातें । निर्मितो तयाते चिंता आहे ॥६॥

(८)

प्रारब्धांत कष्ट देहा अन्तकाळीं । धन गोत्रावळी कामा नये ॥१॥
असोनि जवळी उपेगा न येती । पुत्र उपेक्षिती ती कन्या कांता ॥२॥
राम निष्ठा तरि निर्धन विदेशीं । तयाचे सेवेसी धांवे जन ॥३॥
तया कांहीं उणें तिळहीना पडे । अल्पही सांकडे पडे जेंव्हां ॥४॥
प्रज्ञा म्हणे भाव जरी रामावरि । नराशेसी तरी धरूं नका ॥५॥

(९)

ठेवुं नका देहावरि अल्प प्रेम । जायाचा हा नेम जाणोनिया ॥१॥
बहुत रक्षिला पुष्ट बहु झाला । तरी या देहाला अंत आहे ॥२॥
किडे भस्म, माती तनूचे होतील । जरी संरक्षाल नाना युक्ति ॥३॥
ऐसे हें नश्वर जाणार कळलें । कासया धरिलें लोभा तेथें ॥४॥
आपुले जें नाहीं तयाच्या आशेसी। पाळणे सुज्ञांसी काय शोभे ? ॥५॥
प्रज्ञा म्हणे देह–लोभ–आडसर । पाडितो विसर स्वस्वरूपीं ॥६॥

(१०)

पाहिला हो कधीं पक्षी भुकें मेला । अन्न हो माशाला कोण देतो ॥१॥
ग्रीष्म ऋतुमध्यें वृक्षासी पालवी । जळासी घालवी कोण सांगा ॥२॥
वृक, व्याघ्र, सिंह अहार मांसाचा । पुरविता त्यांचा कोण आहे ॥३॥
भूमीचिये पोटी राहती मंडूक । तयांचीही भूक पुरवीतो ॥४॥
प्रज्ञा म्हणे सर्वां राम जो रक्षिता । काय उपेक्षिता अनन्यासी ॥५॥

अनुक्रम ७६६५
विभाग
क्रमांक ९२८
२०/६१

(११)

अनन्य दासासी रामें उपेक्षिला । पाहिला ऐकिला सांगावें कोठें ॥१॥
रामा पुढें काय नराचें ऐश्वर्य । म्हणोनियां धैर्य चित्तीं ठेवा ॥२॥
कृपा करी राम, शत्रु होती मित्र । नाहीं तरी पुत्र शत्रु होती ॥३॥
राम कृपा नाहीं; माता होते यम । पुष्पांचेहि दाम[1] सर्प होती ॥४॥ [1]हार
रामकृपा तरी विषाचें अमृत । नातरि निभ्रांत सुधा विष ॥५॥
प्रज्ञा म्हणे रामासीं, धरावा विश्वास । वरील चित्तास समाधान ॥६॥

(१२)

संत--गुरुवाक्यीं विश्वास धरावा । चिंतेचा करावा मूळ नाश ॥१॥
राम अन्तर्यामीं आमुचा रक्षिता । ऐशी निष्ठा चित्ता संतसंगें ॥२॥
राम लक्ष्मीपति आमुचा सोयरा । संकटांत खरा संरक्षिता ॥३॥
संतसंगे घ्यावा स्वयें अनुभव । ऐहिक वैभव अशाश्वत ॥४॥
प्रज्ञा म्हणे रामा सुहृद मानिती । त्यांचे पायीं शांति स्वयें लागें ॥५॥

(१३)

संतसंगें देव लागतो पाठीसी । घालवितां त्यासी जाईना तो ॥१॥
विमुख त्याहोता सन्मुख तो होतो । नेत्र झांकीतां तो दिसे आंत ॥२॥
हातानें लोटतां दिसतो हातांत । पळतां पायांत राम चाले ॥३॥
जेथें जाऊं तेथें येतो मागें मागें । शुध्द अनुरागें बद्ध देव ॥४॥
प्रज्ञा म्हणे राम आपुला करावा । संताचा धरावा संग जरी ॥५॥

— ॐ तत्सत् —

## पद

# बालरूप रामचंद्र

बालरूप रामचंद्र पूर्ण उगवला ।
कौसल्या प्राचीचे अंकि बैसला ॥ धृ० ॥
मृदुल मधुर वदन कंज । मकरंदाचि रूप पुंज ।
निरखुनि मम नयन भृंग । पानि रंगला ॥१॥
अधर लाल जणुं प्रवाल । अरुण गाल जणुं गुलाल ।
मरकत मणि कमल सुदलिं । विरल फेंकिला ॥२॥
दंत युगल-- युगल विमल । कुंद मुकुल दिव्य धवल ।
मंद हास्य किरण विपुल । इंदु वर्षला ॥ ३ ॥
दिव्य नील--नीरजांत । विलसत जणुं कुमुद कान्त ।
विहग चित्त रूपामृत । पानिं दंगला ॥४॥
नयन जलजदल विशाल । माजि लसत भृंगलोल ।
सुखद कृपाकर अविरल । विपुल वर्षला ॥५॥
रतिपति धनु भ्रुकुटि पहा । भाल पटल भव्य महा ।
गोरोचन तिलक अहा । रुचिर शोभला ॥६॥
नीलमणी मुकुरि रचित । रेखा युग कांचन--कृत ।
चेतोहर तेविं खचित । तिलक जाहला ॥७॥
श्रुति युगलीं मणि कुंडल । कनक खचित अति सुडोल ।
प्रतिबिंबे युत कपोल । रम्य पाहिला ॥८॥

मृदु चिक्कण कच कुंचित । जननीनें पुष्प रचित ।
भृंग पंक्ति पद्मिं वसत । तेविं भासला ॥९॥

करि--कर्भक--कर युग भुज । जानु लंबि अति सतेज ।
कनक रत्न विविध साज । अंगिं शोभला ॥१०॥

करतल मृदु अरुण वनज[1]। नीरज[1]-दल-रुचिर करज । १ कमल
करजाग्रीं मणि समाज । दीप्ति पावला ॥११॥

वक्ष--स्थल अति विशाल । वरि कंचुक पीत विरल ।
वरि कुंजर मुक्तमाळ । हार झळकला ॥१२॥

प्रभु नाभी वसनगता । पूर्ण न ये नयन पथा ।
कटि किंकिणि रत्नयुता । कनक मेखला ॥१३॥

मुनि मन हर अंग अंग । करित मदन दर्प भंग ।
बघुनि लाजला अनंग । म्हणुनि जाहला ॥१४॥

मुनिं मानस भृंग पंक्ति । पदकंजीं रुंज करिति ।
त्यापादिं शिशु--राम रतीं । देउं निर्मला ॥१५॥

पदतल युग रातोत्पल । नख मणि--भा हृदय विमल ।
करुनि हरुनि तिमिर सकल । मोद अर्पिला ॥१६॥

पादपद्म भक्तसद्म । शांतीचें परमधाम ।
प्रेमें मन तुरग राम । पायिं बांधिला ॥१७॥

धरुनि तरी[2] हे सतरा । दुस्तर भव भास तरा । २ होडी
ना तरि जनि[3]-[illegible] कुतरा । पाठिं लागला ॥१८॥ ३ जन्म

नामसुधारस रसना । रूपामृत पान मना ।
दे इतुकें प्रज्ञाना । दीन--वत्सला ॥१९॥
लोभी मन वित्त निरत । कामीमन रमणीरत ।
नाम–रूपिं तेविं सतत । वितर रति मला ॥२०॥
राम–पदीं करुनि नमन । पदिं अर्पण पद्यसुमन ।
बालरूपिं मन उन्मन । लाभ लूटला ॥२१॥

– ॐ तत्सत् –

## —भाव—

जयापासी जैसा भाव । तया लागीं तैसा देव ॥१॥
भाव असेल मायीक । देव होतो महा ठक ॥२॥
कल्पवृक्षातळीं गेला । भाव तैसा, फळ त्याला ॥३॥
प्रज्ञा म्हणे भाव शुद्ध । तेथें देव प्रेमें बद्ध ॥४॥

(२)

विदुराच्या कण्या खातो । जनाईची धुणीं धूतो ॥१॥
कबिराचे शेले विणी । नाथा घरीं वाहे पाणी ॥२॥
अर्जुनाची धुतो घोडीं । धर्माघरीं उष्टीं काढी ॥३॥
करि क्रिया जटायूची । बोरें भक्षी भिल्लीणीची ॥४॥
कश्यपूचें पोट फाडी । कुळ रावणाचे तोडी ॥६॥
भावा पाशी राहे देव । प्रज्ञा म्हणे वासुदेव ॥६॥

(३)

रामकृपा जया करी । गृह धन त्याचें हरी ॥१॥
ज्ञाति बंधु वोसंडिती । दारा पुत्रही निन्दिती ॥२॥
बरे म्हणेना त्या कोणी । तया जो तो अपमानी ॥३॥
दुःखापाठीं येतां दुःख । भाव राहे जरी चोख ॥४॥
प्रज्ञा म्हणे तेव्हां राम । करी दासा पूर्णकाम ॥५॥

(४)

तेंव्हां मग देव भक्त । नाम रूप–भेद फक्त ॥१॥
जें कां रामाचें वैभव । तेंचि दासांचें स्वमेव ॥२॥
मग सर्व दास--चिंता । होय राम तो वाहता ॥३॥
दास राम कीर्ती गातो । रामभक्ति वाढवीतो ॥४॥
राम दासा मागें मागें । प्रज्ञा म्हणे धावूं लागे ॥५॥

(५)

"नको रामा मागें धावूं" । राम म्हणे कोठें जाऊं? ॥१॥
"काय आहे मजपासीं । जावे तुवां भक्तापासी ॥२॥
मी तो आहे रे निर्धन" । राम म्हणे प्रेम धन ॥३॥
मी तो आहे अनिकेत । "तूचि माझे बा निकेत ॥४॥
प्रज्ञा म्हणे मी तो वेडा । प्रेम तुझे देई पेढा ॥५॥

--हरिः ॐ तत्सत्–

## —दोघे बंधू—

राम जननीचे, दोन ते कुमार । एक होता थोर, एक बाळ ॥१॥
जाणता जो थोर, जाहला तो कर्ता । पावे स्वतंत्रता गृह वित्त ॥२॥
स्वयें भवसिंधु तराया चालला । नमुनी मातेला, निघाला कीं ॥३॥
माता म्हणे नको, जाऊं बा एकटा । "काय मी धाकुटा आहे?" म्हणे॥४॥
निघाला घेवोनी धन रत्नें गांठीं । भवाब्धिचे कांठीं पावला तो ॥५॥
मनांत विचारी कैसा हा तरावा । प्रज्ञाना लंघावा गुरुकृपें ॥६॥

( २ )

म्हणे धनादिक सांगातीं घेईन । तरी मी बुडेन तरों जातां ॥१॥
धनदारादिक तेव्हां त्याग करी । घट्ट कास मारी वैराग्याची ॥२॥
अहंब्रह्मवृत्ति होडकें घेतलें । शमादिक वल्हें घेई हातीं ॥३॥
ऐशा सामग्रीनें तराया लागला । दृष्टिपथीं आला परतीर ॥४॥
समीरण सुटे विषय जोरांत । प्रज्ञा म्हणे मात पुढें ऐका ॥५॥

( ३ )

सांगातीं सद्गुरु सुकाणु नव्हतें । तेंव्हा झंझावातें वाहो लागे ॥१॥
वाहतां जोरानें अहंता खडकीं । नावेनें धडकी दिली पहा ॥२॥
क्षणें एक नांव जळांत बुडालीं । तेंव्हां घेई वल्हीं आधारासी ॥३॥
आसक्ति भोंवऱ्यामधें तो सापडे । प्राणांसीं सांकडे झालें तेव्हां ॥४॥
ऐसा बाहुबळें तरतां बुडाला । पुन्हां जन्मा गेला प्रज्ञा म्हणे ॥५॥

(४)

बालक दादासी निघाला पाहोनी । म्हणाला घेवोनी जाई मज ॥१॥
आई म्हणे नको त्याचे पाठीं जाऊं । आहे मोठा बाऊ वाटे मध्यें ॥२॥
चुकवोनि मातें बाळही निघाला । परी धावायाला शक्ति नाहीं ॥३॥
चहुंकडे पाहे सुटे त्याचा धीर । होवोनी अधीर रडों लागे ॥४॥
पडे, उठे, रडे 'रामाई रामाई'। सुचेना त्या काई आईवीण ॥५॥
जन पुसताती सांग तूं कोणाचा । आई आई वाचां नेत्रींजळ ॥६॥
शान्तवाया जन खाऊ खेळ देती । तयासी पुसती नाम, ठाव ॥७॥
प्रज्ञा म्हणे 'आई' विण तो बोलेना। खेळादि रुचेना त्यासी कांहीं॥८॥

(५)

येथें बालकासी माता शोधुं लागे । व्यग्र अनुरागें, उतावीळ ॥१॥
संत- मुखें वार्ता मातेसी लागली । सांडोनि धावली सर्व मागें ॥२॥
दुरोनि पाहिला रडे ' आई आई '। धावोनिया आई धरीं पोटीं ॥३॥
पटा पटा मुखे घेतसे तयाचे । पुसले नेत्रींचें नीर वस्त्रें ॥४॥
'म्हणे बाळा कां रे सांडोनि आलासी!'। नेत्रींचे जळासी, स्नान घाली॥५॥
"छकुल्या आराम, नाहीं तुजवीण । तुज उन्ह तान्ह, सोसवेना ॥६॥
क्षणभरि तुझा लाडक्या विरह । माझे देहीं दाह लागे चिंता ॥७॥
म्हणे रे तान्हुल्या लागे तुज भूक" । प्रेमें पयकूप, वाहे प्रज्ञा ॥८॥

(६)

बाळ म्हणे-दादा गेला मज नेई । तेव्हां म्हणे आई "रहूं नको ॥१॥
तुझे बा ! चालतां दुखतील पाय । वाटेंत अपाय आहे बहु ॥२॥

नको चालू बाळा!" घेई पाठीवरी । प्रेमाचे पदरीं बांधोनिया ॥३॥
बाळासीही तेव्हां कांहीं मातेविण । विश्वामध्यें अन्य गोड नाहीं ॥४॥
बाळ "आई आई" मुखें म्हणे सदा । नाहीं त्या आपदा, प्रज्ञा म्हणे ॥५॥

(७)

माता सर्वेश्वर, सर्वशक्तिमंत । बाळासी क्षणांत पार नेई ॥१॥
ऐसे लळे माता, बाळाचे पुरवी । प्रेमाची थोरवी कोण वर्णी ॥२॥
स्मरे बाळ माता, बाळही मातेला । वेधही लागला परस्परां ॥३॥
बाळक निश्चिंत अंकीं जननीचे । तयासी कोणाचें भय नाहीं ॥४॥
पदोपदीं माता, रक्षी वेळो वेळां । भोगावा सोहळा प्रज्ञा म्हणे ॥५॥

(८)

जरी माता पुन्हां परत नेईल । तरी ही होईल भलें त्याचें ॥१॥
जेथें बाळ जाई तेथें माय पाठीं । हिंडते कपाटीं नाना लोकीं ॥२॥
जेथें जाई तेथें मातेसी आठवी । विश्वांत साठवी मातृप्रेम ॥३॥
तया वाटे माता सर्वत्र राहाते । हांकेसी पावते, लागवेगें ॥४॥
प्रज्ञा म्हणे राम माता ज्या जोडली । तयाची मोडली सर्व भीति ॥५॥

(९)

भवाचा सागर तराया नुगला । भावानें सूकला राम—नामें ॥१॥
सुकला तो पुन्हां भरला न जाय । बुडण्याचें काय भय तेथें ॥२॥
बालक होवोनी मातेच्या आधारीं । हिंडतां कांतारी भय नाहीं ॥३॥
प्रेम राम—माता येथें जो जोडील । तया ओसंडील ऐसी नाहीं ॥४॥
करी लोभें प्रीति प्राकृत जी माता । रामाची तत्त्वतां हेतुवीण ॥५॥
प्रज्ञा ! हेतुवीण नामी जो रंगला । तयाचा भंगला धोका सर्व ॥६॥

(१०)

गुरू राम दोन्ही एकरूप जाणां । भेदाची भावना तेथें सोडा ॥१॥
पुण्यगिरि शुद्ध मेरुसम वाढी । राम माता जोडी तेव्हां होय ॥२॥
रामकृपें भेटी रामरूप गुरु । तेव्हां हा संसारु मिथ्या होय ॥३॥
गुरु जागवीती स्वप्नींचा घाबरा । दुःख नाश पुरा, शान्तिलाभ ॥४॥
प्रज्ञानंद गुरु-पायीं नम्र भावें । ऐक्यरूप जीवें उरेना कीं ॥५॥

— हरिः ॐ तत्सत् —

---

## भोजन–विधि

( सर्व–साधन–सार–स्तोत्र )

मालिनी--

पुनरपि न मिळे ही मानवी शुद्ध काया ।
जरि नर मळवी ही भोग--पंकांत वाया ॥
अगणित तरि गुंजा घेइ चिंतामणीनें ।
रुचिर कनकपात्रीं तो शुभा विक्रया नें ॥१॥
नरतनुविण कांहीं मोक्ष सोपा न कोठें ।
सुरतनु मिळतांही मोक्ष–सोपान कोठें ? ॥
म्हणुनि विषय साटीं वेंचितां भाग्य खोटें ।
शरण हरिपदीं जें नेइ तें भाग्य मोठें ॥२॥

विषय–मलिन–वस्त्रें चित्त गुंडाळलें जों ।
गृह--सुत–धन–दारा यामधें गुंतलें जों ॥
निज–वपुवरि आहे लोभही लागला जों ।
मुखभर निजबोधा जल्पत्यां लाज लाजो ॥३॥

जळिं फळ विटपाग्रीं पाहुनी पक्क नाना ।
क्षुधित बहुदिनांचा धावला शीघ्र खाण्यां ।
शमन जरि भुकेचें बिंबलेल्या फळानें ।
तरि नच सुख देते ज्ञानवार्ता मुखानें ॥४॥

तनु–सुख--दुख लाभे पूर्वकर्मानुसारें ।
यश–अपयश, हानी लाभ तेवींच सारें ।
क्षणिक गणुनि येथें सर्व "मी तूं"–पसारा ।
स्मरुनि हरिपदाला घालवी ताप सारा ॥५॥

हरिगुण हरिनामा चिंतितां सानुतापें ।
अमित दहन होतीं सर्व पूर्वील पापें ।
सकल अघ विनाशें जानकीनाथभक्ती ।
अविरल उपजे दे; द्वंद्व–मोहादि--मुक्ती ॥६॥

अघगिरि निवटाया काम-लोभां कुटाया ।
विषयरसिं विटाया मृत्युभीती खुटाया ।
हरिपदिं-चिनटाया शान्ति वित्ता लुटाया ।
रघुपतिगुणनामा–वीण ते कष्ट वाया ॥७॥

हृदय वसन ओळें काम–चांडाळ–संगें ।
बहुत मलिन काळें, जाहलें भोग रंगें ।
करुनि विहित कर्मा सांग निष्काम-योगें ।
हरिपदिं फल अर्पा सर्वही सानुरागें ॥८॥

प्रभुपदरतिगंगा–शुद्धवारिप्रवाहीं ।
सतत भजन निष्ठें घासितां ध्यानडोहीं ।
हृदयपट पुराणा सर्व सांडोनि जंग ।
विमल उचित होतें द्यावया ज्ञानरंग ॥९॥

विविध–विषय–लेखें पत्र जें कुट्ट काळें ।
कुशल वरि चितारी चित्र काढी निराळें ।
नयनिं तरि दिसेना मोद चित्तीं भरेना ।
मलिन हृदय–पत्रीं ज्ञानरेखा धरेना ॥१०॥

मलिन असित वस्त्रीं रंग दूजा बसेना ।
मलिन विषय भित्तीं चित्र कीं काढवेना ।
रजमलिनकुपात्रीं दुग्धहो नासतें कीं ।
विषयमलिन चित्तीं ज्ञान तें बाधतें की ॥११॥

प्रथम झटुनि शुद्धी चित्तवस्त्रा करावी ।
धरुनि सुजन संगा किल्बिषें हीं हरावीं ।
गुरुवरपदिं भावें ब्रह्मबुद्धी धरावी ।
नव-विध भजनानें जन्मचिंता त्यजावी ॥१२॥

रघुवर सुहृदाला नित्य चित्तीं धरावें ।
स्थिर चर जग त्याचें रूप हें आठवावें ।
कधिं पर-गुणदोषां अंतरीं नाठवावें ।
त्वरित तरिच येथें मुक्ति सायुज्य फावे ॥१३॥

निशिदिन यतचित्तें नाम यज्ञा करावें ।
विमल गुरुपदाब्जा एकनिष्ठें धरावे ॥
विरति अनलिं कामा होमुनी ज्ञानमंत्रें ।
स्वरति-वसन[1] नेसा सोवळें व्हा स्व-तंत्रें ॥१४॥ १ आत्मप्रीति

विविध-विषय-चूर्णे रंगवल्ली भरावी ।
हरि-पद-रति-पात्रा कांचना, मध्य ठेवी ॥
गुरुवच-दृढनिष्ठा हेमपाटीं बसावें ।
नियत-सुमति-धूपा शुद्धशा पेटवावें ॥१५॥

सकलतनुगतोऽहं ब्रह्म हा दीप दावा ।
स्थिरचिर निजशांती चंदना भाळिं लावा ।
अनुहत दशवाद्यीं मानसा शुद्ध ठेवा ।
स्वसुख रुचिर मेवा भक्ति पक्वान्न जेवा ॥१६॥

अखिल जगतिं आहे मीच संकल्प सारी ।
करि मग परिषेका द्वैत निःशेष वारी ॥
मजमधिं जग आहे ध्याऽमृतोपस्तराया ।
जग मृगजळ रामीं ध्या सुधा पोशना या ॥१७॥

जय जय रघुवीरा राघवा रावणारे ।
जयजय रणधीरा रामचंद्रा मुरारे ॥
जयजय यदुवीरा यादवा माधवारे ।
तवपदिं रति देई नित्य शुद्धा म्हणारे ॥१८॥
जलज विमल नेत्रा नीलनीराब्ज वक्त्रा ।
कमलमृदुलगात्रा षड्गुणैश्वर्य पात्रा ।
भवभय हरणाला भक्तसंरक्षणाला ।
प्रमुदित करि पायीं 'प्रज्ञ' पद्यार्पणाला ॥१९॥

— श्रीरामचन्द्रार्पितमस्तु —

---

## —श्रीकृष्ण-नामावलि—

( कटाव—ताल केरवा )

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अगुण अरूपा | कृष्ण | कृष्ण जय | ९ | क्षत्रकुलांतक | कृष्ण | कृष्ण जय |
| २ | सगुण अरूपा | ,, | ,, | १० | दशास्यमर्दन | ,, | ,, |
| ३ | सगुण सरूपा | ,, | ,, | ११ | रोहिणिनंदन | ,, | ,, |
| ४ | मत्स्यरूपधर | ,, | ,, | १२ | सच्चित्सुखमय | ,, | ,, |
| ५ | भूमीरक्षक | ,, | ,, | १३ | विठ्ठलरूपा | ,, | ,, |
| ६ | धरोद्धारणा | ,, | ,, | १४ | अश्ववाहना | ,, | ,, |
| ७ | नरहरिरूपा | ,, | ,, | १५ | सर्वसुरस्तुत | ,, | ,, |
| ८ | बटुस्वरूपा | ,, | ,, | १६ | देवकितनया | ,, | ,, |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | वसुदेवात्मज | कृष्ण | कृष्ण जय | ३८ | गूढ-विलासा | कृष्ण | कृष्ण जय |
| १८ | काराजनना | ,, | ,, | ३९ | अजिर-विहारिन् | ,, | ,, |
| १९ | गोकुलगमना | ,, | ,, | ४० | सुदीर्घबाहो | ,, | ,, |
| २० | गोपी तनया | ,, | ,, | ४१ | अरुणोत्पलपद | ,, | ,, |
| २१ | नन्द-नंदना | ,, | ,, | ४२ | कंजरुचिरकर | ,, | ,, |
| २२ | गोकुल सुखदा | ,, | ,, | ४३ | कमलरम्यमुख | ,, | ,, |
| २३ | दुष्ट विमर्दा | ,, | ,, | ४४ | कोमलचणा | ,, | ,, |
| २४ | पूतनांतका | ,, | ,, | ४५ | नवनीतप्रिय | ,, | ,, |
| २५ | शकट-विनाशन | ,, | ,, | ४६ | बालसुहृत् प्रिय | ,, | ,, |
| २६ | तृणावर्तहन् | ,, | ,, | ४७ | मोहकवचना | ,, | ,, |
| २७ | विश्वदर्शका | ,, | ,, | ४८ | गोपीमोहन | ,, | ,, |
| २८ | रिंगणशीला | ,, | ,, | ४९ | मुनिमनरंजन | ,, | ,, |
| २९ | धूलिधूसरा | ,, | ,, | ५० | गोपीत्रासक | ,, | ,, |
| ३० | कमलकोमला | ,, | ,, | ५१ | गोपी तोषक | ,, | ,, |
| ३१ | नीरद-नीला | ,, | ,, | ५२ | नयन-मनोहर | ,, | ,, |
| ३२ | कौस्तुभधारिन् | ,, | ,, | ५३ | गोपी प्रियकर | ,, | ,, |
| ३३ | जलजविलोचन | ,, | ,, | ५४ | कलहोत्पादक | ,, | ,, |
| ३४ | शशिकरवदना | ,, | ,, | ५५ | मृत्स्नाभक्षक | ,, | ,, |
| ३५ | सुकुन्दयदना | ,, | ,, | ५६ | ताडनभयधर | ,, | ,, |
| ३६ | निशिकर-हासा | ,, | ,, | ५७ | विश्वनिदर्शक | ,, | ,, |
| ३७ | कृष्णकुन्तला | ,, | ,, | ५८ | मातृविमोहक | ,, | ,, |

५९ भांड विभंजक कृष्ण कृष्ण जय  
६० दामनिबंधन ,, ,,  
६१ यमलार्जुनहर ,, ,,  
६२ निर्जर--सुष्टुत ,, ,,  
६३ वृन्दावनगत ,, ,,  
६४ वत्सपालका ,, ,,  
६५ वेणु-अधर-धर ,, ,,  
६६ पीतांबरधर ,, ,,  
६७ केकिपिच्छधर ,, ,,  
६८ वेत्र—यष्टिधर ,, ,,  
६९ विषाणवादक ,, ,,  
७० श्रीवत्सांकित ,, ,,  
७१ वत्सासुरहन् ,, ,,  
७२ बकविध्वंसन ,, ,,  
७३ अघनिर्दालन ,, ,,  
७४ शाद्वलभोजन ,, ,,  
७५ वत्स—वेषधर ,, ,,  
७६ वत्सप—रूपा ,, ,,  
७७ चतुरानन-नुत ,, ,,  
७८ धेनुक--मर्दन ,, ,,  
७९ ताल—फलाशन ,, ,,  
८० स्वीयोज्जीवक कृष्ण कृष्ण जय  
८१ कालिय--मर्दक ,, ,,  
८२ दाव—विनाशक ,, ,,  
८३ सुहृत्--सुरक्षक ,, ,,  
८४ अनल-पानकर ,, ,,  
८५ वर्षा--क्रीडन ,, ,,  
८६ मुरली--मोहक ,, ,,  
८७ गोपी--गीता ,, ,,  
८८ गोप्यंबरहर ,, ,,  
८९ गोपी—वरदा ,, ,,  
९० ऋषिपत्नी प्रिय ,, ,,  
९१ गिरिमखकारिन् ,, ,,  
९२ गोवर्धन—धर ,, ,,  
९३ इन्द्रमदापह ,, ,,  
९४ कृताभिषेचन ,, ,,  
९५ गोविन्दाभिध ,, ,,  
९६ नन्दानयना ,, ,,  
९७ स्वधाम--दर्शक ,, ,,  
९८ रासक्रीडन ,, ,,  
९९ गोपीमार्गित ,, ,,  
१०० गोपीप्रार्थित ,, ,,

| | | | |
|---|---|---|---|
| १०१ गोपीसान्त्वक | कृष्ण०जय | १२२ शिलतोशलहन् | कृष्ण०जय |
| १०२ गोपीरञ्जक | ,, ,, | १२३ कंसासुरहन् | ,, ,, |
| १०३ वनकेलि प्रिय | ,, ,, | १२४ पितरौ मोचक | ,, ,, |
| १०४ नन्द-विमोचक | ,, ,, | १२५ पित्राभिवादक | ,, ,, |
| १०५ शंखचूडहन् | ,, ,, | १२६ पित्रालिंगित | ,, ,, |
| १०६ अरिष्ट-नाशक | ,, ,, | १२७ जननी सांत्वक | ,, ,, |
| १०७ केशिविमर्दक | ,, ,, | १२८ उग्रस्थापक | ,, ,, |
| १०८ सेतु--सुरक्षक | ,, ,, | १२९ नन्दसुसांत्वक | ,, ,, |
| १०९ व्योमासुरहन् | ,, ,, | १३० कृतोपनयना | ,, ,, |
| ११० अक्रूरस्तुत | ,, ,, | १३१ गुरुकुलवासिन् | ,, ,, |
| १११ मथुरागामिन् | ,, ,, | १३२ गुरुसेवारत | ,, ,, |
| ११२ रजक-विनाशन | ,, ,, | १३३ सांगवेदवित् | ,, ,, |
| ११३ वायक-भूषित | ,, ,, | १३४ शंखासुरहन् | ,, ,, |
| ११४ सुदाम–वरदा | ,, ,, | १३५ गुरुसुतदायक | ,, ,, |
| ११५ अंगविलेपन | ,, ,, | १३६ नंदशोकहर | ,, ,, |
| ११६ कंसानुगहन् | ,, ,, | १३७ कुब्जाप्रियकर | ,, ,, |
| ११७ कुवलय-घातिन् | ,, | १३८ पृथाशोकहर | ,, ,, |
| ११८ अंबष्टांतक | ,, ,, | १३९ दुष्टनृपांतक | ,, ,, |
| ११९ दंतोत्पाटक | ,, ,, | १४० सिंधुदुर्गकृत् | ,, ,, |
| १२० चाणूरान्तक | ,, ,, | १४१ यदु-कुलरक्षक | ,, ,, |
| १२१ मुष्टिकमर्दक | ,, ,, | १४२ मागधमदहर | ,, ,, |

१४३ यवन पलायित, कृष्ण. जय
१४४ यवन-विनाशक ,, ,,
१४५ रुक्मिण्याहर ,, ,,
१४६ रुक्मिविरूपक ,, ,,
१४७ प्रद्युम्नांगज ,, ,,
१४८ शंबरघातिन् ,, ,,
१४९ मणिमार्गणपर ,, ,,
१५० जाम्बवती-धव ,, ,,
१५१ सत्याकरधर ,, ,,
१५२ भौम-विनाशन ,, ,,
१५३ कन्या-प्रापक ,, ,,
१५४ पारिजातहर ,, ,,
१५५ रुक्मिणि-कोपक ,,
१५६ पुत्रपौत्रयुत ,, ,,
१५७ गदाचक्रधर ,, ,,
१५८ रुक्मिविनाशन ,, ,,
१५९ बाणबाहुभिद् ,, ,,
१६० ज्वररुद्रस्तुत ,, ,,
१६१ नृगनृपमोचक ,, ,,
१६२ यमुनाकर्षक ,, ,,
१६३ पौड्रकासुहर ,, ,,

१६४ काशीपतिहन् कृष्ण० जय
१६५ सुदक्षिणांतक ,, ,,
१६६ द्विविदविनाशक ,,
१६७ सांब विमोक्षक ,, ,,
१६८ गृहस्थ चरिता ,, ,,
१६९ नारद-सुष्टुत ,, ,,
१७० जरासुतांतक ,, ,,
१७१ भूपविमोचक ,, ,,
१७२ अग्रेपूजित ,, ,,
१७३ शिशुपालांतक ,, ,,
१७४ कलह-प्रेरक ,, ,,
१७५ शाल्वविमर्दक ,,
१७६ तीर्थ-निषेवक ,, ,,
१७७ सुदाम-पूजक ,, ,,
१७८ पृथुक-मुष्टिभुक् ,, ,,
१७९ सर्वैश्वर्यद ,, ,,
१८० कुरुक्षेत्रगा ,, ,,
१८१ सुह्वत्प्रियंकर ,, ,,
१८२ जनकानिबोधक ,, ,,
१८३ जननी–पुत्रद ,, ,,
१८४ अर्जुनेष्टकर ,, ,,

१८५ मिथिलागामिन् ,, ,,
१८६ भक्तप्रियकर ,, ,,
१८७ वेदाभिष्टुत ,, ,,
१८८ रुद्रविमोचक ,, ,,
१८९ सर्वदेववर ,, ,,
१९० विप्रसुतार्पक ,, ,,
१९१ पाण्डवरक्षक ,, ,,
१९२ विजयिसारथे ,, ,,
१९३ जिष्णुमोहहर ,, ,,
१९४ पांडवराज्यद ,, ,,
१९५ उद्धवबोधक ,, ,,
१९६ यदुकुलनाशक ,, ,,
१९७ हृदयनिवासिन् ,, ,,
१९८ सर्वशक्तिधर ,, ,,
१९९ विश्वव्यापक ,, ,,
२०० विश्वरूपधर ,, ,,
२०१ अजादि जनका ,, ,,
२०२ त्रिगुणातीता ,, ,,
२०३ अनंत गुणयुत ,, ,,
२०४ भक्तापद्धर ,, ,,
२०५ भक्तोद्धारक ,, ,,
२०६ धर्मस्थापक ,, ,,
२०७ सर्वभूतहित ,, ,,
२०८ दिव्यनामगुण ,, ,,
२०९ सद्गुरु-रुपा ,, ,,
२१० भवभयभंजन ,, ,,
२११ निजपददायक ,, ,,
२१२ प्रज्ञा सुखकर कृष्ण कृष्ण.

---

## – आरती सद्गुरुची –

जय जय परात्परा बोधमया स्वामी सद्गुरु सदया ।
भावें तुजवरुनी ओवाळूं कारण आणी कार्या ॥ धृ० ॥
माया-मोहनदी घोर अती जीव पडे आवर्तीं ।
काम-क्रोध रिपु थोर किती जळचर दुर्धर खाती॥ १॥

८०३६

जप-तप-योगादी विधिकर्में साधन विविधा नेमें ।
करितां सुटती ना जों प्रेमें, सेविति ना पदपद्में ॥२॥
नामाच्या नौकें बसवीशी ज्ञान वल्हें-करि देशी ।
सद्गुरु नाविक तूं जैं होशी परतीरातें नेशी ॥३॥
नाना पंथ जगीं विवादिती जीवातें भ्रमवीती ।
बोधुनि सार तया तूं अंती वारिशि भव-दवखंती ॥४॥
चरणामृत-वारी अघहारी वचन रवी तम वारी ।
करिशी कृपा जरी, मुक्ति तरी पायीं लोळति चारी ॥५॥
विविधा मति वृत्ति या वाती श्रद्धा घृत शुभ वरती ।
प्रेमें पेटविली त्वा हातीं विमळ ज्ञानज्योती ॥६॥
स्थिरचर या लहरी तुजवरती विभो विहारा करती ॥
होता कृपा तुझी शुद्धमती ज्ञानें पावति शान्ती ॥७॥
प्रज्ञाना, भक्ति तवचरणीं दे भव सरिता तरणी ।
तव गुण गण गानीं मनवाणी चित्तहि विरमो ध्यानीं ॥८॥

---

## – आरती श्रीरामाची –

( चाल:- भुवन सुन्दराची )

आरती रघुवर रामाची । संसृति ताप विरामाची ॥ध्रु०॥
नारायण जो परमात्मा । अन्तर्यामी जीवात्मा[२] । स्थापाया तो श्रुतिधर्मा[३] । प्रगटे दशरथ नृपधामा । प्रभु सुखवाया अमरनरा

चाल–मनुजरूपधर । पितरां सुखकर । बंधुप्रियकर, । दयासागराची सेवकभवभयभंगाची ॥ १ ॥ मारीचादिकसंहर्ता² । मुनिमखरक्षण-जो कर्ता । पथिमुनि नारी उद्धर्ता । धनुमखि सीतेचा भर्ता । भार्गव दर्पविमर्दकरी । चाल– पित्राज्ञेवरि । गमन वनीकरि । पूजित मुनिवरि । गूहक मित्राची । लक्ष्मण सीता सहिताची ॥२॥ त्रिशिरा–खर दूषण वधिले² । चौदा सहस्र निवटीले² । पावन दंडक वन केले । रावण जानकीस हरता² । चाल-- विरहाकुल अति । सेवित कपिपति । वाली असुहति । सिंधुबंधकाची । शरणागतार्ति हरणाची ॥३॥ निशिचर पतंग पावकहा² । रावण वारण सिंह महा² । सुरपति सुरनर मुनि भयहा² । बिभिषण केला भूप पहा । सीता विरहानल विझवी² । चाल– कपिसंजीवन । पुष्पक वाहन । भरतामीलन कोसल भूपाची । प्रज्ञास्वामी रामाची । आरती रघुवर रामाची ॥४॥

जयजय रघुवीर समर्थ

---

## आरती–तुळजेची

आरती जय जय तुळजेची । भवानी देवि अंबिकेची ॥धृ॥ राखी धर्माची लज्जा² । रघुवर वरदा जी तुळजा । नाना रूपधरा गिरिजा² । प्रगटे यमुनाद्री सहजा । जी कां करुणेची खाणी² चाल–अगजगजननी । असुर मर्दिनी । सौख्यदायिनी । दीनोद्धारिणिची नाना बीज रूपिणीची ॥१॥ चक्री वास करी शक्ती² । सोहं मंत्र

मया जपती[२] । अजपा रूप मनीं ध्याती[२] । निगमीं कुंडलिनी म्हणती । दुर्गा अहंकार मारी ।[२] चालः– विश्वरूपश्वर देविचराचर । विधि हरि हर सुर । गाति कीर्ति जीची । नवाक्षर मंत्र रूपिणीची आरती ॥२॥ लक्ष्मी सात्त्विक ऱ्हीं बीजा । राजसवाणी ऐँ उमजा । तामस काली क्लीं समजा । कल्पनातीत देवि तुरजा । विद्याशोक मोहहारी[२] । जननावनकर । मनवाणी पर । दे रति सत्वर । रघुपति चरणांची । विनंती ही प्रज्ञानाची । आरती जय जय तुळजेची । भवानी देवि अंबिकेची ॥३॥

---

## –आरती दत्ताची--

जय जय देवा दत्तात्रेया अनसूया तनया ।
दीन वत्सला कृपा करावी प्रभु कोमल हृदया ॥धृ०॥
गुणातीत जो जीव जाहला ज्ञानें, अत्रि मुनी । जाहला—मुनी ।
नसे असूया जिला बुद्धि ती अनसूया पत्नी ॥१॥
पातिव्रता ती सदा विनटली पाहुनि पतिचरणीं । पाहुनि—चरणी
अहं–चित्तमति देव ठाकले तिच्या सत्वहरणीं ॥२॥
आत्मपतीवाचुनी सती मति इतरीं रत नाहीं । इतरीं – रतनाही ।
कुरंगनीरीं पतंग किरणां, तरंगि जल पाहीं ॥३॥
अव्यभिचारिणि भक्ति अशी ही दत्तरूप दिसली । अशी—दिसली
अन्वयबोधें सुतरूपानें सती–सदनिं वसली ॥४॥

अशा भक्तिचे करिशि दान तूं स्वयें म्हणुनी दत्त । स्वयें—दत्त ।
रूप चिंतितां चित्तिं रूचेना रुचिर पित्त वित्त ॥५॥

त्रितापहरणा अत्रितनय तूं त्रिशूल करि धरशी । देवा त्रिशूल– ।
करिं धरशी । कमंडलूच्या ज्ञान सुधेचें प्रभु सिंचन करिशी ॥६॥

कामक्रोधादिक षड्रिपुंना चक्रानें वधिशी । रिपूंना चक्रानें वधिशी ।
भव–गद[1]–हरणा कृपागंदा तूं दत्ताकरि धरिशी ॥७॥ १रोग

दत्त अत्रिला "प्रणवदत्त ओं" शंख रवा करिशी । शंख—-करिशी ।
सुख मकरंदा पाजायास्तव पद्मा वागविशी ॥८॥

श्रुती चारि तव गुण वर्णाया श्वानरूप धरिती-श्वान-धरिती ।
सांगति भुंकुनि गुणावर्णिता अमुची बुद्धि रिती ॥९॥

गोरूपाते धरुनि इंद्रियें धावति तुजमागें । धावति--मागें ।
मनुजा माया लागे ना जो तवपद रति मागे ॥१०॥

तूं हंसासन, तूं गरुडासन, वृषवाहन देवा ! । वृष–देवा ।
दाखविण्या हें तीन शिरांचें रूप तुम्हीं ठेवा ॥११॥

माया पितांबरें झांकिला चित्ता नाकळसी । मनुजा चित्तानाकळसि
चिंतन करितां तव नामाचें करुणाघन वळसी ॥१२॥

प्रज्ञा नयना राम सुधाकर–रुपामृत पान । देई रुपामृत—
गान नाम गुण कान वाणिनें द्या इतुकें दानं ॥१३॥

## वेदांतपर भूपाळी

(चाल—पंचतुण्ड नररुण्ड)

उठ जाग बा जीवा, वेगें निजहित साधी तूं कांहीं ।
भाग्यें नरतनु लाभ जाहला, पुनरपि मिळणें ही नाहीं ॥धृ.॥
अन्य देह ते काबाडचि कीं, घबाड नरतनु जाण तरी[1] । [1]होडी
वल्हें विवेकाचें करिं धरुनी, भवसागर हीनें उतरी ॥१॥
अविद्येचिया रात्रिमध्यें तूं निद्रा मोहाची घेसी ।
मी, माझें, हें विश्वसत्य, हीं स्वप्नें नानाविध बघसी ॥२॥
माझा म्हणसी देह तरी तूं, देह नव्हेसी हें ठरलें ।
जन्ममरण या जडदेहाचें, तुजला तें नाहीं उरलें ॥३॥
लहान मोठा, स्थूल रोडका, रोग जरादिक देहासी ।
असतां मानसि वृथा आपुले, धरुनी मिथ्या मोहासी ॥४॥
देह नव्हे मी ऐसें कळतां संबंधी या नरतनुचे ।
कसे मानिसी माझे म्हणुनी, मोह कसाहा तुज सुचे ॥५॥
आत्मा चिन्मय नित्य निरामय स्वयें तूंचि हें जाण बरें ।
देहाहंता, विषयीं ममता, सोडुनि जोडी सौख्य खरें ॥६॥
प्रज्ञाना श्री वासुदेव पादिं पूर्ण सुखाचा लाभ खरा ।
याचि विवेकानें चिर होतो, तनु लोभातें जरि विसरा ॥७॥
निद्राकाळीं देह असुनिही, ज्ञान कांहिही त्या नाहीं ।
सुखदुःखाचें भान चितेमधिं जळतां अल्प नसें पाहीं ॥८॥

म्हणुनी देह असे मड जाणुनि, तो नच आत्मा जाणावें ।
प्राणाचि आत्मा म्हणसी तरि बा अल्प विचारां ऐकावें ॥९॥
प्राण होतसे कासाविस जैं तुजला तेव्हां तो कळतो ।
प्राणहि आत्मा नसे जाण, तो क्षुधें–तृषेनें तळमळतो ॥१०॥
निद्राकाळीं प्राण आपुलें कार्य जरी बा करित असे ।
देहावरूनी भुजंग गेला इत्यादी त्या ज्ञान नसे ॥११॥
समाधिकाळीं प्राण नसुनिही, जीवित असते अवलोकीं ।
यास्तव ठरला प्राणहि जडतो, स्वयें प्राण तूं नससी कीं ॥१२॥
क्षुधातृषादिक धर्म तुझे न च ते प्राणांचे जाण तरी ।
प्रज्ञाना, श्री वासुदेव पदिं ऐक्य सुखाचा लाभवरी ॥१३॥
मन मी म्हणसी तरी विवेका सावध चित्तें ऐक जरा ।
विकल्पसंकल्पात्मक मन तें, उठे, कळे तुज शिष्य बरा ॥१४॥
माझें मन तूं म्हणसी तेंव्हां मन नससी तूं हेंचि ठरे ।
चंचळ असुनी नाही व्यापक, म्हणुनि जाणमन नश्वर रे ॥१५॥
परि मन हें तुज विषय कर्दमीं आसक्तीनें बुडवीतें ।
वश करिशी तरि तेंचि तुला बा ! नित्य सुखासनिं चढवीतें ॥१६॥
सामदान दण्डादि–योगें विरति विवेकें जिंकावें ।
प्रज्ञाना मग वासुदेव पदिं आत्मानंदीं बैसावें ॥१७॥
बाळा बुद्धिहि नससी बा तूं स्वप्न जागरा जरि जाणे ।
निद्रा काळीं लया पावते तदा कांहिही ती नेणे ॥१८॥

निद्राकाळीं अज्ञानचि हो ! असतें सद्गुरु कृपा करा ।
अज्ञानचि मम रूप वाटतें संशय मम हा प्रभो हरा ॥१९॥

अज्ञानाचें ज्ञान कुणाला निद्राकाळीं वद झालें ।
लय बुद्धीचा तेथें असतां बुद्धीला तें ना कळलें ॥२०॥

अज्ञानाचें ज्ञान जयाला झालें त्या कळण्या दुसरा ।
आत्म्याहुनि कोणीही नव्हता, म्हणुनी तूं आत्माची खरा ॥२१॥

प्रभो, सुषुप्ती माजीं असतो आनंद चि, तो भी गमतो ।
परी नसे तो व्यापक त्याला कारण आत्मा बा असतो ॥२२॥

जरि आनंदहि नसें तरी मी कांहिच नाहीं समजावें ।
कांहिं नव्हे तें शून्याचि माझें स्वरूप ठरलें ऐकावें ॥२३॥

कांहि नाहिं हें कळलें कोणां शून्याला तें कळेंचि ना ।
शून्याचें ज्या ज्ञान जाहलें ज्ञानरूप आत्मा चि गणा ॥२४॥

अन्नमयादिक पंच कोश हे व्यापुनियां जो त्या जाणे ।
सर्व अवस्थांमधें असोनी इतर कुणी त्याला नेणे ॥२५॥

कांही नाहीं हें हि जाणत्या जाणणार कैचें दुसरें ।
स्वसंवेद्य तो नसता तरि मग कोण जाणता शून्य बरें ॥२६॥

कोश अवस्था विहीन जो त्यां जाणे आत्मा जाणावें ।
प्रज्ञाना श्री वासुदेव पदिं ऐक्यातें पावे भावें ॥२७॥

सच्चित्सुखमय नित्य निरामय सर्व व्यापक आत्मा जो ।
तोचि अससि तूं दृढ हा निश्चय करितां मोहाब्धी सुकतो ॥२८॥

म्हणुनी देह असे मड जाणुनि, तो नच आत्मा जाणावें ।
प्राणाचि आत्मा म्हणसी तरि बा अल्प विचारां ऐकावें ॥९॥
प्राण होतसे कासाविस जैं तुजला तेव्हां तो कळतो ।
प्राणहि आत्मा नसे जाण, तो क्षुधें–तृषेनें तळमळतो ॥१०॥
निद्राकाळीं प्राण आपुलें कार्य जरी बा करित असे ।
देहावरुनी भुजंग गेला इत्यादी त्या ज्ञान नसे ॥११॥
समाधिकाळीं प्राण नसुनिही, जीवित असते अवलोकीं ।
यास्तव ठरला प्राणहि जडतो, स्वयें प्राण तूं नससी कीं ॥१२॥
क्षुधातृषादिक धर्म तुझे न च ते प्राणांचे जाण तरी ।
प्रज्ञाना, श्री वासुदेव पदिं ऐक्व सुखाचा लाभवरी ॥१३॥
मन मी म्हणसी तरी विवेका सावध चित्तें ऐक जरा ।
विकल्पसंकल्पात्मक मन तें, उठे, कळे तुज शिष्य बरा ॥१४॥
माझें मन तूं म्हणसी तेंव्हां मन नससी तूं हेंचि ठरे ।
चंचळ असुनी नाही व्यापक, म्हणुनि जाणमन नश्वर रे ॥१५॥
परि मन हें तुज विषय कर्दमीं आसक्तीनें बुडवीतें ।
वश करिशी तरि तेंचि तुला बा ! नित्य सुखासनिं चढवीतें ॥१६॥
सामदान दण्डादि–योगें विरति विवेकें जिंकावें ।
प्रज्ञाना मग वासुदेव पदिं आत्मानंदीं बैसावें ॥१७॥
बाळा बुद्धिहि नससी बा तूं स्वप्न जागरा जरि जाणे ।
निद्रा काळीं लया पावते तदा कांहिही ती नेणे ॥१८॥

निद्राकाळीं अज्ञानचि हो ! असतें सद्गुरु कृपा करा ।
अज्ञानचि मम रूप वाटतें संशय मम हा प्रभो हरा ॥१९॥
अज्ञानाचें ज्ञान कुणाला निद्राकाळीं वद झालें ।
लय बुद्धीचा तेथें असतां बुद्धीला तें ना कळलें ॥२०॥
अज्ञानाचें ज्ञान जयाला झालें त्या कळण्या दुसरा ।
आत्म्याहुनि कोणीही नव्हता, म्हणुनी तूं आत्माची खरा ॥२१॥
प्रभो, सुषुप्ती माजीं असतो आनंद चि, तो मी गमतो ।
परी नसे तो व्यापक त्याला कारण आत्मा वा असतो ॥२२॥
जरि आनंदहि नसें तरी मी कांहिच नाहीं समजावें ।
कांहिं नव्हे तें शून्यचि माझें स्वरूप ठरलें ऐकावें ॥२३॥
कांहि नाहिं हें कळलें कोणां शून्याला तें कळेंचि ना ।
शून्याचें ज्या ज्ञान जाहलें ज्ञानरूप आत्मा चि गणा ॥२४॥
अन्नमयादिक पंच कोश हे व्यापुनियां जो त्या जाणे ।
सर्व अवस्थांमधें असोनी इतर कुणी त्याला नेणे ॥२५॥
कांही नाहीं हें हि जाणत्या जाणणार कैचें दुसरें ।
स्वसंवेद्य तो नसता तरि मग कोण जाणता शून्य बरें ॥२६॥
कोश अवस्था विहीन जो त्यां जाणे आत्मा जाणावें ।
प्रज्ञाना श्री वासुदेव पदिं ऐक्यातें पावे भावें ॥२७॥
सच्चित्सुखमय नित्य निरामय सर्व व्यापक आत्मा जो ।
तोचि अससि तूं दृढ हा निश्चय करितां मोहाब्धी सुकतो ॥२८॥

ऐसा आत्मा स्वयें असुनि तूं भ्रमा अविद्येनें धरिसी ।
दृश्यभास नश्वर मायाकृत शाश्वत आत्मा तूं असती ॥२९॥
देह बुद्धिचा निश्चय जैसा, तेविंच आत्मा मी बुद्धि ।
दृढ होता तुज जन्मजरादिक दुःख भयादी ना बाधी ॥३०॥
तीव्र विरतिनें निदिध्यासनें तन्मय करिबा मतिवृति ।
विश्व तुझ्यामधिं, तूं विश्वामधिं बघतां तुजला वरि मुक्ती ॥३१॥
बंध कधीं ही आत्म्यालागीं नसतां, मोहें भासतसे ।
प्रज्ञाना श्री गुरूकृपामृत पानें तृप्ती लाभ असे ॥३२॥
चित्तवृत्ति एकाग्र करोनी अरुणोदयीं जे चिंतिति हीं ।
भूपाळी, ते शोका विसरुनि नित्यानंदा पावति ही ॥३३॥
इतिश्री स्वामी प्रज्ञानानंदविरचिता भूपाळी समाप्ता ।

— हरिः ॐ तत्सत् —

---

## पञ्चीकरण–स्मृतिचंद्रिका ( भूपाळी )

( श्रीमद्भगवत्पूज्यपाद श्रीमच्छंकराचार्यविरचितपंचीकरणावर
अल्प प्राकृत टीका )

मु० प्र०— जयाच्या अबोधें जगत्सर्व भासे ।
जयाच्या सुबोधें जगत् हें विनाशे ॥
तया सच्चिदानंद रूपाऽऽत्म देवा ।
नमस्कार भावें करूं वासुदेवा ॥१॥

जीव ब्रह्मैक्याची साधे समाधि अभ्यासे जेणें ।
पंचीकरणस्मृतीचंद्रिका, प्राकृत सुगम अतां करणें ॥२॥
ज्ञानावाचुनि कधिं न निवर्तें भवभय जाणावें ।
साधन रहितहि गुरुकृपेविण बोध कोण पावे ॥३॥
माया शबल ब्रह्मापासुनि, अव्यक्त वि झालें ।
अव्यक्तांतुनि महत तयांतुनि अहंकार घडले ॥४॥
अहंकृतीपासुनि मन झालें सत्वाचा अंश ।
राजसांतुनी प्राण इंद्रियें झालीं पंचदश ॥५॥
निर्मी तामस अहंकार मग तन्मात्रा पंच ।
तन्मात्रांतुनि पुढें जाहलीं महाभूत पंच ॥६॥
एकेका भूताचे केले प्रथम भाग दोन ।
ऐकार्धाचे भाग निर्मिले पुढें चार जाण ॥७॥
इतरांच्या अर्धामधिं मिळले चार भाग जेंव्हां ।
पंच महाभूतें तीं झालीं पंचीकृत तेंव्हां ॥८॥
पंचीकृत हा महाभूतगण अणि त्यांचें कार्य ।
" विराट " देती नाम तयाला, वेदांतीं आर्य ॥९॥
स्थूल देह हा आत्म्याचाही, विषयांचें ग्रहण ।
करिति इंद्रियें तदा जागृती तिजला अभिधान ॥१०॥
जागृति आणी स्थूलाचा जो धरितो अभिमान ।
त्या आत्म्याला " विश्व नाम हें देता ती सुज्ञ ॥११॥

स्थूल देह, जागृती विश्व हें तीन मिळुनि म्हणती ।
अकारमात्रा प्रणवाची ती, शास्त्रें वेदांतीं ॥१२॥
पंच अपंची कृत भूतें तीं, कार्यासह त्यांचे ।
दहा इंद्रियें प्राणबुद्धि मन चित्त अहंकृति जें ॥१३॥
लिंग—अविद्या कामकर्म हें; समूह सर्वांचा ।
हिरण्यगर्भहि सूक्ष्म देह हा जाणा आत्म्याचा ॥१४॥
लीन इंद्रियें होतां जागृति, संस्कारें येती ।
विषय प्रत्यय तदा तयाला; स्वप्न असें म्हणती ॥१५॥
स्वप्नावस्था सूक्ष्म देह या उभयहि अभिमाना ।
जो धरितो तो आत्मा तैजस असे स्पष्ट जाणां ॥१६॥
स्वप्नावस्था, सूक्ष्म देह अणि तैजस अभिमानी ।
तीन मिळोनी उकार मात्रा म्हणती जाण मनीं ॥१७॥
चैतन्याच्या आभासें युत उभय शरीरांना ।
कारण आत्माऽज्ञान चि म्हणती अव्याकृत जाणा ॥१८॥
कारण शरीर आत्म्याचें ना असत्य ना सत्य ।
सद्सत् ना हीं, अभिन्न भिन्न न, नाहीं वा उभय ॥१९॥
नसे सावयव नसे निरवयव, उभयहि वा नाहीं ।
ब्रह्मात्म्यैक्य—ज्ञानानें जें निरस्त मिथ्या ही ॥२०॥
स्वप्न जागृती ज्ञान नसुनि, मति कारणरूपिं वसे ।
सुषुप्ति जेव्हां; अभिमानी यां उभयां प्राज्ञ असे ॥२१॥

सुषुप्ति कारण देह प्राज्ञहि मिळूनिया तीन्हीं ।
मकार मात्रा प्रणवाची ती वदे शास्त्र वाणी ॥२२॥
भोक्ता कर्ता सत्त्वगुणात्मक तें अंतःकरण ।
भोग साधनें प्राणेंद्रिय गण राजस तीं जाण ॥२३॥
तमो गुणात्मक भोग्य सर्व हा विषयांचा गण जो ।
ऐशा त्रिपुटी प्रकाशितो जो विशुद्ध आत्मा तो ॥२४॥
अकार विलया करूं उकारिं मकारिं त्या विलय ।
मकार विलया ओंकारीं मी ओंकाराचि सत्य ॥२५॥
प्रणवरूप जो आत्मा तो मी केवळ चिद्घन जो ।
नित्य शुद्ध जो बुद्धमुक्त ही अद्वय आत्मा तो ॥२६॥
घनानंद मी ब्रम्ह असें ओम् ऐसें जाणोनी ।
चित्त जाणतें साक्षी माजीं विलया नेवोनी ॥२७॥
चिदात्मरूपीं चित्तलीन तरि नैव चाळवावें ।
पूर्णबोधमय आत्मरूपिं तरि पूर्ण स्थिर व्हावें ॥२८॥
असें प्रत्यगात्मा ब्रम्हाचें अभेद जें ऐक्य– ।
तीच लाभणें स्थिती म्हणावी समाधि निःशंक ॥ २९ ॥

अनुष्टुप्—वासुदेव प्रसादानें रचिलें काव्य अल्पसें ।
गुरुपादाम्बुजीं अर्पी प्रज्ञानानन्द पुष्पसें ॥ ३० ॥

—ॐ तत्सत्—

## — वेदांतपर झोपाळ्यावरील ओव्या —

पहिली माझी ओवी । नमन सद्गुरु । सारें चराचरू त्याचें रूप ॥१॥

दुसरी.... । जीव शिवद्वैत । स्वरूपीं अद्वैत । पावविलें ॥२॥

तिसरी .... ।इडादिक तीन्हीं । स्नानें या त्रिवेणी । पापे गेलीं ॥३॥

तिसरी.... । त्रिपुटीं हारपलीं । ज्ञाता ज्ञेयादिक लया गेलीं ॥४॥

तिसरी.... । सत्वरजतम । गुणातीत परम । तत्वसत्य ॥५॥

तिसरी.... । देहत्रयातीत । आत्मा तेंचि नित्य । स्व स्वरूप ॥६॥

तिसरी.... । जाग्रन्निद्रा स्वप्न । स्थितीहुनि भिन्न । तूंचि आत्मा ॥७॥

चौथी .... । परादि वैखरी । वाचा अंतचारी। तोचि आत्मा ॥८॥

चौथी.... । धर्मा दि पुरुषार्थ । ज्ञानें एक्या सार्थ । प्राप्त झाले ॥९॥

चौथी.... । अण्डजादि खाणी । जन्माची जाचणी । नष्ट झाली ॥१०॥

पांचवी ....। पंचकोशातीत । आत्मा तूंचि सत्य । आनंद घन ॥११॥

पांचवी.... । पंचमहाभूतें । लयाजाती जेथें । तोचि आत्मा ॥१२॥

पांचवी.... । पांचही विषय । मिथ्या मायामय दिसों आले ॥१३॥

पांचवी.... ।·पंचभौतिक पिंड । तैसेंचि ब्रह्माण्ड । भूत कार्य ॥१४॥

सहावी....। जन्मादि विकार। देही या संचार। आत्म्या नाहीं।॥१५॥

सहावी....। क्षुधादि शड्डर्मी । रहित आत्मा कर्मी। सांपडेना ॥१६॥

सातवी.... । सप्त कंचुक पिंड ।मायेचें थोतांड। स्वरूपीं नाहीं।॥१७॥

आठवी....। अष्टधा प्रकृति । दृश्याची विकृति । सर्व आहे ॥१८॥

आठवी....। स्वरूप आठवी । व्यर्थ उठाठेवी । करूं नको ॥१९॥

नववी ....। नवविधा भक्ति । निवेदनें मुक्ति । लाभ होय ॥२०॥

दहावी ....। दशम पुरुषापरी । आपणां विसरे जरी । क्लेश पावे ॥२१॥

दहावी....। दशमद्वारीं उभा । चैतन्याचा गाभा । गुरु राव ॥२२॥

अकरावी ....। दशेंद्रियमन । सर्वां आंवरून । शांत व्हावें ॥२३॥

बारावी....। बुध्यादिक वृत्ति । लयानें निवृत्ति- । पदीं ऐक्य ॥२४॥

तेरावी ....। तेराची अक्षरें । अखंड जो स्मरे । मुक्त होय ॥२५॥

चौदावी....। चौदाही त्या पिढ्या । उद्धरी रोकड्या गुरु-दास ॥२६॥

पंध्रावी ....। प्राणेंद्रियें धरा । उन्मनीचा करा । त्वरें लाभ ॥२७॥

सोळावी ....। सोळा कलात्मक । पुरुष सम्यक । श्रुति बोले ॥२८॥

सत्रावी ....। सत्रावीचा पूर । चाखोनीया वीर । तृप्त झाला ॥२९॥

अठरावी ....। अठरा वनस्पती । प्रिय अस्ति भाति रूप झाल्या ॥३०॥

एकुणिसावी ....। एकोणीस मुखें । जीवराज चाखे । कर्म फळ ॥३१॥

विसावी ....। स्वरूपीं विसावा । ऐक्यानें पावावा । वृत्ति त्यागें ॥३२॥

एकूविसावी....। एकाचि दिसावा । प्रज्ञा--वासुदेवां । सामरस्य ॥३३॥

स्वरूपीं विश्रांती । गेली मिथ्या भ्रांती । तुटली भेदग्रंथी । चिदाचिद्रूपा ॥३४॥

ग्रंथी भेद झाला । संशय उडाला । कर्मक्षय केला । कर्तृत्वेंसी ॥३५॥

कर्तृत्वभोक्तृत्व-भावना रहीत । प्रारब्धें घडत देहीं कर्म ॥३६॥

लिंग देहजन्म कर्मा अधिकारी । त्याचीच बोहरी । ज्ञानें झाली ॥३७॥
देहनाशा आधीं मेली ते वासना । अंतीं हो स्मरणा । काज काय ॥३८॥
संकल्पाचा नाश जेथवां जाहला । तेथवांचि झाला । अन्तकाळ ॥३९॥
मना अंत होता स्मरण कोण करी । विस्मरण तरी । कोणा होय ॥४०॥
आठ्वा विसूरावीण। उन्मनी ते जाण। वासुदेवीं प्रज्ञान। ऐक्य झालें॥४१॥

हरिः ॐ तत्सत्

---

## सदगुरुवंदन

( चाल— त्रिताल, अगर दीपचंदी )

वंदन पदकमलांना । गुरूच्या ॥ धृ० ॥
धीपति हरिहर विविध मुनीश्वर ।
वंदन करिती निर्जर नाना ॥ वंदन ॥१॥
त्या कमलांमधिं होउनि मधुकर ।
निर्मल चिद्रस करितो पाना ॥ वंदन ॥२॥
चिद्रसपानें पावुनि तृप्ती ।
मुदित मनानें करूं गाना ॥ वन्दन ॥३॥
सद्गुरु स्वामी प्रज्ञानासी ।
दावि सनातन आत्म निधाना ॥ वन्दन ॥४॥

— श्रीरामचन्द्रार्पितमस्तु —

---

॥ ॐ ॥

श्री गुरुभ्योनमः।

श्री रामचंद्रायनमः। श्री गणपतयेनमः।

श्री सरस्वत्यैनमः।

## अथ नर्कुटक रामायणे

# किष्किंधा–काण्डम्

जय जय गुरु वासुदेवा। परात्परा देवदेवा। स्मरतांचि पुरवा-स्फूर्ति ठेवा। प्रज्ञानासी ॥ १ ॥ वक्तव्य वक्ता वचन। यांतें तूंचि अधिष्ठान। स्वयें सद्गुरु सर्वज्ञ। वासुदेव स्वामी ॥ २ ॥ कृपावृष्टि करूनि संतत। अनेक वृत्तीं काव्य प्राकृत। प्रज्ञाना करूनि हेतुभूत। सृजिलेंत पूर्वीं ॥ ३ ॥ वृत्त नर्कुटक कर्णमधुर। परी वाटे अति दुष्कर। वृत्ति उठली शक्य तर। लिहावें कांहीं ॥ ४ ॥ बालकास भूक लागली। खरीच मातेला वाटली। तिनें नाहीं शमविली। नायकूं कोठें ॥ ५ ॥ श्रीसद्गुरु दिव्य जननी। निर्हेतुक प्रेमखाणी। शिशूचे कोड पुरवुनी। मोद मानी ॥ ६ ॥ म्हणोनि काव्य स्फूर्ति उठली। मध्यमा गुणगुणूं लागली। पद्यरूपें वैखरी झाली। नर्कुटक वृत्तीं ॥ ७ ॥ प्रथम पंचपद्यीं

रामगुण । वर्णितां स्फुरलें रामायण । एकादश पर्यंत अरण्य । साररूपें निर्मित ॥ ८ ॥ पुढें स्फूर्ति फांकली । विस्तारें वर्णू लागली । किष्किंधा काण्ड प्रसवली । बासष्ट श्लोकीं ॥ ९ ॥ पुढें लोटतां बहुत दिन । प्रारंभिलें सुंदर काण्ड लेखन । दोनशें पंधरा श्लोकीं पूर्ण । झालें नर्कुटकीं ॥ १० ॥ न ज भ ज ज ल ग गण । पादीं अक्षरें सत्रा जाण । यति सात दहा अक्षरीं खूण । नर्कुटक वृत्तीं ॥ ११ ॥ या वृत्ती काव्य रचना । प्राकृतांत न दिसे कोठे जाणा । गीर्वाणीं ‘ वेदस्तुति ’ रचना । मात्र आढळे ॥ १२ ॥

बहु युग कष्टती करुनि योग यमां नियमां ।
परिनच लंघिती भव सदैव सुभीत यमा ।
हरिगुणनामिं जो रत धरूनि सुसंगतिला ।
रघुवर ! तो सुखें भवनदींतुनि या तरला ॥१॥

सुखकर राम नाम भवार्सिंधुच हा सुकवी ।
खचित न मिथ्य हें वचन बोलति जें सुकवि ॥
प्रभु ! उपकार मी तव किती स्मरुं केविं हरि ।
निजपदिं नेउनी बसविलासि विमूढ तरी ॥२॥

तुजमधिं नाहिं बा ! विषमता अणुमात्र जरी ।
नर भजती जसे तुजसि तेविंच होसि हरि ! ॥
जन हृदयींच भाव जरि मायिक वागविती ।
तरि हरि ! तूंहि दूर बससीच अनंत विती ॥३॥

तनु–धन–दार–आस त्यजुनी तुज आश्रयती ।
भजसि तयांप्रती अवनिजापति त्याच पथीं ॥
मनिं रिपुभाव जे धरुनियां स्मरणा करिती ।
हरि ! अरिरूप तूं धरुनि त्यांस हि देशि गति ॥४॥

प्रभु ! अवतार तूं महिवरी विविधा धरिशी ।
चरित सुधांबुधी भवदवापह विस्तरिशी ॥
करिति तिथें निमज्जन सदा नर ते त्रिविधा— ।
तरुनि हि ताप सौख्यमय पावति मुक्तिपदा ॥५॥

जय जय माधवा प्रभुवरा असुरान्तकरा ।
जय अमरार्थिता रघुकुळीं अवतार धरां ॥
जय जय कोसिला–कुमुदिनीपति ! मोद–करा ।
जय रविवंश–वारिज–वनास विकास–करा ॥६॥

स्मर–रिपु–मानसांतर–विहारक हंस–वरा ।
मुनि–मख–रक्षका, निशिचरान्तक ! चाप–धरा ॥
मुनिवर–दार- शाप–हरणा ! धनु--भंग--करा ।
जनक--नृपात्मजा--सुखद ! भार्गव–दर्प--हरा ॥७॥
पितृ--वच--पालका रघुपते ! वन--वास–करा ।
मुनिजन–वन्दिता वनचरार्चित ! पूज्य–वरा ॥
हत--खर–दूषणा रिपु–वरूथ--विमर्द–परा ।
अरिभगिनी--विरूपक हरे ! मुनिभीति–हरा ॥८॥

वनि हरिली यदा जनकजा यतिवेषधरें– ।
निशिचर--नायकें, करिशि शोक नरां--सम रे ॥
निज--कर--पंकजा खग--जटायुशिरीं धरिशी ।
भवभय ताप वारुनि सरूप तया करिशी ॥९॥

बघुनि कबंध राक्षस, तया गति देशि हरे ! ।
“ प्रिय मज सर्वदा द्विज ” असें उपदेशिसि रे ॥
शबरिसि भेटुनी वनफळें अति खाशि मुदा ।
नवविध भक्ति--बोध करुनी, निज देशि पदा ॥१०॥

नहि तव चित्तिं भेद अधमोत्तम जाति जरा ।
भजति अनन्य त्यां सम चि मानिसि नारि–नरां ॥
तवमय विश्व जे बघति ते तुज आवडती ।
इतर समस्त अंतक--मुखांत चि सांपडती ॥११॥

वनिं कपि अंजनीतनय दर्शन घेइ यदा ।
सकल सुकंठ–संकट वदे विविधा विपदां ॥
“ करुनि कृपा प्रभो ! कथिशि सख्य ” म्हणे ‘ करणें ’।
तरि मग जानकी–विरह–सिंधु सुखें तरणें ” ॥१२॥

मग उभयांसि नेइ उचलूनि कपीश्वर[1] तो ।
अनल समीप ठेउनि सुसख्य तयां करितो ॥
विषमहि ताल सप्त इषु एकचि पाडि पहा ! ।
पदनख आस्थिशैल उडवी कपि–तोष महा ॥१३॥

1 मारुती

प्रभु–शर वालिचे हृदयिं एक चि लागत तो– ।
धरणिवरी पडे प्रभुसि ओळखुनी वदतो ॥
" प्रभु ! अवतार आपण धरां जगिं धर्म–हिता ।
लपुनि मला पशूसम तरी हरि ! कां वधितां " ॥१४॥

" अनुजवधू तशा तनुजदार[1] सुता भगिनी ।      १ सून.
बघ शठ ! कन्यके सम सदैव हि चारि जणी ॥
बघति कुदृष्टिनें जरि तयांस जगीं कुणिही ।
वधुनि न दोषभाजन अशांस बने नृपहि " ॥१५॥

श्रवण करूनि राम–वचनां मग वालि वदे– ।
" अघमय मी ! जरी मरणकाळिं हरीस बघें ? " ॥
शिरिं कर ठेवुनी कमल–कोमल राम म्हणें– ।
" अचल करूं तनू तुज जरी जगतीं जगणें " ॥१६॥

परिसुनि, वालि वंदुनि वदे " रघुवीर पहा– ।
ऋषि मुनि वांछिती वदनिं नाम चि अंतिं अहा ! ॥
परि नच आठवे ! कुठुनि तूं दिसशील तयां
हरि ! नयनीं तुला सुभग मी बघतो सदया ॥१७॥

पुनरपि योग या कधिं न येइ नृपोत्तम हा ।
कपितनु ही तरी जगवुं राम किमर्थ पहा ! ॥
तव करिं अंगदा मम सुतासि समर्पण मी – ।
करुनि रुमान ज़ो मम, पदांबुज हें प्रणमीं ॥१८॥

जगतिं पुढें मला स्वकृत–कर्म–गुणें तनु जी ।
सहज मिळे तिथें तव घडो मज संगति जी ! ॥
तवगुण–नाम–गायन रुचो मजला प्रभुजी ।
विनति पदीं तुझे करित मी इतुकी, न दुजी" ॥१९॥

प्रभु–मुख पाहतां वपु--विसर्जन वालि करी ।
पतिनिधना बघूनि गृहिणी अति शोक करी ॥
सकल हि शोक, बोध करुनी रघुराज हरी ।
कपिपतिसी म्हणे "त्वरित अंत्यविधी हि करी" ॥२०॥

मग अनुजासि धाडुनि कपी हि समस्त पुरीं– ।
नृपति–पदीं सुकंठ बसवूनि सुखा वितरी ॥
करवुनि अंगदासि युवराज, भयासि हरी ।
मग वसती प्रवर्षण गिरीवरि राम करी ॥२१॥

गिरिवरि राम बंधुसि सुबोध करी विविधा ।
बसवि सुखालयीं, निजपदी, हरुनी त्रिविधा ॥
क्रमुनि सु–वृष्टिकाळ शरदागम होइ जसा ।
नर--सम मैथिली विरह–शोक–दवातुरसा ॥२२॥

शरद सरे, स्मरे परि हरीश[1] न कार्य जरा, ।
विषय विलास, दार--रति, पाडि पहा ! विसरा; ॥
जंववरि इष्टलाभ तंव तों सुहृदां स्मरती ।
जन पुढतीं समस्त उपकार चि विस्मरती ॥२३॥

१ सुग्रीव.

जगांतं कृतघ्नते--सम नसे अघ हो ! दुसरें ।
क्षण नच वैद्यराज अठवे जइं रोग सरे ॥
प्रभु, वरि कोपयुक्त अनुजासि म्हणे बघ हा ।
समय[1] चुके कपीश्वर वधीन तयासि पहा ॥२४॥ १ प्रतिज्ञा.

परिसुनि भाषणा अनुज भक्त बहू खवळे ।
रघुवर हेतु मानस तया न खराचि कळे ॥
" वधुनि " म्हणे " कपीस पुरनाश करूं स्वबळें "
चढवुनि मार्गणा[2] धनुवरी नगरीस वळे ॥२५॥ २ बाण

सु--हृदय बोलती प्रभु, " कपीश सखा स्मर तो ।
भरत समान मान अनुजा ! जरि विस्मरतो ॥
हित मित बोधुनी सुपथिं शीघ्र सख्या वळवी ।
सुहृद--वधें न हंस--कुळ--कीर्तिस बा मळवी ॥२६॥

विमल मुनीश--मानसिं विमोह महा उपजे ।
निशिदिन कष्टती दृढ करूनि महा तप जे ॥
अनुज ! सुदुस्तरा गुणमयी मम जाण अजा[3] । ३ माया.
विषयरती--गुणें भ्रमविते दिविजां[4] मनुजां ॥२७॥ ४ देवांना

रविसुत[5] तों कपी, सहज चंचळ बुद्धि जयां । ५ सुग्रीव.
नवल न मोह त्या भ्रमवुनी मिळवी विजया ॥
शरण मला चि येति भजती हि अनन्य--मति ।
विषयनदींतुनी विरत, जाणुनि[6] ते तरती ॥२८॥ ६ ज्ञानानें.

हृदयिं न नारि--चक्षु--शर--शल्य जया श्रमवी ।
मुळिं न च लोभपाशिं पडती, बहु जो श्रमवी ॥
मनुज सदा हि कोप--रजनीमधिं जागृत जे ।
मज चि समान ते नर सभाग्य, मनीं समजें ॥२९॥

कनक नि कामिनी तशिच कीर्तिहि तीन पहा-- ।
सतत अशांति बाढविति विश्विं अनिष्ट महा ॥
विविध अनंत दोष--तरु--बीज चि हीं स्मरणें ।
उपजति सन्निपात जमतां ? जगतां मरणें " ॥३०॥

अवसरि याच वायुसुत भानुसुता जवळी ।
नमुनि रमेश--कार्यि मतिमन्त मतीस वळी ॥
कपिगण दूत पाठवि कपींस निमंत्रणही ।
वदुनि जमा विलंब न जरा करितां क्षणही " ॥३१॥

समयिं रघूत्तमानुज सकोप पुरींत शिरे ।
अनल समान नेत्र, करिं बाण--धनुर्धर रे ! ॥
कपिसिं म्हणे " पुरी सकल भस्म करीन पहा. " ।
नृप भयभीत, वृत्त परिसूनि मनांत महा ॥३२॥

पुढति हि धाडि वालितनयासि, सवें जननी[1] ।
शमविति घोर कोप, करुनी नमना अवनीं ॥
म्हणति शिशूवरी न करि कोप खरा जननी ।
करिति निवेदना पवन--पुत्र पदीं नमुनी ॥३३॥

१ तारा.

करुनि हि लक्ष्मणा पुढति, जाति कपीश कपी ।
रघुवर भेटिसी; भय नसे हृदयीं किमपी ॥
मृगपति--दर्शना हरिशिशू[१] कधिं भीत नसे। १ सिंहाचाछावा.
प्रभुवर दर्शना, जरि सदोष हि, भक्त तसे ॥३४॥

रविसुत[२] वंदुनी रघुवरा करितो विनती । २ सुग्रीव.
" प्रभु मज दोष ना, तव अजा छळिते न मिती ॥
करिशि कृपा जयावरति तोच पहा सुटतो ।
नर बहु साधनां करुनि ना तरि हो ! अटतो[३] ॥३५॥ ३ भटकतो

विनविति यापरी प्रभुवरासि कपीश्वर जों ।
विविध हि वानर अनंत चि पावति तों ॥
क्षणिं जलदागमीं घन नभांत जसे जमती ।
करिति हि सिंहनाद जणुं मेघ चि गडूगडती ॥३६॥

कर जलधार, भूमिवरी लावितसे[४] दिसती । ४ लावीत आहेत असे.
हरिपद वंदिती प्रभु तयां कुशला पुसती ॥
बघति रमापतीमुख; सुखासि असे न मिती ।
हृदयचि जाणतें अनुभवी, प्रभुला नमिती ॥३७॥

अतिशय मोद रीस कपिसीं उडती हसती ।
पतिमुख पाहतां विरह--अंतिं जशीह[५] सती ॥ ५ इह.
वदति तदा प्रभू, " तरि विलंब कशासि करां ।
जनकसुता--विमार्गणिं सुशीघ्रचि मार्ग धरा " ॥३८॥

प्रभु--वच ऐकुनी कपिगणीं अति हर्ष चढे ।
कुणि नभ आक्रमी, जणुं गिरीच सपक्ष उडे ॥
कुणि करि मेघ--नाद कुणि गर्जति सिंह जसे ।
कुणि कर--टाळि वाजवि, भुजांस पिटीत असे । ३९॥

विविध दिशांसि वानर वरूथ हि रीस तसे ।
रविसुत वीर पाहुनि सुयोग्य हि धाडितसे ॥
' परम सुभाग्य आजि उदया जणुं ये अपुलें ? ।
मनिं म्हणती कपीं; अधन जेविं धनें विपुलें ॥४०॥

मग नलनील अंगद हनूमत जांबवतां ।
कपिपति " दाक्षिणे " म्हणति " शोध करा पुरतां ॥
क्रमुनि हि एकमास कपि शोध विना फिरती ।
तरि मग सत्य ते मम करें चि पहा मरती ॥४१॥

निजपति सेवुनी धन, यशां जगतीं वरणें ।
रघुपति सेवुनी भवनिधींतुनि या तरणें ॥
न हि परभाग्य याहुनि, जगीं तनुसी धरतां ।
न च रघुनाथ भक्तिहुनि लाभ दुजा परता " ॥४२॥

मग हनुमंत राघव पदीं स्वशिरा नमवी ।
कमल--करा शिरीं, हरि धरूनि, तपां[1] शमवी ॥ [1] तापांना
निजकर--मुद्रिका कपिकरीं रघुनायक दे ।
विरहदशे, बला, मम म्हणे हि सतीस वदे ॥४३॥

विवरुनि सर्व, शोक हरुनी हि सुधीर फिरा ।
त्वरित तिचे विमोचनि करूं मग यत्न पुरा ॥
हनुमत अंतरीं परम तोष तदा उपजे ।
'मजवरती रघूत्तम कृपा पुरती,' उमजे ॥४४॥

जय जय राम राघव ! सुघोष कपी करिती ।
जय जय जानकीपति समर्थ ! समुच्चरिती ॥
बघुनि मुखांबुजा हनुमदादि मनीं नमना- ।
करुनि रघूत्तमा, अति सवेग चि जाति वना ॥४५॥

कपि चमु काननें नद नदी गिरि दुर्ग किती ।
सहज सवेग लंघिति जरा न मनांत भिती ॥
अतिशय रामपायिं दडते हि यदा सुमति ।
तनु-धन धाम-लोभ नुपजे हि कदा कुमति ॥४६॥

निशिचर भेटतां पथिं, लगाविति थाप मुखीं- ।
वधिति, कुणी कपी वदति 'राम' अतीव सुखीं ॥
मुनिजन पाहतां नमुनि घेरुनियां पुसती- ।
'रघुवर दार जानकि कुठें दिसली सुसती ?' ॥४७॥

कपिवपु काननीं फिरत फार तृषें जळते ।
परिं वनिं शोधितां लव कुठें न दिसें जळ तें ॥
जळविण हे कपी जरि कृतांतमुखीं पडती ।
'तरि,' मनिं अंजनी सुत म्हणे 'विपदा घडती' ॥४८॥

गिरि शिखरीं चढे, नवल एक तदा दिसलें ।
महिविवरीं प्रवेश करितां खग आढळले ॥
तृण बहु कोवळें हि जमिनीवरि हिर्वळलें ।
बघुनि तया जलाशय तिथें असणं कळलें॥४९॥

जगतिं मुख-प्रसन्न अति सात्विक ही बघतां ।
रघुवर–भक्ति–वास सहजें कळतो पुरता ॥
उतरुनि येइ मारुति तया विवरा जवळीं ।
कपिचमुही जमे परि शिरे न कुणीहि बळी ॥५०॥

मग हनुमन्त राम मानिं चिंतुनिया शिरला ।
कपिगण सर्व तो मग शिरे नच घाबरला ॥
मनुज सुधीर एक मतिमन्त समाज–हिता-- ।
झटत अनेकही अनुसरे चि तदा सुपथा ॥५१॥

प्रविशुनि अंतरीं अति विशाल जलाशय तो, ।
सफल तरू, सुमें बघुनि मोद मनीं भरतो; ॥
सुरुचिर तेजपुंज रमणी वरमंदिरिं ती-- ।
बघुनि तिला नमूनि, पुसतां अवघें कथिती ॥५२॥

" तुम्हिं हरिभक्त खा मधुफळें " वदली " रमणी ।
वरि जळपान हो कपि ! करा भयहीन मनीं ॥
हृदयिं साचिंत भीत सगळे मजला दिसतां ।
सफल चि कार्य होइल रमेश मनीं स्मरतां ॥५३॥

दशरथ--पुत्र--नारि हि दिसेल तुम्हां कपि हो !
रघुवर दर्शनार्थ गमना करणें मज हो ।।
तुम्हि नयनांसि झांकुनि कपी क्षण एक बसा ।
जलनिधितीरिं नेत्र उघडाल तदा हि असां " ॥५४॥

मिटुनि हि नेत्र ते क्षणभरें उघडीति यदा ।
चकित चि सागरा बघति ते सुविशाल तदा ।।
पुनरपि मानसीं अति सचिंत कपी सगळे ।
करिति विचार सागर कसा तरवेल बळें ॥५५॥

अझुनि न शोध लागत, सरेल चि मास पहा ।
परतुनि जात लाज, हि कपीश वधील महा ॥
पसरुनि दर्भ ते कपि समस्त हि मृत्युपथीं ।
बसति, जटायुबंधुसि सुघोर तदा बघती ॥५६॥

खग गिरिसा विशाल हि भयानक तो दिसला ।
कपि चमुला महाबळ कृतांत तसा गमला ॥
स्मरुनि मुनीश--वाक्य कपिनां द्विज तो वदला-- ।
भय नच मानसीं, बघुनि हो ! धरणें मज़ला ।।५७॥

कपिगण कोण, कां, तुम्हि समस्त इथें जमलां ? ।
मग बहु--जांबवंत धरि धीर कथा वदला ॥
श्रवणपथीं यदा अनुजमृत्यु--कथा पडली ।
करयुग जोडुनी नभग[1] वृद्ध वदे सुबली ॥५८॥

[1] पक्षी

जलधि--जलासमीप मज न्या कपिहो सगळे ।
मग जलतर्पणा करिन मी अति शुद्ध जळें ॥
खगपति तो जटायु मम बंधु मनीं धरणें ।
कपि हरिभक्त ! हात मज द्या च दया करणें ॥५९॥

मनिं भयभीत ते कपि तदा करिताति तसें ।
स्मरुनि मनांत राघव—पदांबुज दिव्य असें ॥
कपि--कर लागतां विहग--पंख पहा फुटले ! ।
मग खग जानकी--कुशल--वृत्त वदे सगळें ॥६०॥

" जलनिधि--पार रावणपुरी अति दुर्ग असे ।
परि शत योजनें नगर येथुनि दूर असे ॥
कुशल हि जानकी वनिं अशोक तिथें चि वसे ।
अतिशय दूर गृध्र बघती; इतरां न दिसे ॥६१॥

जरि कुणि हा तरेल उदधी शत योजन जो ।
जनकसुता दिसेल यश लोकिं भरील हि तो ॥ "
कुणि नच बोलती बघुनि अंगद तो वदला-- ।
" करिन जलेश पार, फिरण्या न च शक्ति मला " ॥६२॥

परिसुनि ऋक्षराज वदला " युवराज जरी— ।
तुजसिच मोकलूं,[१] कपि कुसेवक सर्व तरी ! ॥
जरि बलवंत मी तरि अतीवचि वृद्ध असें ।
जलनिधि लंघना क्षम शरीर मुळीं च नसे ॥६३॥

१ पाठवूं

सकल विचार चिंति करिती अपुल्या कपि ते ।
जलनिधि लंघण्या बळ कुणा अणु ना दिसतें ॥
पवनसुता म्हणे " बससि मारुति पंगु जसा ! ।
तव बळ मारुता सम असे त्वर तूं सहसा ॥६४॥

तरुनि जलेश मैथिलिसि जाउनि भेट वरा ।
जग धवली यशें ' अतुल राघव दूत खरा ' ॥
तुजविण कोणि बा न च समर्थ कपी दिसतो ।
पवनसमान कीं पवनपुत्र बली असतो" ॥६५॥

सहज परेश अंश जरि जीव खरा असतो ।
विषय विलुब्ध होउनि तथापि न तो स्मरतो ॥
गुरु–वचनामृतें विमलबोध यदा धरितो ।
भवनिधि लंघुनी सतत शांतिसुखा वरितो ॥६६॥

श्रवण करी यदा पवननंदन बोध असा ।
अतिशय वाढवी तनुसि कांचन--पर्वतसा ॥
रघुवर चिंतना करुनियां मनिं, गर्जतसे-' ।
गिरिशिखरीं चढे कपि--गणांसि वदूनि असें ॥६७॥

" सलिलनिधी[1] सलील चि महान तरी तरतो ।
वधुनि हि रावणा पुर समग्र चि तें हरतो ॥
मज वद जांबवंत करूं काय तिथें तरुनी ।
गुरुसम मानितो पुसतसें तुजसी म्हणुनी " ॥६८॥

[1] सागर.

“ तरुनि कपीश्वरा ! प्रभुवधूसि तुवां मिळणें ।
कुशल कथून राम, हि विशोक सती करणें ॥
परतुनि राघवा कुशल, वृत्त,समस्त वदा ।
करि इतुकें चि बा कपिवरा अति बुद्धिमता ॥६९॥

प्रभु कपिसैन्य घेउनि पुरींत शिरेल तदा ।
रिपुकुळ मर्दुनी निजवधूसि अणील मुदा ॥
रघुपति कीर्ति निर्मळ जगांत तदा पसरे ।
सुजन समाज तुष्ट हि समस्त चि ताप सरे ” ॥७०॥

करि गुरु सिंहनाद, कपिनां वदला हरितो[1] ।
“ झडकरि जाउनी त्वरित कार्य पहा करितो ॥
मम मनिं मोद थोर गमतो; कपिं मित्र ! जरा ।
क्षणभर साहणें सकल कष्ट, हि ताप खरा ” ॥७१॥

[1] मारुती

पुनरपि सिंहनाद करुनी कपि तो उडला ।
रघुवर बाणसा नभपथीं गतिनें चढला ॥
जय जय रामदूत हनुमान् कपि--घोष तदा ।
रघुपति दूत--कीर्ति कवि गान करील मुदा ॥७२॥

सुधवल मारुती यश पराक्रम गान अति ।
करि, गुरु--वासुदेव--कर--पावित अल्पमति ॥
कधिं नच वृत्त नर्कुटक काव्य मराठि बघे ।
परिगुरुची कृपा करि सुदुष्कर ही अवघें ॥७३॥

हरिगुण--गानिं चंचळ मनासि सदा रमवी ।
गृह--धन--कामिनी वमन मानुनि त्या[1] शमवी ॥ १ मनाला
निशिदिन रामनाम रसने रस चाखवि गा ! ।
हरिपद चिंतनीं निरत ठेउनि चित्त--खगा ॥७४॥
गुरुवर बोध तों न कधिंही पळ विस्मरणें ।
विविध मनांत भेद अणुमात्र तरी नुरणें ॥
निजगुरु पादपद्म हृदयीं दृढतें स्मरणें ।
प्रज्ञ सदैव शान्ति विमला स्वसुखीं वरणें ॥७५॥

इति श्री नर्कुटकरामायणे श्री स्वामी प्रज्ञानानंदविरचिते
किष्किधाकाण्डं समाप्तम् ।
॥ श्रीराचन्द्रार्पितमस्तु ॥

---

# श्रीवायुनंदनाष्टकम्

समर्थ मञ्जनीसुतं । महेश्वरांश संभवम् ।
सुभव्य दिव्य विग्रहं । स्मरामि वायु नंदनम् ॥१॥
तमारि बिम्बभक्षकं । खरारि भक्त रक्षकम् ।
अशेष सिद्धि सेवितं । भजामि वायुनन्दनम् ॥२॥
अनंत सूर्य सप्रभं । सुतप्त हेम सन्निभम् ।
कपीश भीति भञ्जकं । नमामि वायुनंदनम् ॥४॥
प्रभोकरेण पावितं । स्वकीश संघजीवितम् ।
पयोधितीर संस्थितं । नमामि वायुनंदनम् ॥४॥

भल्लूक वाक्य कारिणं । जलाब्धि पार गामिनम् ।
महीसुतासु सान्त्वनं । नमामि वायुनंदनम् ॥५॥
दशास्यपुत्रघातिनं । सुवाटिका–विनाशनम् ।
रिपोः पुरी विदाहिनं । नमामि वायुनंदनम् ॥६॥
असाध्यकार्य साधकं । महानिशाचरांतकम् ।
अहीश जीव दायकं । नमामि वायुनंदनम् ॥७॥
धरा भवा पतिस्तुतं । समस्त देवतानुतम् ।
तथापि नम्रता युतं । नमामि वायुनंदनम् ॥८॥
सुरोत्तमांघ्रि सेवकं । रघूत्तमांघ्रि दर्शकम् ।
भवाब्धि भीति नाशकं । नमामि वायुनंदनम् ॥९॥
चिरायुषं कपीश्वरं । रमेश भक्त्यधीश्वरं ।
तृणी कृतांडजेश्वरं । नमामि वायुनंदनम् ॥१०॥
सुवीर्य धैर्य सागरं । विशुद्ध बोध नागरम् ।
अहैतुकी कृपाकरं । नमामि वायुनंदनम् ॥११॥
नचाप सर्पतां कदा । धनुर्धरो हरिर्हृदः ।
समीरनन्दनो मुदा । ददातुमेनुतः सदा ॥१२॥
हनूमतो नवत्रि कंहि । वासुदेवशिष्यकृत् ।
रघूत्तमस्य तुष्टिकं । पठन्मुदा सुखी भवेत् ॥१३॥

॥ श्री रामचंद्रार्पितमस्तु ॥

|| ॐ ||

श्री गुरुभ्योनमः ।

अथ नर्कुटक–रामायणे

# सुन्दर–काण्डम्

जय जय राम ! नाम तव कुंभ[1]ज हा भवधी–। [1] अगस्ति ऋषि
सुकवुनि, दाखवा तव पदांबुज जें सुखधी ॥
मग तव दूत अल्प जलधी जरि कीं तरला ।
नवल न, ज्या शिरीं स्वकर--कंज कृपें धरिला ॥१॥

मम मनिं वासना प्रभु ! नसे किमपी अपरा ।
पद कमलीं मला विमल भक्तिच देइ परा ॥
निशिदिन नाम या मुखिं, मनीं अनुराग वसो ।
अविरत चित्तिं या विमल रूप--सुधा गवसो ॥२॥

अतिबलसागरा कनकभूधर--देह--धरा ।
निशिचर--कानना दहनशा, मतिमंत वरा ! ॥
सकल--गुणाकरा, विविध--वानर–वीर–वरा ।
करूं पवनात्मजा नमन राघव–भक्त वरा ॥३॥

नर परमार्थ--पंथिं निघतां चि सवेग अति ।
प्रथम सुहृद् विलंबिति सुबुद्धि ममत्वमती[1] ॥ १ ममतायुक्त बुद्धि
रघुपती-दूत जाइ बघुनी, सरितापति तो ।
श्रमहरण्या गिरिस[2] कपि-मार्गिंच उंचवितो ॥४॥ २ मैनाक पर्वतास

नमुनि तयासि लावुनि करा, हनुमन्त म्हणे ।
" रघुवर कार्य जों न घडलें, न च विश्रमणें " ॥
अति बलवंत वेगयुत आक्रमितो नभ तो ।
सुरगण विघ्न धाडि सहसा कपिच्या पथिं तों ॥५॥

जंव न गणीच साधक विलोभन बंधुकृत ।
सुर भय लोभ विघ्न पाथिं पाठविती बहुत ॥
अहि-जननी महा पसरिते स्वमुखा ' सुरसा ' ।
तनु--मति शक्तिनें तिजसि जिंकि कपी सरसा ॥६॥

सुरकृत विघ्न साधक विलंघिति थोर यदा ।
असुर अनेक विघ्न करिती पाथिं घोर तदा ॥
धरि कपि-छाय राक्षसिनि एक सुघोर, जळीं ।
क्षणिं तिज मारुनी क्रमिति पंथ कपीश बळी ॥७॥

जलनिधि तीरिं तो उतरला कपि शीघ्र-गति ।
अतिशय दुर्ग रावण-पुरी दिसली मग ती ॥
मशक-लघू बनूनि निशिं जाउं बघे नगरीं ।
निशिचरि लंकिनी कपिवरासि विरोध करी ॥८॥

कुवच शरांसि मारि कपिला पुरिं जाउं न दे ।
रघूवर--दूत वामकर--मुष्टि तिला मग दे ॥
महिवरि कोसळे, रुधिर फार वमे, उठली ।
" रघुपति--दूत--दर्शन ! सभाग्य चि मी " वदली ॥९॥

" क्षणभर संतसंग सुख देइ जगीं जितुकें ।
कधिं सुर-लोक-भोग-सुख,मोक्ष तया नतुके[1]॥ १ तुल्य होत नाहीं
रिपुपुरिं जाउनी सकल कार्य करी शिव-दा ।
निजहृदयीं स्मरूनि सुखदां रघुवीर--पदां " ॥१०॥

शिरुनि पुरींत शोध करि तो कपिराज बरा ।
निशिचर--राज--मंदिर हि शोधि सुधी जबरा; ॥
परि न च आढळे जनकजा; मनिं खिन्न यदा– ।
रघुपतिपादपद्म करिं चिंतन चित्तिं तदा ॥११॥

नगरिं फिरे, तदा गृह सुरम्य तया दिसलें ।
रघुवर नाम, बाण--धनु ज्यावरतीं लिहिले ॥
बघुनि मनीं म्हणे कपि ' कुणी हरिभक्त वसे ।
धरुनि सुविप्ररूप पुसतां नच हानि असे ' ॥१२॥

करि सुविचार यापरि यदा हनुमन्त मनीं ।
सदनिंच ' राम राम ' वचना वदला हि कुणी ॥
" रघुवर भक्त खास कुणि एक इथें वसतो ।
हरि-भजकां मनीं कपटभाव कधीं नसतो " ॥१३॥

पवनज[१] 'राम राम' सदना–निकटीं वदती ।
बिभिषण गेह–दार उघडी नमुनी पुसती ॥
"द्विजवर ! कोण आपण किमर्थ इथें नगरा ।
करिन सहाय, या, गृहिं पदार्पण पुण्य करा" ॥१४॥

१ वायुपुत्र

प्रगटुनि रूप मारुति म्हणे "कथितो तुजला– ।
रघुपति–दूत मी म्हणति कीं हनुमंत मला ॥
निशिचर–नायकें हरुनि आणिलि रामवधू ।
ज़लनिधि लंघुनी जनकजा निशिं येथ बघूं ॥१५॥

परिसुनि रम्य वाक्य, कपिला स्वभुजां कवळी ।
"मज हरिभक्त भेट, बहु भाग्य !" म्हणे 'घडली ॥
निशिचर मी बिभीषण, हि रावण–बंधु असें ।
करितिल का कृपा मज रघूत्तम राम !" पुसे ॥१६॥

मग हनुमंत त्यास वदती "प्रिय बा सखया ! ।
न हि रघुनाथसा जगतिं कोणि कृपाकर या ॥
वनचर मी ! कपी मतिविहीन ! अतीव ! तरी ।
हरि वितरी कृपा मजवरी; बघ ! धीर धरी ॥१७॥

वद मज मर्म सर्व मिळणें हि सतीस कसें ।
करि उपकार हा विनति नम्र करीत असें" ॥
सकल हि जानकी–मिलन–मर्म वदे कपिला ।
कपिवर भेटुनी प्रियकरा नमुनी वळला ॥१८॥

अति लघुरूप होउनि अशोक--वनीं शिरला ।
रघुवर--दास शोधित सुशीघ्र कपी फिरला ॥
दुरुनि दिसे अशोक--तळिं शोक चि रम्य तनु-- ।
धरुनि बसे, हि राम--विरहानल--दग्ध जणुं ॥१९॥

कुमुदिनि हेम, राम उडुपाविण कोमजली-- ।
अवनत--मस्तका, बुडवि आनन शोकजळीं ॥
विरह--दिनेश--चण्ड किरणीं जणु ती सुकली, ।
रघुवर भास्कराविण जळीं जशि पद्म--कळी ॥२०॥

लव--लव 'रामराम' वदते रुचिरा वदनीं ।
घळ--घळ वाहतें जळ सुतप्त किती नयनीं ॥
पळ--पळ नासिकें पवन उष्ण वहात असे ।
जळ--जळ चित्ति वन्हि भडका जणुं दावितसे ॥२१॥

रुचिर दुकूल ही मलिन, केंश कलाप जटा ! ।
कृशतनु कीं मलीन रजयुक्त सुहेमलता ॥
जणुं विरहानळें जळुनि अंतर[१] राख उडे-- ।
उभय हि नासिकापुट--पथें; पटिं देहिं पडे ॥२२॥

धरणिकडे सदा स्रवत--नेत्र सुदीन बघे ।
जणुं 'उदरांत घेइ मजला' विनवी वसुधे ॥
विरह--दवें सती--तनु तदा असती जळली ।
नयन--घनीं च वर्षुनि जळा, तिज वांचविली ॥२३॥

१ अंतःकरण

मानिं नमना करीं, मुद विषादहि चित्तिं पडे ।
मग कपि शिंशपा[1] तरुवरी अति शीघ्र दडे ॥ 1 शिशवीचें झाड
कपिं मानिं भीतिलेश जरि नैव कधीं शिरला ।
प्रभुवर कार्यि विघ्न न घडो म्हणुनी लपला ॥२४॥

अवसरिं याच रावण, समेत किती रमणी,– ।
द्रुततर पातला, निकट–जानकि दुष्टमणी ॥
तिज विनवी, "मला वश पळांत चि होइ कशी ।
करिन तुला चि पट्टमहिषी सुखवी मजसी ॥२५॥

भुवनिं चतुर्दशीं मम पहा प्रभुता भरली ।
सुर चतुराननादिक मला वश सर्व बली ॥
नृपसुत राम! तापस हि रंक! वनांत वसे ।
सुख तुज देइ तो कवण! सांग तरी लवसें ॥२६॥

कनक–सुधालता वसति कंटक काननिं कीं! ।
त्यजुनि रसाल, कंटक तरू पिक सेविल कीं? ॥
तुजसम सुंदरी पुरुष ना मजसा जगतीं ।
कमलिनि केविं त्या मरु–मही–वरती जगती? ॥२७।

धन, तनु, रूप वीर्य बल भोग पराक्रम हीं ।
सुर–असुरां––नरांदि कवणा मम तुल्य नही ॥
चळचळ कांपती मजपुढें अमरासुर तों ।
मशक समान लक्ष्मण रघूत्तम विक्रम तों." ॥२८॥

विविध असे किती वचनबाण सतीहृदयीं— ।
खळ मळराशि मारि असुरेश जगद्विजयी ॥
तृण धरि आड राघव—वधू वदली बरवी ।
" दशमुख काजव्या ! दशरथात्मज जाण रवि ॥२९॥

मृगपति—अंगने कधिं न जंबुक गोड गमे ।
काधिं न मरालिनी बकपतीस मनीं हि नमे " ।
कटु वचना निशाचरपती परिसूनि म्हणे ।
" मम अपमान हा मजसि शक्य नसे सहणें " ॥३०॥

वदुनि असें कृपाण विकराल विकोश करी ।
" तुज वधितो अतां स्मर मनांत हि राम तरी " ॥
असिसि म्हणे सती " विरहताप निवारि तरी " !! ।
दशमुख—अंगना[1] पतिसि वारि धरूनि करीं ॥३१॥ १ मंदोदरी

मग वदला किं " मासिं मजला वश तूं नव्हसी ।
करिन अहार अल्प, वधुनी असिने तुजसी " ॥
रजनिचरीस दुष्ट वदला " छळणें हिजला ।
जशि महिन्यांत होइ वश ही रमणी मजला " ॥३२॥

वदुनि फिरे सुदुर्जन हि घेउनि नारिगणा, ।
अतिशय शोक होइ रघुनायक—नारि—मना ॥
तंव बहु राक्षसीं—निकट येइ वदे त्रिजटा ।
" स्वप्न पडे निशीं मज, भरा तुम्हिं कर्णपुटा ॥३३॥

दशदिन जाति रावण धरील चि मृत्युपथा ।
सकल हि राक्षसां मरण येइल शीघ्र तथा ॥
नगरिं बिभीषणा बसवितील नृपासनिं हो ।
रघुवर जानकीस अति सादर नेतिल हो ! " ॥३४॥

सकल हि राक्षसी परिसुनी त्रिजटा--वचना ।
अति भयभीत वंदिति धरूनि·सती–चरणां ॥
" मिथिलसुते ! क्षमा करि तुला बहुधा छळिलें ।
प्रभुवर वीर्य धैर्य अवघें अधुना[1] कळलें " ॥३५॥ १ आतां

नमुनि तिला निघून सकला गृहिं जाति; तशी– ।
दिसत सती मृगी विरहशोक–दवातुरशी ॥
स्वमनिं म्हणे महाखळ–करें वरणें मरणें– ।
उचित तयाहुनी अनळिं दग्ध तनू करणें ॥३६॥

मग विनवी सखी[2]स " रच गे तरि काष्ठचिता । २ त्रिजटला
अनल हि आण, दे; शमविते विरहा स्वहितां ।
बघ विरहाग्नि–दग्धहृदयीं लवणांबु जसें ।
विष-कटु--वाक्शरां निशित हा खळ मारि कसे " ॥३७॥

मग वदली सखी, " अनल रात्रिं नव्हे मिळणें ।
मनिं धरि धीर हें सकल दुःख जरा गिळणें ॥
रघुपति येउनी तुजसि घेउनि जाति पहा " ।
नमुनि पदास जाइ निघुनी त्रिजटा हि गृहा ॥३८

विविध तदा विलाप करि जानकि दीन जशी ।
' अनलसमान हा मजसि जाळि म्हणे हि शशी ॥
वियतिं विराजती विपुल पावक--पुंज पहा ।
परि पडतो न पृथ्विवरि एक हि दुष्ट अहा ! ! " ॥३९॥

" जगतिं ' अशोक ' हें तव सुनाम चि सार्थ करी ।
वितरुनि पल्लवानलकणां मम शीघ्र करीं " ॥
तंव कपि मुद्रिका सपदि[1] टाकुनि दे पुढतीं ।    १ तात्काल
" खचित अशोक देइ अनला' मनिं मानि सती ॥ ४०॥

झडकर जाउनी उचलुनी बघते तंव ती– ।
प्रभुकर--मुद्रिका ! बघुनि मोद विषाद अती ॥
कधिं नच ' राम ' अंकित अशी घडवे असुरां ।
" वद " विनवी तिला " कुशल राम स--बंधुवरा ॥४१॥

कशि तरि येशि गे ! त्यजुनि दूर हि रामकरा ।
तव मनिं सांग कीं विरह दुःख नसे च जरा ? ॥
जड दिसतेस, जीव तुजमाजिं नसेच; तरी-- ।
विरह--कृशानुनें विगत--चेतन होशि खरी ! ॥४२॥

तुजसि न साहवे प्रभु–वियोग यदा घडला ।
म्हणुनिच तूं सखे असु–वियोग तदा वरिला ॥
अतिशय धन्य धन्य ! अससी च सभाग्य पुरी ।
असुनि जनार्दनांग बघ मी जगलें असुरी ! ! " ॥४३॥

तरुवरि मारुती मधुर गाइ रमेश–गुणा ।
प्रभुचरितामृता जलद वर्षविता च गणा ॥
मन करणां हि कान करुनी श्रवणा करिते ।
" प्रभु–गुण कोण गात; मज दर्शन केवि न दे " ॥४४॥

परिसुनि अंजनीतनय सन्मुख येत असे ।
फिरवि मुखा, सती दनुज रावण मानितसे ॥
" खचित चि रामतदूत बघ मी " वदला " जननि !– ।
रघुवर आण ! राम मज धाडिति जाण मनीं ॥४५॥

निजकर–मुद्रिका प्रभुवरें दिधली तुजला ।
जननि ! कृपाळुदास म्हणुनी समजा मजला " ॥
" नर--कपि संगती कशि घडे मज सांग बरें " ।
सकल कथा निवेदन खरें कृत[1] दूतवरें ॥४६॥ [1] केलें

परिसुनि विश्वसे[2] मनिं, रघूत्तम दूत खरा । [2] विश्वास वाटला
तनु–मन–वाणिनें प्रियकरोत्तम–भक्त बरा ॥
सरसिज–लोचनीं जळगळे तनुही पुलकें ।
" प्रियकर मारुते हृदय होइ जरा हलकें ॥४७॥

प्रभु–विरह–व्यथें मरत मी असतां अबला ।
वचनसुधारसें जगविलें हनुमन्त ! मला ॥
प्रभु असती अतां कुशल सांग सलक्ष्मण कीं ।
सुखनिधि, सेवकां सुखद, ते स्मरती मज कीं ? ॥४८॥

रुचिर तमालनील--तनुला, मम, या नयनीं ।
बघुनि विझेल का विरहवन्हि कधीं स्वमनीं ? " ॥
वच उमटे न, कंठ अवरुद्ध; " अभागिनिला – ।
खचित चि नाथ ! हा ! विसरलांत गमे मजला " ॥४९॥

अतिशय शोकसागरिं बुडे बघुनी, तिजला– ।
कपि--वर नाविका सम सुरम्य वचां वदला-- ॥
" कुशल दिनेश वंशपति राम सहानुज ही ।
जळविण मीन नीर तुजला, स्मरती, प्रभुही ॥५०॥

मानिं जननी उणें किमपि मानुं नकाच असें ।
रघुवर राग[1] तों, तुजवरी द्विगुणा चि वसे ॥ १ प्रीति
श्रवण करी निरोप तुजला प्रभुनीं दिधला ।
स्वमनिं सुधीर--; " कपि गद्गद होइ भला ॥५१॥

" तुज रघुनाथ सांगत असे बघ जानाकि ! हा ! ।
जगिं विपरीत वागति मसीं[2] तुजवीण पहा-- ॥ २ मजसी
तरु, नव पल्लवीं प्रगटवी दव--वन्हि जसा ।
निशि जणुं काळरात्रि, शशि भाजित भास्करसा ॥५२॥

जणुं अति तप्त तैल घन वर्षति वाटतसे ।
कुमुद--वनें सुघोर शर--कानन--वृंद[3] जसे ॥ ३ समुदाय
पिक शुक काळदूत उलुकाहुनि दुःखदसे ।
हितकर तेचि शत्रुसम पीडिति, पार नसे ॥५३॥

उरग--समान कीं सुमनहार भयानक तो ।
अनल तसाचि चंदन तनूसि विदाहक तो ॥
जन वदुनी दुज्यां असुखनाश जगीं करिती ।
वद कवणा कळे ! तव मदीय सुराग रिती ” ॥५४॥

सुविदित मर्म तें मम मनासि सदैव परी-- ।
जनकसुते तुझ्या निकट तें मन वास करी ॥
कवण वदे ! वियोग तव दुःखद होइ कसा ।
कधिं नच लागतो गगन--अंत खगासि जसा ! ” ॥५५॥

श्रवण करी वचा, जनकजा तनुभान भुले ।
रघुवर--भाव मग्न;[1] फणसासम देह फुले ॥ १ प्रेम
बघुनि दशा वदे पवननंदन “ धीर धरा-- ।
मनिं करुणाकरा स्मरुनि, भीति धरा न जरा ॥५६॥

खगपति--अंगना भुजगभीति मनीं न धरी ।
वन--हरि[2]--दार कीं सभय होइ बघूनि करी[3] ! ॥ २ सिंह ३ हत्ती
निशिचर--वृंद ते बहु पतंग समान म्हणा ।
रघुवर--तीर--घोर--अनलीं जळतील गणा ॥५७॥

तिळभर लागता रघुवरा तव ठाव जरी ! ।
खचित विलंब नाल्प करिते रघुवीर तरी ॥
तुजसि अतां च मी उचलुनी गमना करितों ।
परिनच आज्ञपी प्रभु मला, शपथें कथितों ॥५८॥

तरि दिन कांहिं धीर धरणें विनवूं जननी ।
कपिगण संग येति रघुनाथ सुवीर झणीं ॥
निशिचर मर्दुनी तुजसि घेउनि जाति पहा ।
कवि, मुनि नारदादि, यश गातिल लोकिं महा " ॥५९॥

" कपि सगळे तुझ्या सम चि ! ! राक्षस घोर किती ।
मम हृदयांत संशय महान करी वसती " ॥
कपि बलवंत भीषण निजाकृति दावितसे ।
कनक--गिरी दुजा अति विशाल सुघोर दिसे ॥६०॥

बघुनि महा भयानक वपू गत- संशय ती ।
पुनरपि सानरूप पवनात्मज घेइ अती ॥
" तरुमृग[1] बुद्धि अल्प, बळ फार नसे जननी ! । १ वानर
भुजग खगेश भक्षि, जरि इच्छिल राम धनी ॥६१॥

कपिवच ऐकुनी बलपराक्रम भक्ति युत ।
विसरुनि शोक, दे विपुल आशिष[2] तोषयुत ॥ २ आशीर्वाद
" प्रबळ सुशील हो गुणनिधी अजरामर बा ! ।
तुजवरि जानकीश करितील अनंत कृपा " ॥६२॥

' करिति कृपा प्रभू ' वचन कानिं सुधारससें ।
पडत कपीश राम--रति[3]सागरिं मग्न असे ॥ ३ प्रेम
पदिं बहुवार वंदन शिरा नमवूनि करी ।
वचन वदे विनीत कर जोडुनि दिव्य हरि[4] ॥६३॥ ४ मारुती

" विदित अमोघ आशिष तुझे जगतीं जननी ।
अति कृतकृत्य आज बनलो बघ मी सुजनीं ॥
बहु फळभार पाहुनि तरूंवरि भूक मला-- ।
अतिशय लागली ! खचित आइ ! ! वदूं तुजला " ॥६४॥

" सुत विपिना महाभट भयानक रक्षिति कीं ! " ।
" जननि ! रुचे तुला तरि निशाचर भीति न कीं " ॥
' मति--बल--सिंधु ' जाणुनि वदे " सुत ! जाइ बरें ।
मधुर फळें सुपक्क बहु खाउनि भूक नुरे " ॥६५॥

शिर नमुनी, शिरे विपिनिं खाइ अनंत फळें ।
तरु उपटी, प्रभंजन[1] जसा कपिराज बळें । १ सोसाटयाचा वारा
निशिचर--रक्षकां करि विमर्दुनि पीठ पहा ।
पळुनि निवेदिती कितिक रावण कार्णिं महा[2] ॥६६॥ २ विशाल

मग सुत अक्ष[3] आदि भट धाडि ससैन्य महा । ३ अखया
क्षार्णि कपि--केसरी प्रबळ गर्जुनि मर्दि पहा ॥
मग घननाद देवपतितापद[4] वीर बली । ४ इन्द्रजित्
विपुल महाभटां सहित चालुनि येइ छली[5] ॥६७॥ ५ कपटी

रिपु--चमु धाडितो कपि, पळांत कृतांत--गृहा ।
समरिं सुघोर इंद्रविजयी भय मानि महा ॥
खळ विधि--बाण सोडि कपि आश्रय देइ तया ।
धरार्णि पडे मनीं बहुत मानि जगत्पितया[6] ॥६८॥ ६ ब्रह्मदेवाला

कपिसर निबंधितो भुजगपाशिं, विमूढ महा ।
कपि न च वन्हि हा ! स्ववसनीं खळ बांधि पहा ! ॥
भवभय बंधनासि हरि--नाम चि तोडि यदा ।
रिपु--सुत बंधनांत हरि--दूत पडेल कदा ! ॥६९॥

प्रभूवर--कार्य थोर करणें, बघणें असुरा ।
म्हणुनि कपीश अंगिकरि बंधन धीर पुरा ॥
असुर--सभेसि नेइ कपिला घननाद जसा-- ।
नयानिं दिसे सुरारि जणुं कज्जल--पर्वतसा ॥७०॥

अनुक्रम ... विभाग ... क्रमांक ... नों. दि. ... वाचनालय शाखा

सदासिं[1] शिरे यदा कपि सुरासुर ही उठती ।
दिनकर चण्ड पाहत उलूक न कां दिपती ? ॥
असुर--वरासि वंदुनि सभेंत तदा बसला ।
कपि निज लांगुलासनिं; सुरारि मनीं जळला. ॥७१॥

कपिवर बैसतां रिपु--सभासद ते बसले ।
रवि शशि वन्हि वायु यम आदिक तों सगळे-- ॥
थरथर कांपती, कुपित पाहूनि त्या अदया ।
परि मरुतात्मजा तिळ न भीति वसे हृदया ॥७२॥

गजपति--यूथिं केसरि तसा चि सुधीर बसे ।
गरुड भुजंगमां बघुनि भीति धरीत नसे ॥
हरिभजकां मनीं अपर भीति कदा न वसे ।
अतिशय कोपयुक्त मग रावण त्यास पुसे-- ॥७३॥

[1] सभेंत

" वद मज धीट तूं कवण मर्कट येशि कशा[1] । १ कशाला
उपवन नाश कां, वधिसि राक्षस सांग असा, ॥
मम भय मानसीं तुज जरा न गमे चि कसें ? " ।
कपिवर बोलला " सकल रावण ! सांगु कसें-- ॥७४॥

करुनि यदाश्रया यदिय[2] शक्ति[3] अगाध महा-- । २ ज्याची
अगजग विश्व--संघ रचिते हि अनंत पहा ॥ ३ माया
विधि हरि रुद्र अंश, सृजती अवती[4] हरिती । ४ रक्षण करितात
यदिय बलांशयुक्त अहिराज मही धरिती ॥७५॥

विविध वपू धरूनि सुर--रक्षण जो करितो ।
तुजसम दुर्जनां उचित दंडुनि उद्धरितो ॥
भवधनु भंगुनी विमद भूप, सुरारि, करी ।
वधि खर--दूषण--त्रिशिर--वालि हि जो समरीं-- ॥७६॥

अति बलवंत जो, यदिय अंश बळें मिळलें-- ।
असुरपते तुला विजय, भाग्य ज़गीं अगळें ॥
शठसम तूं यदीय हरिली गृहिणी विजनीं ।
समज मला सुरारि! कपि दूत तदीय,[5] मनीं ॥७७॥ ५ त्याचा

विदित तुझें प्रभुत्व मज रावण सर्व असें-- ।
दशशतबाहुसी समरिं काय घडे हि कसें ! ॥
समरिं तुवां यशा मिळविलें बघ वालिसवें ! " ।
श्रवण करूनि रावण हसे, न परी वदवे ॥७८॥

" करुं उदरक्षुधा–शमन खाउनि पक्क फळें ।
तरुचर[1] मी स्वभाव तरुभंजन हा च बळें ॥ 1 वानर
सहज वपू असे प्रिय पहा सकळां जगतीं ।
करिति मला प्रहार शठ, ते वधिले कुमती ॥७९॥

मग तव पुत्र बंधन करी, मज, लाज नसे ।
निजपति–कार्य पूर्ण करणें मम चित्तिं वसे ॥
कर युग जोडुनी विनवुं रावण ऐक तरी ।
मद ममता त्यजूनि मम भाषण चित्तिं धरी ॥८०॥

बघ कुलवंत तूं स्वकुळकीर्तिस ना मळवी ।
मनिं भज भक्तभीतिहर राम यशा मिळवी ॥
अगजग भक्षि काळ, परि तो हि सुभीत जया ।
उचित न वैर त्या; त्वरित जानकि अर्पि तया ॥८१॥

खर–रिपु राम, जो प्रणतपाल कृपाल पहा ।
शरण तयासि जा क्षमिल तो अपराध महा ॥
प्रभुपद पंकजा हृदयिं रावण तूं धरणें, ।
अविचल राज्य हें विपुल सौख्यद, बा ! करणें ॥८२॥

विमल यशेंदु तो ऋषि पुलस्ति जगीं विलसे ।
नच बनणे तयावरि सुरारि कलंक तसें ॥
रघुवर नामवीण रसना सुमुखांत अही ।
लवण विहीन अन्न, जगणें भजनाविण ही, ॥८३॥

विफल चि संपदा ' हरिपदाब्जरती विण जी ।
पण[1] दशकंठ हा—' हारिविणें अविता न जगीं ॥ १ प्रतिज्ञा
रघुवर वैर जे करिति, दानव मानव वा ।
विधि हरि राक्षिती न, शत शंकरही अथवा ॥८४॥

त्यज बहु मोहमूल, अभिमान सुदुःखद जो ।
भज भगवंत राघव कृपाघन सौख्यद जो ॥ "
विरति विवेक भक्ति नय युक्त वदे कपि तों, ।
परि न रुचे तया विहसुनी खळ कीं वदतो– ॥८५॥

अति अभिमान युक्त म्हणतो– " कपि आज महा– ।
गुरुवर बोधवंत[2] उपदेश करीत पहा ॥ २ ज्ञानी
मरण तुझें शठा ! निकट तूं म्हणुनी मजला-- ।
शिकविशि रे खळा " उलट होय " कपी वदला ॥८६॥

कपिवच ऐकुनी "असु[3] हरा म्हणतो" चिडला । ३ प्राण
निशिचर यूथ थोर कपिला वधण्या उठला ॥
सचिव सवें बिभीषण पदीं नमना करितो ।
" अनुचित नीति दूतहनना करणें " म्हणतो ॥८७॥

" उचित चि अन्य दंड करणें सरकार असे " ।
सकल भला म्हणति मंत्र सुयोग्य असे ॥
त्वरित चि अंगभंग जन हो ! कपिचा करणें ।
कपि ममता खरी अधिक पुच्छि " सुरारि म्हणे ॥८८॥

कपिखळ पुच्छहीन मग जाइल हा कुमति ।
नृपसुत घेउनी परत येइल शीघ्रगति ॥
बहु करितो स्तुती बल पराक्रम पाहिन मी " ।
' खळ–मुखिं शारदा वदलि ' मानि कपीश, नमी ॥८९॥

कपिवर–लांगुला पट अनेक निशाचर ते– ।
दृढतर बांधिती बहुत ओतिति तैल हि ते ॥
नवल पहावया बहुत गर्दि तदा जमली ।
पुढिल दशा परी पुरजनां तिळ ना कळली ॥९०॥

असुर अनेक ढोल करटाळि हि वाजविती ।
नगरिं समस्त धिंड कपिची मग काढिति ती ॥
करतल लाथ मारुनि कुशब्द किती वदती ।
' विपिन उजाडिले निशिचरां वधिलें ' म्हणती ॥९१॥

" कटुतर भोग मर्कट ! फळासि अतां जगतीं " !
कपिवर लांगुला अनल लावुनि पेटविती ॥
छळ बहु साधुचा सुखवि दुष्टजनां जगतीं ।
सकल विनाश पूढिल महाखळ ना बघती ॥९२॥

जळत बघूनि पुच्छ कपि सोडुनियां दिधला ।
पवन सहाय पाहुनि कपी गगनीं उडला ॥
उडुनि कपीश जाइ सदनो–सदनीं हि यदा ।
पुरज़न हाय ! हाय! करिती रडती हि तदा ॥९३॥

म्हणति ' न हा कपी कुणि सुरोत्तम खास असे ।
निशिचर नायका कुमति, ' हा पुर जाळितसे ॥
बहुविध गाळि देति म्हणती खळ रावण हो ! !
कुणिनच रक्षिता व्यसनिं आज अम्हांस अहो ! ॥९४॥

सकळ पुरीस वन्हिमुखिं देउनि वानर तो ।
बिभिषण गेह मात्र मतिमंत चि वाचवितो ॥
जलधि-जळीं पडे, विझवि पुच्छ; निमज्जुनि तो- ।
निशिचर-संगदोष अतिपुण्यजळें हरितो ॥९५॥

झडकरि जानकी-निकट येउनि पायिं नमी ।
" जननि निरोप दे प्रभुसमीप चि जाइन मी ॥
मज निजचिन्ह कांहिं तरि देइ, जसें प्रभु दे " ।
जनकसुता स्वभूषण समर्पुनि त्यास वदे- ॥९६॥

" प्रभुपादिं वंदना वदुनि " पूरितकाम जनां ।
हरि मम संकटा स्मरुनि दीनदयाल पणा ' ॥
वदुनि, जयंत-गोष्ट पतिबाण पराक्रम तो ।
वद, दिन तीस जाति मम दर्शन योग न तों ॥९७॥

खल वदला मला, विदित सर्व कपे तुजला ।
तरि मग सांग हा जगवुं देह कसा अबला ॥
सुत तव दर्शनें हृदय शीतल होइ जरा- ।
पुनरपि शोक दाह दिनरात भरेल उरा ॥९८॥

जनकसुतेसि धीर समजावुनि देइ हरि[1] । १ कपि; मारुती
पदकमलीं शिरा नमवुनी गमनासि करी ॥
कपि करि गर्जना, बहु निशाचरि गर्भ गळे ।
जलनिधि लंघिला किलकिलाट कपींस कळे ॥९९॥

कपिगण पाहती अति सहर्ष तया सगळे ।
मुख कमल प्रसन्न जणुं कार्य वदे घडलें ॥
खचित चि जीवदान कपिनें अपणां दिधलें ।
जणुं मरत्यामुखीं अमृत, तेविं घडे वदले ॥१००॥

निघुनि सुशीघ्र सर्व इतिहास पथीं पुसती ।
मधुवनि[2] जाउनी मधुफळें कपि खाति अती॥ २सुग्रीवाचा फलभाग
शमवुनि भूक कीश पळले कपिराजपदीं ।
नमुनि सहर्ष सर्वहि कथा वदले शुभ ती ॥१०१॥

प्रभु ! हनुमंत कार्य करि हें वदले सगळे ।
कपिगण-रक्षिता पवननंदन आंगबळें ॥
कपिपति हर्ष निर्भर तया कपिला कवळी ।
सकल कपी कपीश पळले प्रभुचे जवळी ॥१०२॥

स्फटिक शिळेवरी उभय बंधु तदा बसले- ।
बघुनि कपींस, जाणति ' सुकार्य असे घडलें ' ॥
प्रभुपद कंजि वंदन समस्त यदा करिती ।
रघुवर भेटुनी कपिगणां कुशला पुसती ॥१०३॥

मग मृदु जांबवंत वदला "प्रभु ! ज्या वरती- ।
अगजगनाथ राम करितात कृपा पुरती ॥
कुशल सदैव तो सुरमुनी हि कृपा करिती ।
गुणनिधि कीर्तिमंत जयवंत हि तो जगतीं" ॥१०४॥

"प्रभुवर ! कार्य हें सकल पाय–कृपा चि करी ।
सफल जगांत जन्म अमुचा तरि आज हरि ! ॥
पवनकुमार हा अघटिता करि जी करणी ।
कधिं न च वर्णवे प्रभु ! तया, धरि जो धरणी" ॥१०५॥

सकल हि मारुती चरित ऋक्षपती वदला ।
परिसुनि मोद राम–हृदयीं किति हो ! भरला ॥
प्रभुवर भेटले कपिवरा कवळूनि मुदा ।
"जनकसुता कशी जगविते असु ?" हें चि वदा ॥१०६॥

"प्रभु! बघ जानकी-असु[1] तिचे हृदयीं वसती । [1] जानकीचे प्राण
रघुवर रूप चिंतनिं सुलीन सदा असती ॥
निशिदिन राम नाम मुखिं रक्षक तो बसला ।
प्रभुपदिं नेत्र बद्ध; गमना पथ ना उरला ! ॥१०७॥

रघुपति ! मूद ही प्रभुसि जानकिनें दिधली" ।
निजकरि घेउनी सपदिं राम हृदीं कवळीं ॥
"जळ नयनीं भरूनि वदली प्रभु कांहिं सती- ।
पदकमलीं नमूनि उभयां, करिते विनती ॥१०८॥

पदिं अनुरक्त वाक् तनुमनें प्रभु ! सत्य असें ।
मम अपराध कोण ? त्यजिती रघुराज असे ? ॥
अवगुण एक मात्र विरहीं जगले असु हे ! ।
गमन करूं न देति असुनां खळ नेत्र चि हे ॥१०९॥

प्रभु ! विरहाग्नि हा श्वसन वायु, हि तूल तनु ।
जळुनि हि भस्म होत, मम नाथ ! पळांत जणुं ॥
परि मम अंबकद्वय[२] चि अंबुद वर्षति हा ! ।
मम वपु ना जळे विरहवान्हि विझे न अहा ! ! ॥११०॥

२ डोळे

जणुं नयनांस आस ' गुणरूपनिधान-पदां- ।
सतत दयालुशील करुणा उपजे चि कदा ॥
त्रिभुवनसुंदरा बघुनि या शमवूं विपदा ' ।
म्हणुनि न जाळुं देति, तनुला, भिजवीति सदा " ॥१११॥

रघुपति ! जानकी-विपद-दुःख कसें वदवे ।
पळ शत कल्पसे, तिजसि जाइ वियोग-दवें ॥
त्वरितचि जाउनी खळ मळाकर तो वधणें ।
प्रभुपद-दर्शनें विरह-मुक्त सती करणें ॥११२॥

" सतत शरीर-वाङ्-मन अनन्यगती भजती ।
स्वप्निहि सांग कीं कधिं तयां विपदा असती " ॥
" भजन तुझें घडे न विपदां प्रभु तीच अती ।
मशक समान रावण वधूं , सुखवूं सुसती " ॥११३॥

" सुर मुनि मानवादि उपकार असे न करी- ।
करिशि कृपे जसे मजवरी, वदु सत्य तरी ॥
मजसि सुचे न सोय, उपकार फिटे न कदा ! ' ।
सजल सुलोचनीं प्रभु कपीस बघे कितिदां ॥११४॥

परिसुनि शब्द, पाहुनि मुखाब्ज, सुहर्ष मनीं- ।
कपि " भगवंत ! रक्ष ! " वदला पडला चरणीं ॥
वच नुमटे, पदां भिजवितो नयनाब्ज-जळें ।
प्रभु बहुवार त्या उठविती परि तो न चळे ॥११५॥

निजकर-पंकजा कपिशिरीं प्रभुराज धरी ।
निज भुज बंधनीं कवळिला कपिराज उरीं ॥
बसवुनि अंकि त्या स्वकर पाठि-मुखीं फिरवी ।
कर धरुनी तया निकट आपुलिया बसवी ॥११६॥

न हिं जगिं भाग्यवंत दुसरा हनुमन्त कुणी ।
सतत चि राम बद्ध असती तुमचे वचनीं ॥
कपि ! करुणालया करि दया रति रामपदीं- ।
मजसि अनन्य देइ करितो कविही विनती ! ॥११७॥

" करिशि कसें विदग्ध पुर रावण पालित तें ' ।
रघुवर सुप्रसन्न कळलें कपिला पुरतें ॥
वच अभिमानहीन वदला नमुनी सुपदा ।
" कपि पुरुषार्थ तों तरुवरी उडणें चि सदा ॥११८॥

जलनिधि लंघुनी पुर सुवर्ण विदग्ध पुढें ।
शमवुनि जानकीस वननाश सलील घडे ॥
खचित पद–प्रताप रघुराज करी सगळें ।
मम पुरुषार्थ नाथ ! नचहा मजला कळलें ॥११९॥

प्रभु अनुकूल त्या जगिं अशक्य न कांहिं पहा ।
मशक तुझ्या कृपें मृगपतीस वधील महा ॥
करुनि कृपा प्रभो सुपदभक्ति अखंडचि दे ।"
कपट–विहीन वाक्य परिसूनि 'तथास्तु' वदे ॥१२०॥

रघूपतिचा स्वभाव नर जाणति जे जगतीं ।
इतर न साधनीं श्रमति, रामचि एक गती ॥
हृदयिं कथा–प्रसंग जरि बिंबित होइल हा ।
रघुपति- भक्तिलाभ नर ते करितील महा ॥१२१॥

प्रभुवचनामृता श्रवण कीश[1] यदा करिती ।
जय जय सौख्यसिंधु रघुनाथ ! मुदें म्हणती ॥
वदति कपीश्वरा प्रभु, "विलंब नसे करणें ।
कपिगण सर्व घेउनि सुशीघ्र अतां निघणें" ॥१२२॥

१ वानरें

कपिपति आणवी सकल वानर–ऋक्षगणां ।
प्रभुपदपंकजीं करिति येउनि ते नमना ॥
सरसिजनेत्र राम अवलोकि कृपा करुनी ।
कपिगण पक्षवंत गिरिसे अति हर्ष मनीं ॥१२३॥

रघुपति वानरां सहित शीघ्र करी गमना ।
शकुन अनेक सन्मुख सुमंगल त्यां नयनां ॥
जनकसुते प्रयाण कळलें, तनुच्या स्फुरणें ।
अपशकुनां बघे बहुत रावण, खिन्न मनें ॥१२४॥

प्रभुवरि पुष्पवृष्टि करुनी सुर जाति गृहीं ।
हरि-चमु-भार दारुण सहूं शकली न मही ॥
जलनिधितीरिं जाति अति सत्वर राघव ते ।
तिकडिल वर्तमान वदणें, परिसा क्षण तें ॥१२५॥

कपिवर जाळुनी नगर जाइ निघून यदा ।
पुरजन ते सचिंत भयभीत अतीव तदा ॥
म्हणति परस्परां 'शुभ दिसे न विचार करा ।
पुर कपि एक जाळि तरि राम वधी असुरां' ॥१२६॥

निशिचर दार ऐकुनि रघूत्तम आगमना ।
विनवि पतीस ती तळमळे, जणुं आग मना ॥
"रघुवर वैर नाथ ! अझुनी त्यजणेंचि बरें ।
मम वचना धरा मनिं, निशाचर नाश सरे ॥१२७॥

रघुपति दूत गर्जन जसें पडलें श्रवणीं ।
सकल निशाचरी स्त्रवति गर्भ पुरीं धरणीं ॥
रघुवर–अंगना करि समर्पण शीघ्र सती ।
तव कुळ–वारिजां समज शीत निशेसम ती ॥१२८॥

पति ! रघुनाथ जो, मनुजभूप नसे समजा ।
स्थिरचरनाथ तो, अमर--रक्षक हें उमजा ॥
भ्रुकुटि--विलासिं जो अखिल विश्वहि संहारितो ।
मधु-कनकाक्ष[1]-कैटभ-विमर्दक जो हरि तो ॥१२९॥ १ हिरण्याक्ष

रघुपति बाण काळभुजगांसम कीं समजा ।
निशिचर--संघ मूषक, किती करिती गमजा ॥
महिरज कीं कधीं कुलिश[2]--नाश करूं शकतें ? । २ वज्र
शशक--करें कधीं गजविदारण कीं घडतें ? ॥१३०॥

निज सहधर्मिणी--वचन--बाण मनीं खुपले ।
परि करवे न कांहिं, वदला हसुनी हि पळें ॥
" सभय सदा स्त्रिया, " सुकवि सत्य जगीं म्हणती ।
म्हणुनि सुमंगलीं, मन सुकोमल, घाबरती ॥१३१॥

सुर, सुरपाल ज्यास दिशिपाल हि भीत अति ।
सभय तदंगना ! बघुनि विस्मित होत मति ॥
निशिचर भक्षिती कपिकुळें जरि येति बळी ।
वदुनि असें तिला शठ सुराग--भरें कवळी ॥१३२॥

मग वदली तया " पुरविदाह कपी करितां ।
निशिचर कां न खाति कपिला, मुख त्यां असतां ? ॥
पति ! नच वल्गना उचित या समयीं अपुली " ।
मानिं अति लाजला उठुनि जाइ सभेस बळी ॥१३३॥

शिरुनि सभें नृपासनिं जसा मदमूर्ति बसे ।
' जलनिधिं पार राम उतरे ' कळलें हि असें ॥
सचिव गणां म्हणे " उचित काय वदा करणें " ।
स्तुति करुनी तया फुलविती, " भय ना धरणें ॥१३४॥

प्रिय वदती गुरू सचिव वैद्य सलोभ, भयें—।
वपु परमार्थ राज्य, अतिशीघ्र तिघां क्षय ये !
अवसरिं ये बिभीषण सभेमधिं; पायिं शिरा— ।
नमुनि बसे, वदे उचित उत्तर बंधुवरा ॥ १३५ ॥

" यदि पुसतां, यथामति वदेन सुनीति खरी ।
श्रवण करी सुशांत, मनिं कोप न अल्प धरी ॥
सुयश सुभाग्य सद्गति सुखाकर वांछिल जो-।
गणि परनारि-आनन चतुर्थि-शशी-सम तो ॥१३६॥

भुवन-चतुर्दशेश करि सज्जनवैर महीं ।
सुख-मुख ना बघे, न टिकतें चिर वैभवही ॥
गुणनिधि बुद्धिमंत असुनी अणु लोभ मनीं ।
नर कधिं तो न वंद्य ठरतो जगतीं सुजनीं ॥१३७॥

निरय-कुपंथ काम मद लोभ हि कोप जनीं ।
भज रघुवीर संत भजती, त्यज मोह मनीं; ॥
न हि नरभूप राम, परमेश्वर काळ महा ।
अजित अनंत नादि, भगवंत निरामय हा ॥१३८॥

द्विज-सुर-भूमि-धेनु-सुहिता नररूप धरी ।
खळगण भंगुनी स्वजनरंजन नित्य करी ॥
श्रुतिपथ रक्षिता प्रणतपाल कृपाल हरि ।
प्रभु ! त्यज वैर, राम भज, मज्ज कृपालहरीं ॥१३९॥

जनकसुता समर्पि, करुणालयिं जा शरण ।
हरि शरणागता त्यजि न; दोष करी क्षमन ॥
त्रिविध हि ताप नाश करि नाम यदीय पहा ! ।
प्रकट परेश तो, समज रावण, राघव हा ॥१४०॥

चरणिं पुनः पुन्हां दशमुखा तव मी नमितो ।
परिहर मान मोह मद, राम भजा; प्रभु तो ॥
मुनिवर जें पुलस्ति निजशिष्यमुखें कळवी ।
तुज कथिलें? तरी स्वकुळकीर्तिस ना मळवी" ॥१४१॥

सचिव हि माल्यवन्त मुदितानन कीं वदतो ।
"उचित बिभीषणें कथित, नीति विभूषण तो ॥
दशमुख! आचरा कुलविनाश चुकेल तरी ।"
"रिपुहित पाहती उभय द्या हकलून दुरीं" ॥१४२॥

ग्राहिंगत माल्यवंत, हि बिभीषण जोडि करां ।
"निगम पुराण, नाथ ! वदती वच चित्तिं धरा ॥
अशुभ शुभा मती सकल–चित्तिं निवास करी ।
सुमति तिथें सुसंपद, कुबुद्धि विपत्ति–पुरी ॥१४३॥

तव हृदयीं वसे कुमति, जी विपरीत करी- ।
प्रिय अहिता, हिता अहित, मानिसि चित्तिं तरी ॥
निशिचर—वंश—वारिज--विनाशक काळ--निशा ।
प्रिय अति मानिसी जनकजा, मनिं बंधु ! कसा ? ॥१४४॥

तव पदिं लागतो पुनरपी करतो विनती ।
रघुपति-पत्निला करि समर्पण शीघ्र अती " ॥
श्रुति बुध संत संमत सुनीतिपथा वदला ।
परि अति कोप-मारुत दशास्य-शिरीं भरला । १४५॥

उठुनि वदे " शठा जगसि हीच मदीय दया ।
प्रिय रिपुपक्ष फार गमतो तुझिया हृदया, ॥
प्रिय तुज तापसी; निघुनि जा; वद नीति तयां ।
वससि पुरीं मदीय ! नच लाज जरा हृदया ! " ॥१४६॥

कटुवच बोलला, चिडुनि लाथ हि मारि उरीं ।
नमवि शिरा बिभीषण धरूनि पदा स्वकरीं ॥
" जनकसमान अग्रज,' जरी मज मार दिला- । १वडीलभाऊ
भज रघुनायका, करि हिता, विनवूं तुजला " ॥१४७॥

हित-उपदेश, घोर विष, दुष्ट मना गमतें ।
मरण समीप ये तरि सुधा कटु रुग्णमतें ॥
जगिं अपकारका हि हित चिंतिति साधु भले ।
परि उपकारकां अहित वांछिति दुष्ट खुळे ॥१४८॥

सचिव सर्व, बिभीषण नमी उठुनी वदला ।
" सकल सभाचि कालवश ही कथितो तुजला ॥
शरण चि जाउं रामपदिं दोष न देइ मला " ।
गमन करी जणूं सहित रावण–आयु–बला ॥१४९॥

करित मनोरथां विविधशा, करितो गमना ।
" मुद अति होइ, पाहुं हरिपादसरोज मना ! ॥
पदरज लागतां मुनिवधू तरली अघ जी ।
शिवहृदयांबुजीं मधुप राम बघूं सहजीं ॥१५०॥

नयन सभाग्य हे खचित होतिल आज मम ।
बघुनि सुनील–कोमल–कृपांबुद पावुं शम " ॥
करित विचार सिंधुपरतीरिं यदा उतरे ।
पुसति समग्र वृत्त कपि मानुनि दूत खरे ॥१५१॥

मग कपिवृंद घेरिति तया असुरासि तदा ।
किति कपि–दूत हें कळविती कपिराज–पदा ॥
" प्रभु ! रिपु–बंधु तो शरण येइ, " कपीश म्हणे ।
रघुवर बोलले " उचित काय वदा करणें " ॥१५२॥

" निशिचर कामरूप कपटी रिपुभेद कळे-- ।
म्हणुनिच येइ; बंधन तया करणें च भलें. "
" समुचित नीति तूं वदसि मित्र ! महा निपुण ।
परि ' शरणागता अभयदान ' मदीय पण " ॥१५३॥

त्यजि शरणागता अहित मानुनि जो अपुलें ।
अघमय त्या नरा बघति ते सुकृता मुकले ॥
"द्विजवर-कोटि घात करि येइ पदीं शरण ।
त्यजुं न तया, करूं सकल पापगिरी दहन ॥१५४॥

परिसुनि मारुती स्वमनिं बोलत मोद अति ।
'प्रभु शरणागतप्रिय खरे न दुजे दिसतीं ॥
अघमय जीव सन्मुख मदीय न ये सखया ।
मम भजनीं रुचीच नुपजे कधीं पापमयां ॥१५५॥

सुविमल चित्त जीव जगिं पाहति बा मजसी ।
कपट मला रुचे न लवलेश वदूं तुजसी ॥
दशमुख पाठवी जरि हि भेद कळे म्हणुनी ।
तरि नच हानि कांहिं मम; जाण बरें स्वमनीं ॥१५६॥

तम घनदाट होय तरिं काय बुडेल रवि ! ।
निशिचर बीज एक मम लक्ष्मण ही नुरवी ॥
यदि भयभीत ये शरण, रक्षुं असूं-सम[1] या । १ प्राणांप्रमाणें
रिपु अथवा सुभक्त तरि आणावि त्या, सखया ! ॥१५७॥

पवनसुतांगदादि जय ! गर्जुनिया निघती ।
कपि अति आदरें पुढति घेउनि त्या वळती ॥
नयनसुखामृताकर-युगां बघतो दुरुनी ।
पुनरपि राम रूपजलधी नयनीं भरुनी ॥ १५८ ॥

निमिष न हालवी लिखित चित्रिं वर्य-भृंगसा ।
करि-कर-दीर्घबाहु बहुकामविमोहकशा- ॥
शरद-नभाभ-नील-वपु, नीरजनीलमुखा ।
अरुणसरोरुहाक्ष-भयभक्षक-भक्त-सुखा ॥१५९॥

नयन सनीर, गात्र पुलकांकित, कंठ भरे ।
धरुनि मनीं सुधीर विनवी अतिमोद-भरें ।
" निशिचर-वंशिं जन्म, मम रावण बंधु असे ।
सहज कुलाय[1] पापरत, पल्वलिं दर्दुरसें ॥१६०॥ १ देह

श्रवण करूनियां धवल या शरदेंदु-यशा ।
भवभयभंजका शरण मी चरणीं परिसा ॥
रघुवर रक्ष ! रक्ष ! ! जल आर्तिहरा सुखदा " ।
वदुनि सुदीन दंडवत वंदिति राम--पदा ॥१६१॥

परिसुनि दीन वाङ्, मुदित दीनसखा उठवी ।
निजभुज--पाशिं बद्ध करि राघव त्या सुखवी ॥
अनुज समेत भेटुनि, समीप तया बसवी ।
प्रभु निजभक्त–भीति–हर वागमृतें जगवी ॥१६२॥

" सह परिवार लंकपति सर्व वदा कुशला ।
निशिदिनिं कुस्थळीं, कुजनिं वास असे अपुला ॥
वद करिशी कसा सुजन–धर्म–निवाह बरें ।
नय–निपुणा अनीति तुज अप्रिय, जाणुं खरें ॥१६३॥

अनुक्रम
विभाग
क्रमांक
ता. दि.
वाचनालय

निरयनिवास ही उचित तात ! गमेल मना ।
परि न च दुष्टसंग घडवो विधि तो सुजनां " ॥
" निज जन[1] जाणुनी सदय ! द्या पदरांत यदा– । [1] भक्त
कुशल समग्रही मम करीं पडलें चि तदा ॥१६४॥

कुशल न तोंवरी जगतिं जीव बघें स्वपनीं ।
तव–पद–पंकजीं न रत, काम पदा त्यजुनी ॥
तंव वरि लोभ मोह मद मान मनीं असती ।
जंव न च चापबाण–धर राम करीं वसती " ॥१६५॥

न रघुवर–प्रताप–रवि जोवरि ये उदया ।
तंववरि शोकभीति वसती असते हृदया ॥
वपु–ममता निशा, हृदय अंध–तमीं बुडवी ।
निशिचर काम आदिक उलूक गणां सुखवी ॥१६६॥

" प्रभु चरणांबुजा बघुनि भीति, न अल्प उरे ।
कुशल चि पूर्ण मी प्रभु–दयाबुद–वृष्टि–भरें ॥
जगतिं कृपाल ज्या वरि तुम्हीं अनुकूल पुरे ।
मानिं न तया नरा त्रिविध संसृति–शूल उरे ॥१६७॥

अधम महा स्वभाव मम, शुद्ध न आचरण ।
परि दिसले मला विधिशिवार्चित हे चरण ! ॥
मुनिवर कष्टती, परि न चित्तिं हि रूप दिसे ।
प्रभु मजला धरी हृदयिं ! हें मम भाग्य असे " ॥१६८॥

" विदित मम स्वभाव बघ काकभुशुंडि-शिवां ।
स्थिरचर वैरि ही शरण येइ रिपू मम वा - ॥
सकल मदादि मोह कपटा त्यजुनी हि यदा !
करिन तयास मी खचित साधुसमान तदा ॥१६९॥

सुत- धन- दार- बंधु- जननी- सदनीं ममता ।
सकल हि काढुनी वळुनि रज्जु, मदीय पदा ॥
दृढ मन बांधिती, भय न हर्ष न शोक मनीं ।
गत—मद--काम संतत बघे समदृष्टिं जनीं ॥१७०॥

सुजन असे मना मम कसे वदतो रुचती ।
' हृदयिं कदर्युचे धन जसें करितें वसती ' ॥
तुज सम संत ते प्रिय अतीव मला गमती ।
म्हणुनिच देह घेउं, सुख देउं तयां जगतीं ॥१७१॥

सगुण उपासना नियत चित्त सदा करिती ।
परहित——साधनीं रत, सुनीति—पथा धरिती ॥
द्विजपद-पूजन प्रिय जयां सुजनां गमतें ।
खचित चि बा ! मला प्रिय मदीय असूंहुनि ते ॥१७२॥

सकल हि या गुणां सदन लंकपति असती ।
अतिशय तूं मला प्रिय खरा सखया ! गमसी " ॥
प्रभु—वचनामृता करि बिभीषण जों श्रवणा— ।
हृदयिं न तृप्ति होय बहुवार नमी चरणां ॥१७३॥

" स्थिरचरनायका ! प्रणतपाल ! असां हृदयीं– ।
मम मानिं आस एक वसली प्रभु ! त्या समयीं ॥
पदरति–निर्झरें प्रभु तिला समुळीं हरली ।
निजपद--भक्ति देइ मज, शंभु–मनीं भरली " ॥१७४॥

जलनिधि नीर मागवि, वदूनि ' तथास्तु ' असें ।
" जरि गत--काम तूं, मदिय दर्शन मोघ[1] नसे ॥ १ व्यर्थ
नर अमृताब्धि जो करि निमज्जन बा सख्या ।
भिजवुनि केविं तो अमरही न करील तया " ॥१७५॥

प्रभु अभिषेक त्या करिति रावण–राज्यिं यदा ।
प्रभुवरि पुष्पवृष्टि करिती सुर सिद्ध तदा ॥
निज–वचनानिळें अनळ रावणकोप जळे - ।
जळत बिभीषणा जगवि राम कृपा–सुजळें ॥१७६॥

शिवपदिं मस्तकें दश समर्पुनि रावण जें-- ।
मिळवि सुराज्य, तें करिति अर्पण, तृप्त न ते[2] ॥ २ रामचंद्र
त्यजुनि अशा प्रभूस नर अन्य सुरां भजती ।
तरि पशु पुच्छहीन आविषाण[2] हि ते जगतीं ॥१७७॥ २ शिंगरहीत

मग म्हणती प्रभू " जलधि दुस्तर हा तरणें ।
मकर--झषादि--संकुल गभीर अगाध " म्हणे-- ॥
तव शर कोटि सागर हि शोषक राम ! जरी ।
नृपनय--युक्त तेंचि वदतो, प्रभु पायिं तरी ॥१७८॥

रविकुळ भूप जो सगर; सागर निर्मितसे ।
कुलगुरु सिंधु हा तव रघूत्तम ! सत्य असे ॥
विनति तया करा, तरि वदेल उपाय बरा ।
वदुनि असें बिभीषण पदाब्जि नमी स्वशिरा ॥१७९॥

प्रभु म्हणती " सुनीति मज तूं वदसी सखया ।
उचित करूं अतां, जरि सुदैव करील दया ॥
प्रभु वच लक्ष्मणा न रुचलें; अति खिन्न म्हणे- ।
अनुचित दैव--आस रघुराज दिसे धरणें ॥१८०॥

निजमनिं कोपुनी जलधि--शोषण शीघ्र करा ।
समुचित दैववाद समयां अलसां हि नरां " ॥
" अनुज तसें चि बा ! करुं सुधीर मनांत धरी ।
नृपनय साम तो प्रथम भूप सुयोग्य करी ॥१८१॥

जरि न च होय कार्य तरि दंड पुढें करणें ।
सचिव वचांसि मानुनि सुनीति पथा धरणें " ॥
जलनिधि तीरिं जाति अनुजासि वदूनि असें ।
प्रभु करुनी प्रणाम कुश घालुनि तेथ बसे ॥१८२॥

बिभिषण येइ जैं नगर सोडुनि रावण तों- ।
निशिचर दूत गुप्त इकडे बहु पाठवितो ॥
कपितनु ते धरूनि कपटी बघती चरिता ।
मनिं गुण वर्णिती हि शरणागत--वत्सलता ॥१८३॥

प्रभुगुण--लुब्ध ते प्रगट वर्णिति रामगुणां ।
कपट न आठवे, विसरलें मन दूतपणा ॥
तंव कपि जाणुनी कपटदूत तयां धरिती ।
करुनि निबंधना त्वरित नेति कपीश--पदीं ॥१८४॥

करुनि सुभंग अंग मग यां हकला च बळें " ।
फरफर ओढिती फिरविती कटकीं सगळे ॥
कपि बहु मार मारिति तदा अति दीनपणें-- ।
विनविति, सोडिती न, कपि झोडिति धीटपणें ॥१८५॥

कपि 'चर[1]-नाक कान करुं छेदन' जों वदती । १ हेर
'रघुवर आण त्यां' चर निशाचर ते म्हणती ॥
परिसुनि लक्ष्मणा मनिं दया उपजे मग तो- ।
सकल हि आणवूनि करि मुक्त, तयां वदतो- ॥१८६॥

निशिचर--नायका--करिं सुपत्र समर्पण हें-- ।
करुनि, वदा मुखं मम निरोप तयाप्रति, " हे-- ॥
स्वकुलविनाशका करि समर्पण जानकिला ।
नच तरि काळ हा तव समीप पहा वळला " ॥१८७॥

प्रणमुनि लक्ष्मणा चरणिं, वार्णित रामगुणां- ।
त्वरित चि येउनी करिति भूप-पदीं नमना ॥
" तव कुशला शुका ! वदसि कां न; " म्हणे मग तो ।
" बिभिषण ही जगे, निकट मृत्यु, कसा वद तो ॥१८८॥

अनुपम वैभवा त्यजुनि जाइ पहा शठ तो ।
यवगत कीटकासम अभागि च कीं दिसतो ॥
मग वद भालुकीश कटका–विषयीं सगळें– ।
मम भय भीत तापस कथा वद जेविं कळे ॥१८९॥

वद तुज भेटले किं पळले यश ऐकुनियां ।
रिपुबल--तेज सर्व वद; विस्मित तूं हृदया !" ॥
"निशिचर नायका पुससि; सांगु तरी परिसे– ।
निज मनिं कोप मात्र न करा; वदतो हितसें ॥१९०॥

बिभिषण जाइ तों चि अभिषेक तया करिती ।
रिपुचर जाणुनी करिति दण्ड अम्हांस अति ॥
कपिगण नाक कान हरितां, हरि-आण तयां ।
सपदिंच घालुनी जगुनि येउं तुझ्या पदिं या ॥१९१॥

वदनिं अनेक तें कटक ना वदवे, न कळे ।
निज–पुर–दाहका–सम, समग्र कपी दिसले ॥
सकल हि वालिचे सम बली असुनी कपि ते।
रिपुदळ पद्म अष्टदश जाण असे पुरते ॥१९२॥

निशिचर नायका ! तुज रणीं न वधील असा– ।
कपि न च एकही कपिचमूमधि, जाण कसा ! ॥
सहज चि शूर ते; वरि शिरीं रघुराज तयां ।
रणिं बहु काळ–रावण हि जिंकुनि घेति जया ॥१९३॥

रघुवर तेज बुद्धि बळ, शेष सहस्र जरी– ।
वदति, न वर्णवे मम मुखें वदुं केविं तरी ॥
रघुपति तीर एक, शतसागर--शोष करी " ॥
बघुनि सकोप त्या, शुक समर्पण पत्र करी ॥१९४॥

निशिचर नाथ पत्र तुज लक्ष्मण देति करीं ।
सकल हि वाचुनी मग सुशीतल छाति करी ॥
मनिं जणुं वाटलें निज करांबुज जाळिल तें ।
सचिव करांत देवबुनि हि पत्र वाचवि तें ॥१९५॥

निशिचर–भूप--भाग्य नव्हतें धरणें स्वकरीं ।
सचिव सभाग्य, धे स्वकरिं वाचन पत्र करी ॥
" विफल चि वल्गना करुनि नाश कुळा न चुके ।
अनुज समान ये शरण तूं; करि बा इतुकें ॥१९६॥

रघुपति वैरिया विजय जाण कधीं न मिळे ।
विधि हरि शंभु ही, तुज न रक्षिति आंगबळें ॥
शरण न येसि तूं जरि समर्पुनि जानकिसी ।
प्रभुशर--वन्हिनें शलभसा सकुळें मरसी " ॥१९७॥

सभय मनांत पत्र परिसूनि; वदे हसुनी– ।
किति लघुतापसी बडबडे जन हो ! लिहुनी ॥
धरणिवरी पडून जणुं सांवरतो गगना ।
मुळिं न कळे प्रताप मम त्यासि खरा चि म्हणा " ॥१९८॥

शुक म्हणतो-- " प्रभो सकल सत्य असे लिहिणें ।
प्रकृति--मदा त्यजूनि मम वाक्य मनीं धरणें ।।
त्यजुनि हि कोप वैर रघुनाथसवें त्यजिसी ।
कुशल तरीच राक्षस कुळा नयनीं बघसी ।।१९९।।

अखिल जगत्पती असुनि कोमल--चित्त किती ! ।
करिति कृपा कृपाल; न च दोष मनीं धरिती ।।
जनकसुता समर्पण करा अझुनी तरि हो ! ।
मम वचना करा समजुनी हितसें प्रभु ! हो " ।।२००।।

श्रवणिं 'विदेहनंदिनि समर्पण' वाक्य पडे ।
उठुनि पदप्रहार उरि त्या दिधला चि जडे ।।
नमुनि पदा निघे शुक कृपातरु दिव्य जिथें ।
प्रणमुनि रामपायिं निजवृत्त समग्र वदे ।।२०१।।

निजगति पावला प्रभुकृपें, मुनिराज खरा ।
घटज[१]-मुनीश-शाप करि राक्षस ज्यास पुरा[२] ।। १ अगस्ति २पूर्वी
नमुनि मुनी पुन्हां रघुवरांध्रीसरोज धरीं ।
प्रमुदित तों सुखें गमन आश्रममार्गीं करी ।।२०२।।

गत दिन तीन सिंधु न च मानि विनंति यदा ।
" शरधनु आण लक्ष्मण " म्हणे रघुनाथ तदा ।।
" विशिख[३]-कृशानुनें करिन शोषण सागर हा । ३ बाणाच्या अग्नीनें
विनति न मानिती शठ कधीं विण दंड पहा ।।२०३।।

कृपण जनां सुनीति; कुपिता शम; बोध--कथा-- ।
अति ममता युता; विरति--वर्णन लोभ--युता; ॥
विनय शठां; तशी हरिकथा हि सकाम--जनां-- ।
वदुनि वृथा चि पेरि नर ऊखरिं बीज गणां ॥२०४॥

वदति असें; धनूवरि रघूत्तम बाण बसे ।
रघुवर कृत्य लक्ष्मण--मना रुचलें हितसें ॥
प्रभुवर लक्षुनी विशिख सोडुं यदा बघती ।
उदधि उरांत घोर बहु वन्हि शिखा उठती ॥२०५॥

मकर झषादि संघ जळती--दिसलें हि यदा ।
जलनिधि विप्ररूप धरुनी पदिं येइ तदा ॥
कनक--सुभाजनीं भरुनि मौक्तिक रत्नमणी ।
सभय मनांत, सागर पडे प्रभुचे चरणीं ॥२०६॥

कर युग जोडुनी विनवितो प्रभु ! बोधमया ! ।
अवगुण सर्व ही क्षमुनि राम ! कराल दया ॥
गगन समीर वन्हि जळ भूमि सदा जड जीं ।
प्रभुवर! निर्मिते तव अजा प्रभु-आश्रित जी ॥२०७॥

जगतिं जयांसि जें प्रभुवरार्पित कार्य जसें ।
करिति समस्त ते, तरि न राघव दोष असे ॥
समुचित दण्ड हा मज दिला रघुनाथ महा ।
जडमति मानिती न विनती विणदण्ड पहा ॥२०८॥

अनुक्रम २... बिभाग ... १२८५ दि. ७/२/५ ...लय शाखा

प्रभु तुमचा प्रताप सुकवूनि मला; उतरे । 
कटक, तरी महत्त्व मम नाथ ! न कांहिं उरे ॥
हरि तव शासना श्रुति अमोघ म्हणे; म्हणुनी । 
वदसि तसें करूं विनावितो चरणीं नमुनी " ॥२०९॥

श्रवण करूनि नम्र वचना स्मितवक्त्र म्हणे– ।
" कपि कटकें सुखें उतरतील तसें वदणें " ॥
" कपि नळ नीळ बंधु कटकीं " वदला असती ।
गिरिवर तत्करीं सहज सिंधुजळीं तरती ॥२१०॥

प्रभुवर ! मी प्रताप तव पावुनि, युक्ति बळें– ।
करिन सहाय हो ! जलधिबंधनिं कीं सगळें ॥
जलनिधि--सेतु या परि विनिर्मित होय यदा ।
त्रिभुवनिं रामचंद्र यश निर्मल गाति तदा ॥२११॥

रघुवर या शरें खळमहा वधणें अधम ।
असुर छळी मला वसुनि उत्तर तीरिं मम " ॥
त्वरित चि राघवें जलधि पीडक तो वधिला ।
रघुवर पौरुषा बघुनि सिंधु सुखें भरला ॥२१२॥

असुर–कथा समुद्र रघुनाथ--पदीं वदला ।
नमुनि रमापती पदसरोज मुदें वळला ॥
सुमत नदीपती कथित राम–मना रुचलें ।
जय जय रामचंद्र ! कपि गर्जति सर्व भले ॥२१३॥

रघुवर मारुती--सुयश भव्य अनंतशतां–[1] ।
खचित न वर्णवे मुख अनंत तयां असतां ॥
तरि मम एक आननिं वदेल किती हि कवि ।
निजमन अल्प राम गुण गाउनियां सुखवी ॥२१४॥

कलिमल हारक–प्रभु चरित्र सुधा शमवी ।
भवदवदाह; संशय मनोभुवनीं नुरवी ॥
सकल दुरास सांडुनि मना भज रामपदा ।
प्रज्ञ अनन्य हो हरिपदीं, सरती विपदा ॥२१५॥

छंदः– बहु सुंदर राम चरित्र तयांत हि सुंदर कांड सु–सुंदर हें ।
किति सुंदर सागर लंघन सुंदर शोक–कथा मन सुन्न रहे ॥
अति सुंदर मारुति,--राम--समागम, सुंदर भक्त विभीषणसे ।
नरकूटक वृत्ताहि सुन्दर सुंदरिं सर्व चि, सुंदर, काव्य नसे ॥२१६॥

मन चंचळ मर्कट! चाखुनियां बघ, रामनिशापति नामसुधेला ।
मग धुंडिसि ना विषवृक्षफळां विषयां कटु नश्वर? तूं वसुधेला ॥
भज नामसुधासव पाननिमित्त रघूत्तम कल्पतरू सुपदासी ।
तरि मान विमोह-मद-क्षुद लोभ तृषार्ति नुरे, तुज मुक्ति सुदासी ॥२१७॥

भवसागर घोर गभीर महा जपयोग तपादिक साध्य नव्हे ।
रघुनायक-रम्य-कथामृतसागरिं मज्जन एकचि साधन हें ॥
गुणगान, कथा श्रवणा करिती, जळयान विना भव ते तरती
कवि दिव्य-रमेश-पदाब्जिं समर्पण सुंदरकाण्ड सुमें करिती ॥२१८॥

[1] शेष

आर्या– सांडुनि सर्वहि साधन भक्तभवापह रमाधवा गावें ।
प्रज्ञानानन्दा रे ! प्रेम पदाब्जीं अगाध मागावें ॥२१९॥

इति श्रीप्रज्ञानानंद विरचिते नर्कुटरामायणे सुन्दरकाण्डम् समाप्तम् ।

ॐ तत्सत्

॥ श्रीरामचंद्रार्पितमस्तु ॥

REFBK-0008737
REFBK-0008737
अनुक्रम ९७६७०३
विभाग
क्रमांक ९२८८
नों. दि. ७/२/५४
वाचनालय
C 6036

## हनुमंताची



जयजय जयजय अंजनि तनया हनुमंता सखया ।
मारुति हनुमंता सखया ।
रघुपति सेवक संकट भंजन गंजन असुर भया ॥ धृ. ॥

जन्मतांचि नभिं उडुनी भानू-बिंब फळा गिळिलें
भ्यालें लोकत्रयिं सगळें ।
सर्व सुरांनीं वरां वर्षुनी अजरामर केलें ॥१॥

श्रीरामाचें सख्य करवुनी वाली वधवीला ।
दिधले अभय अंगदाला ।
सुग्रीवाचें दैन्य हरवुनी नृपपदिं बसवीला ॥२॥
रामकृपा हस्तांकित मस्तक मुखीं राममुद्रा ।
शोभा रामाची दारा ।
अलंघ्य लंका-सिंधु लंघिला सलील अति रुद्रा ॥३॥
सिता सांत्वन दुर्जन मर्दन पुर-दाहन केलें !
अखया जम्बुमालि वधिले ।
मैथिलि कुशला विनयें वदलां तुज रामें स्तविलें ॥४॥
द्रोणगिरी आणोन लक्ष्मणा प्राणदान दिधलें ।
तामस-मख विध्वंसीले ।
थोर घोर रजनीचर समरीं सहज संहरीले ॥५॥
अचाट कर्मे अफाट करुनी राम ऋणी केला ।
रामें चिरंजीव केला ।
भीम–गरुड–गर्वासि विदारुनि जिष्णुध्वाजिं ठेला ॥६॥
दास्य भक्तिनें तववचनांकित राम सदा स्मरणीं ।
सुरनर असुर गाति करणीं ।
प्रज्ञा स्वामी नमी प्रेमदे अनन्य हरिचरणीं ॥७॥

जय जय जय जय अंजनि तनया........

ॐ तत्सत्

## श्री स्वामींचे अद्याप अप्रकाशित ग्रंथ

१ श्री गुरुगीता प्रबोधिनी.

२ परमामृत प्रकाश.

३ श्री वेदस्तुति कीर्तन भास्कर.

४ भ. गीता कीर्तन तरंगिणी प्रथमोल्लास अ. १५

५ वेदान्तसार अभंग रामायण.

६ श्री ब्रह्मस्तुति [चौपाई–दोहादि वृत्तांत]

७ पदें.

८ अष्टकें.

९ इतर स्फुटकाव्य.

★

प्रकाशकांनीं खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

*श्री. प. प. प्रज्ञानानंद सरस्वती स्वामी*

मु. पो. चास (कमान)

ता. खेड, जि. पुणें.

# श्रींचे प्रसिद्ध झालेले ग्रंथ

१ श्री तुलसीदास चरित्र —

( किं. १२ आणे, ट. ख. वेगळा )

२ श्री तुलसीदास रामायण —

( समश्लोकी समवृत्तांतील मराठी रूपांतर )

½ डेमी आकार, श्री तुलसीदास चरित्रासह पृष्ठें ५० पेक्षा जास्त, कागद चांगला, छपाई सुबक, चित्रे सुन्दर, बांधणी कापडी मजबूत. —( किं. ९ रु. ट. ख. वेगळा. )

३ श्री. भ. गीता— संगीत समश्लोकीसह

( किमत फक्त आठ आणे. )

—पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—

शेठ लालचंद हिंमतमल कटारे

मु. पो. चास (कमान)

जिल्हा पुणें